श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित






मासिक

# ॥ रघुवीर समर्थ ॥


जुलै २०१३,
वर्ष सातवे, अंक सातवा,
मुल्य रु. १५

e-mail : raghuvirsmasik@gmail.com

श्रीसमर्थ शिष्य योगीराज कल्याण स्वामी
त्रिशताब्दी पुण्यतिथी वर्ष



गुरुकृपे कल्याणचि होईल...!




## रामदास स्वामी जई आनंदुघन भेटे।

सुखरुप झालो स्वामी तुमचिया पादसेवे।
कल्याण माझे झाले रंगलो सोऽहं भावे।।ध्रु।।
चित्त हे वृत्ति माझी चैतन्यीं मुराली।
संतोषें स्वात्मसुखी अनुभव किल्ली दिली।
निर्विकल्प वास झाला अनुभव केवळ बोली।
विश्व हे नाही अवघे श्रीराम स्वरुपी पाही।।१।।

पावलो धावलो देवा तुमचिया सेवाबळे।
वेदान्तश्रुती ज्यासी निर्विकल्प बोलती बोले।
ते मी स्वयंभ झालो हे शब्द मावळले।
मीपण तूपण अवघे स्वामी गिळुनी उगले ठेले।।२।।
रामाविण वृत्ती माझी आणिक न जाय कोठे।
जिकडे पाहे तिकडे श्रीराम माझा भेटे।
कल्याण म्हणे सकळ द्वैतपण जेथे आटे।
रामदास स्वामी जई आनंदुघन भेटे।।३।।

( श्री कल्याण स्वामीकृत काव्य
ग्रंथ–श्रीसमर्थ शिष्य कल्याण पृ.क्र.११०)



श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित
मासिक

# ।।रघुवीर समर्थ।।

जुलै २०१३/ ज्येष्ठ-आषाढ शके १९३५

**याकारणे ज्ञाता पहावा। त्याचा अनुग्रह घ्यावा।**
**सारासार विचारें जीवा। मोक्ष प्राप्त।।**

• मराठी व हिंदीतून प्रकाशित
• वर्ष सातवे • अंक सातवा
• वार्षिक वर्गणी : रु. १५०
• चार वर्षांसाठी : रु. ५००
• आठ वर्षांसाठी : रु. १०००

**• मालक •**
श्री रामदास स्वामी संस्थान,
श्री रामदास स्वामींचा मठ,
मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा.
पिन ४१५०१३
फोन (०२१६२) २७८२२१
Website :
www.samartharamdas.com
E-mail :
samartharamdas@gmail.com
**• संपादक •**
स. भ. मंदारबुवा रामदासी उर्फ
श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी
**• कार्यकारी संपादक •**
डॉ. सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर
**• मानद उपसंपादक •**
स. भ. मोहनबुवा रामदासी
**• संपादन साहाय्य •**
स. भ. अमृतबुवा रामदासी
**• मुखपृष्ठ •**
सौ. अर्चना धीरज पेटकर
**• प्रकाशक/मुद्रक •**
श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी (C.A.)
श्री रामदास स्वामी संस्थान,
सज्जनगड, जि. सातारा,
**• मुद्रण स्थळ •**
श्री गजानन प्रेस,
७६ अ, चिमणपुरा, सातारा
**• सल्लागार मंडळ •**
– श्री. भूषण महारुद्र स्वामी
– ॲड. महेश. ना. कुलकर्णी
– ॲड. राजेन्द्र. ना. कुलकर्णी
– श्री. विजय प. ठोंबरे
– कलेक्टर ॲंड कोर्ट ऑफ वॉर्डस् सातारा यांचे प्रतिनिधी

हे मासिक प्रकाशक श्री रामदास स्वामी संस्थानचे वतीने प्रकाशक व मुद्रक श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी यांनी श्री रामदास स्वामींचा मठ, मु.पो. सज्जनगड, ता.जि.सातारा, (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. श्री गजानन प्रेस, ७६ अ, चिमणपुरा, सातारा येथे मुद्रित केले.
**संपादक–** स.भ.मंदारबुवा रामदासी उर्फ श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी

• लेखातील मजकुराशी संपादक/प्रकाशक/सल्लागार सहमत असतीलच असे नाही.

## अनुक्रमणिका

• **संपादकीय**
मंदारबुवा रामदासी ४

• **समर्थ महाद्वार**
शहाजीबुवा रामदासी ६

• **चिंतन दासबोधाचे**
स.भ. मोहनबुवा रामदासी ७

• **साधकासी होये निजकल्याण**
प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे ८

• **परमार्थाचे जन्मस्थान। तेचि सद्गुरूचे भजन**
श्री. शरद वामन बारपांडे १०

• **आल्या अतिथां अन्न द्यावे**
श्री. चैतन्य सहस्त्रबुद्धे १३

• **अध्यात्म रहस्य कथा**
श्री. वि. भा. अभ्यंकर १६

• **अभंग योगवासिष्ठ (लेखांक ४ था)**
श्री. वामन वा. कोल्हटकर १९

• **तुका म्हणे (अभंग ७ वा)**
सौ. माधुरी दि. जोशी २३

• **दृष्टांत**
अमृतबुवा रामदासी २७

• **विश्वातील महान तत्त्वज्ञ- महर्षी वेदव्यास**
श्री. ग. प्र. कुलकर्णी २९

• **दास म्हणे**
श्री. प्रसादबुवा रामदासी ३१

• **दासबोध-सानुल्यांसाठी**
सौ. अनुजा सोमण ३२

• **जुना दासबोध- विविध शिकवण (लेखांक ११ वा)**
सौ. मंजिरी श. धूपकर ३३

• **ग्रंथ परिचय - श्री. सुनिल चिंचोलकर** ३७

• **कीर्तन शिबीरातील शिबीरार्थींचे मनोगत** ४०

• **संस्कार शिबीरातील शिबीरार्थींचे मनोगत** ४४

• **विविध कार्यक्रम वृत्ते** ४७



## संपादकीय

# गुरुकृपें कल्याणचि होईल

सर्व समर्थ भक्तांसी
सादर जय रघुवीर!

**आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वसिष्ठकम्।**
**श्रीरामं मारुतिं वन्दे रामदासो जगद्‌गुरुम्।।**

**श्रीगुरूपौर्णिमा** - श्रीगुरूपरंपरेच्या स्मरणाचा, वंदनाचा व या परंपरेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. 'चंद्रमे जे अलांछन' असे 'गुरूतत्त्व' आपल्या पूर्णकलेने विलसत समस्त शिष्यरूपी चकोरांवर भक्तीप्रेमाच्या, कैवल्याच्या चांदण्याचा प्रकाश मुक्तहस्ते उधळीत असल्याचा अनुभव या दिवशी विशेषत्वाने येतो.

सद्‌गुरूबोधाचा पूर्णचंद्र शिष्याच्या चित्तरूपी आकाशात उगवतो आणि शिष्याच्या मनातील अल्प संकल्प-विकल्पाच्या चांदण्या या बोधरूप प्रकाशात विरून जातात, प्रकाशमय होतात.

श्रीगुरूंच्या स्मरणाने सद्‌गुरूभक्तांच्या नेत्रातून सहज ओघळणाऱ्या प्रेमाश्रूंचे प्रतिक किंवा सद्‌गुरूंच्या ठायी शिष्यांप्रती असलेल्या करूणा व कृपेच्या वर्षावाचे प्रतीक म्हणूनच जणू निसर्गातही जलधारांचा वर्षाव होत असतो.

आषाढ महिन्यातील आणखी विशेष पर्वणी म्हणजे श्रीसमर्थ शिष्य योगिराज कल्याण स्वामींची पुण्यतिथी आषाढ शु.१३ शके १९३५ ते आषाढ शु.१३ शके १९३६ हे वर्ष श्री कल्याण स्वामींच्या तीनशेव्या पुण्यतिथीचे वर्ष (त्रिशताब्दी वर्ष) म्हणून सर्वत्र साजरे होत आहे. श्री कल्याण स्वामींची गुरूसेवा, भक्ती, ज्ञान, वैराग्य व श्रीसमर्थांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी केलेले भक्तीप्रसाराचे कार्य पाहिले की...

**धन्य धन्य हे गुरूशिष्यलक्षण। धन्य धन्य हे सेवाविधान।**
**धन्य धन्य हे अभेदलक्षण। धन्य धन्य लीळा अगाध।।**

...असेच उद्‌गार सर्वांच्या मुखातून निघतील.

भारतातील अध्यात्म परंपरेत ज्ञानाचे सम्यक् प्रदान गुरू-शिष्य परंपरेने होत आले आहे. या अर्थाने विश्वात केवळ एकच संप्रदाय अस्तित्वात आहे, तो म्हणजे 'गुरूसंप्रदाय' असे सद्‌गुरू भगवान श्रीधर स्वामीजी म्हणत असत. या परंपरेत शिष्योत्तमांच्या यादीत श्री कल्याण स्वामींचे स्मरण सदैव होत राहील.

ग्रंथराज दासबोधातील 'शिष्यलक्षण' समास आणि श्री कल्याण स्वामींचे चरित्र व वाङ्मय अभ्यासले म्हणजे 'सत्‌शिष्य कसा असावा ?' या प्रश्नाचे उत्तर 'श्री कल्याण स्वामी' असे देता येईल. त्याचबरोबर श्री कल्याण स्वामींच्या शिष्यांचे वाङ्मय अभ्यासले की 'सद्‌गुरू कसे असतात ?' याचेही उत्तर 'श्री कल्याण स्वामी' असे देता येईल. 'सत्‌शिष्यत्वासहीत सद्‌गुरुत्वाचा' हा अंतर्यामी प्रवास व रूपांतरण श्री कल्याण स्वामींच्याच शब्दात पाहूया.

**आवडी म्या वरिला। गुरूवर आवडि म्या वरिला।।धृ.।।**
**स्वात्मसुखाचे कुंकम लेउनि। संसृतिशीण हरिला।।१।।**
**स्वात्मभूषणे भूषविलें मज। संशय नच उरला।।२।।**
**गुरूकृपे कल्याणचि होईल। निश्चय मनिं स्थिरला।।३।।**

श्री कल्याणस्वामींच्या अंतरंग शिष्यांनी वर्णिलेले कल्याणांचे चरित्र पहा.

**सिनेच्या तटाकी महापुण्यभूमी। समाधी विराजे तया डोंबग्रामी।**
**बहु रम्य शोभा दिसे गोपुराची। जगी धन्य ते कीर्ती कल्याण ज्याची।।**
**गुरूभक्त वीरक्त जो ब्रह्मचारी। महातीव्र वैराग्य तें निर्विकारी।**
**क्षमा शांति अद्भूत त्या निस्पृहाची। जगी धन्य ते कीर्ति कल्याण ज्याची।।**
**जगी बद्ध अज्ञान तें सिद्ध केले। बहु संत ते महंत होऊनि ठेले।**
**कृपा आगळी सौम्य लीळा जयाची। जगी धन्य ते कीर्ति कल्याण ज्याची।।**
**प्रतापे बळे आगळा योगिराणा। नसे ते सीमा वर्णिता पूर्ण ज्ञाना।**
**पदी लागतां मुक्ती लाभे फुकाची। जगी धन्य ते कीर्ति कल्याण ज्याची।।**
**मही मंडळी रामउपासना हो। बहु नेटकी शुद्ध दीक्षा जना हो।**
**प्रीती लाविली भक्ति त्या राघवाची। जगी धन्य ते कीर्ति कल्याण ज्याची।।**

श्री कल्याण स्वामींच्या चरित्र व कार्याची ओळखव या काव्यातून होते. त्यांच्या शिष्यपरंपरेतील मठ व मंदिरांच्या माध्यमातून प्रामुख्याने मराठवाड्यात त्यांनी केलेल्या भक्तीप्रसार कार्याच्या खुणा आजही पहावयास मिळतात.

**कल्याणाचे नाम कल्याणकारी। कल्याणाचे ध्यान सर्वांसि तारी।**
**कल्याणाचा हस्त माथा जयाचे। चारी मुक्ती वंदिती पाय त्याचे।**
**कल्याण होणे जरी तूज आहे। कल्याणपायी मन स्थिर राहे।**
**कल्याणवाणी पडतां सुकानी। कल्याण जाले बहुसाल प्राणी।।**

श्री कल्याण स्वामींच्या त्रिशताब्दी पुण्यतिथी वर्षात त्यांच्या चरित्र व वाङ्मयाचे चिंतन करण्याचा व त्यांच्या पवित्र समाधीस्थान श्रीक्षेत्र डोमगाव (ता.परंडा, जि.उस्मानाबाद) चे दर्शन घेण्याचा संकल्प करूया.

श्रीसमर्थांचे बहिश्चर प्राणच असलेल्या श्री कल्याण स्वामींच्या अशाप्रकारे केलेल्या स्मरणाने 'गुरूकृपें कल्याणचि होईल' हा निश्चय आपल्या अंतःकरणातही स्वानुभवाने स्थिर व्हावा, हीच श्रीसमर्थ चरणी प्रार्थना!

**।। जय जय रघुवीर समर्थ।।**


**- मंदारबुवा रामदासी** (भ्रमणध्वनी - ९७६३२७१४०७)
C/o स.भ. मीनाताई भावे, श्रीधर-दत्त निवास, ४८४/८७, मित्रमंडळ सोसायटी, पुणे-४११ ००९.

## समर्थ विचार प्रसार मोहिम-२०१३ सर्व समर्थ भक्तांना नम्र आवाहन

**सप्रेम जय रघुवीर ! 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या माध्यमातून समर्थ विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प आपण केला आहे. यात आपण सक्रिय सहभाग घ्यावा ही विनंती.**

**प्रत्येक वाचक/सभासदांनी मासिकाचे कमीत कमी ५ नवीन सभासद तयार करून श्रीसमर्थ चरणी आपली सेवा रूजू करावी असे विनम्र आवाहन करीत आहोत. मासिकाची वार्षिक वर्गणी रु.१५०/- असून चार वर्षांसाठी रु. ५००/- व आठ वर्षांसाठी रु.१०००/- आहे.**

**आपण केलेल्या सभासदांची यादी संपूर्ण नाव, पत्ता, पिनकोड व दूरध्वनी क्रमांकासह सातारा कार्यालयास पाठवावी किंवा आपल्या शहरात असलेल्या मासिकाच्या स्थानिक प्रतिनिधीकडे द्यावी. त्यांची वर्गणी एकत्रितरित्या जमा करून 'श्रीरामदास स्वामी संस्थान' या नावाने देय असलेल्या ड्राफ्टस्, चेक अथवा मनिऑर्डरने पाठवावी. आपणास त्वरित पावती पाठविण्यात येईल.**




मो.९४२१८७१८६८

**सर्व समर्थ भक्तांसि सादर जय रघुवीर!**

६ जून रोजी सर्वत्र पावसाळ्यास सुरूवात झाली. सूर्याच्या प्रखर तेजानी भाजून गेलेली जमीन अमृत वर्षावानी फुलून गेली. सगळीकडे हिरवळ दिसू लागली आहे. गडावर उतरणारे ढग व अधूनमधून येऊन मनाला भुरळ पाडणारे धुके स्वर्गसुखाचा आनंद देऊन जातात. पावसाळा म्हटले की लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचेच मन आनंदीत होत असते. त्यात सज्जनगडावरील पावसाळा काही निराळाच. एकदा सुरू झाल्यावर बंद होण्याचे नाव घेत नाही. यावर्षी पावसाळ्यास थोडी लवकरच सुरुवात झाली. ज्येष्ठ शु. १ गंगा दशहरा प्रारंभ झाला. त्या निमित्त गडावर श्रीसमर्थ समाधीच्या अभिषेकाच्या वेळेस श्री. भूषण स्वामी महाराज यांच्या हस्ते गंगाजलाचे पूजन करण्यात आले त्या प्रसंगी

**नमः शिवायै गंगायै शिवदायैनमोनमः।**
**नमस्ते रूद्र रूपिण्यै शांकर्यैते नमोनमः।।१।।**
**नमस्ते विश्वरुपिण्यै ब्रह्ममूर्त्यै नमोनमः।**
**सर्वदेव स्वरूपपिण्यैनमोभेषजमूर्तये।।२।।**

हा मंत्र म्हणून गंगामातेचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ शु. १० पर्यंत दररोज दहा दिवस गंगामातेचे पूजन केले जाते. ज्येष्ठ शुक्ल दशमीला हस्त नक्षत्रामध्ये स्वर्गातून गंगामाता पृथ्वीवर आली म्हणून तिचे पूजन करायचे असते. ब्रह्मपुराणात म्हटले आहे.

**ज्येष्ठे मासि सिते पक्षे दशमी हस्तसंयुता।**
**हरते दश पापानि तस्माद, दशहरा स्मृता।।**

गंगामातेचे दहा दिवस पूजन केल्याने अनेक पापे नाहीशी होतात.


### युवा संस्कार शिबिर

आपल्या तरुण पिढीवर चांगले संस्कार व्हावेत याकरिता प्रतिवर्षी सज्जनगडावर संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

यावर्षी दि. १ जून रोजी शिबिरास सुरूवात झाली. या शिबिरात राज्याच्या विविध भागांतील युवक आणि युवती सहभागी झाल्या होत्या. या विद्यार्थ्यांना श्री. नंदकुमार मराठे, श्री. योगेश साळेगावकर, श्री. चारूदत्त आफळे, श्री. वासुदेव बुरसे, श्री. मंदार खळदकर, सौ. मंजिरीताई धूपकर, श्री. घनःश्याम ढाणे, श्री. हेमंत कुलकर्णी, श्री. अभिराम दिक्षित, श्री. मोहन शेटे, श्री.विवेकशास्त्री गोडबोले, श्री. भूषण स्वामी, श्री. प्रसादस्वामी, श्री. कौस्तुभबुवा रामदासी, श्री. अमृतबुवा रामदासी, अशा विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

१ जून ते ९ जून या कालावधीत दररोज मनाचे श्लोक, सूर्यनमस्कार, प्रार्थना, व्यक्तिमत्व विकास, श्रीसमर्थांची शिकवण, विविध कलांची माहिती, भारतीय संस्कृतीची ओळख, क्रांतिकारकांचा जीवनावरील व्याख्याने, देशातील पराक्रमी इतिहासाची उजळणी, दैनंदिन उपासना, प्रश्नमंजुषा, किल्ल्यांची माहिती, असे विविध कार्यक्रम या ९ दिवसांत पार पडले. शिबिर प्रमुख म्हणून श्री. नंदकुमार मराठे यांनी जबाबदारी स्विकारली होती. तसेच योगतज्ञ श्री. सुभाष खर्डेकर यांनी मुलांना सूर्यनमस्कार शिकविले. श्री. अंबादास बोधे यांनी मुलांना संगीत गायनाचे मार्गदर्शन केले. सौ. संगिता कुलकर्णी पनवेल व सौ. मिनल उपाध्ये यांचे शिबिरासाठी चांगले सहकार्य लाभले. गडावरील श्री. अमृतबुवा रामदासी, आनंद रामदासी, श्री. नारगोळकर काका यांनी शिबिरांसाठी खूप मेहनत घेतली. दि. ९ जून रोजी संस्थानचे अध्यक्ष श्री. भूषण स्वामींच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत प्रमाणपत्र देण्यात आले. त्या प्रसंगी संस्थानचे विश्वस्त श्री. बाळासाहेब स्वामी व व्यवस्थापक श्री. मोहनबुवा रामदासी उपस्थित होते.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# चिंतन दासबोधाचे

भ. मोहनबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२११७७८२१

**आता सद्गुरू वर्णवेना...**

**नातुडे मुख्य परमात्मा। म्हणोनी करावी लागे प्रतिमा**
**तैसा माया योगे महिमा। वर्णिन सद्गुरूंचा॥**

मुख्य परमात्म्याचे ज्ञान हेच मानवी जीवनाचे एकमेव उद्दिष्ट आहे. तो परमात्मा फक्त मानव देहातच प्राप्त होऊ शकतो म्हणून मानवाचा जन्म दिला. कर्मधर्म संयोगाने मानवाचा धर्म मिळूनही माणूस पशुजीवना प्रमाणे आचरण करत असेल तर त्या परमात्म्याला आतून किती यातना होत असतील याचा आम्ही कधी विचारही करत नाही. आमच्या जीवनाचे ध्येय आम्हाला ठरवावे लागते. परमेश्वराने माणसाचा जन्म देऊन तो नामानिराळा झाला. माणसाने मात्र पूर्ण विचार करून त्या परमात्मप्राप्तीसाठी अखंड प्रयत्न करणे योग्य होईल. त्या परमात्मप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत. सोप्यात सोपा मार्ग सोडून अवघडातील अवघड मार्ग शोधत रहावे हा माणसाचा स्वभाव असतो तो एका प्रकाराने साधनातील व्यत्ययच असतो. सोपे सोडून न जाता समर्थ आपल्याला प्रतिमांचा (मूर्तींचा) आधार घेण्यास सांगतात.

प्रतिमा पूजा आपल्या संस्कृतीत सांगितली आहे. प्रतिमापूजा करत असताना मनात वेगवेगळे विचार येत असतात. साधक नेमका इथेच गडबडून जातो. पण प्रतिमा पूजा करत असताना निर्गुण परमात्मप्राप्ती हे ध्येय असावे. प्रतिमा पूजा करताना देहभावाचे विस्मरण ही मूर्तीपूजेची खऱ्या अर्थाने फलश्रुती आहे. देहभावाचे विस्मरण हेच समर्थांना अभिप्रेत असणाऱ्या प्रभुरामचंद्रांचं स्मरण आहे. त्या परमात्म्याची प्राप्ती करून घ्यावी. परमात्म्याची प्राप्ती हाच मायेचा निरास आहे. मूल चालायला लागेपर्यंतच आई त्याचे बोट धरते पण मुलगा व्यवस्थीत चालायला लागला की आई त्याचे बोट सोडते व चालायला लागलेल्या मुलाला बोट धरलेले सुद्धा आवडत नाही. तीच अवस्था इथे आहे.

**आपुल्या भावासारिखा मनी। देव आठवावा ध्यानी।**
**तैसा सद्गुरू हा स्तवनी। स्तऊ आता॥**

अंतःकरणात भाव असेल त्याप्रमाणे देवाचे चिंतन, मनन करावे. प्रत्येक व्यक्तीचा भाव वेगवेगळा असू शकतो. एकाच भावाने त्या भगवंताला हाक मारावी असा आग्रह कोणत्याही संताने केलेला नाही. कुणी त्यालाच राम म्हणेल, दत्त म्हणेल, ज्याची जशी स्वभाव-रचना असेल तसे त्याने साधन करावे. नाम कोणत्याही देवतेचे असो त्याचा परिणाम एकच असतो. दैवत कोणतेही असो, त्याचे स्वरूप एकच असते. पण त्या स्वरूपाची प्राप्ती होईपर्यंत हे करावे लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अंतःकरणात भाव असावाच लागतो. भाव नसेल तर साधनात शुष्कता येते. संत श्री तुकडोजी महाराज म्हणतात-

**मनी नाही भाव। म्हणे देवा मला पाव।**
**देव बाजारचा भाजी पाला नाही हो।**
**देव अशाने भेटायचा नाही हो॥**

सर्वांचा देव, सद्गुरू, नाम हे एकच असू शकत नाही. पिंड रचनेप्रमाणे त्याने उपासना शोधावी व मुख्य उपासनेचे ध्येय अंतःकरणात ठेवावे. इथे 'समर्थ' आपुल्या भावासारिखा मनी। देव आठवावा ध्यानी।' असे सुचवतात. काहींना वाटेल भावासारिखा म्हणजे माझ्या सख्ख्या, चुलत भावाप्रमाणे देवाला आठवावा का ? आपल्या या भावाप्रमाणेही देवाला हाक मारायला हरकत नाही, पण ज्या भावाने आपण देवाला हाक मारावी तो भाव शुद्ध असला पाहिजे. भाऊ हाक मारताना ती शुद्धता असते त्यामुळे इथे भावाचे दोन्हीही अर्थ घेतले तरी वावगे ठरणार नाही असे वाटते.

अशा भावाचे स्मरण ध्यानात साठवावे व आठवावेही. यासाठी समर्थ ही उपमा देतात.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**

## गुरुवाक्य प्रमाण मानल्यास

# साधकासी होये निजकल्याण

प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे, सोलापूर, मो. ९४२२६५३६३६

**श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे पट्टशिष्य म्हणून विख्यात पावलेले श्रीकल्याण स्वामी यांची २९९ वी पुण्यतिथी आषाढ शुद्ध त्रयोदशीस त्यांच्या समाधीस्थानी म्हणजे डोमगाव येथील मठात, परांडा येथे, तसेच सज्जनगड, शिवथरघळ आणि अनेक समर्थस्थापित मठांतून मोठ्या भक्तीभावाने-आनंदाने-उत्साहाने साजरी होत आहे.**

श्रीकल्याणस्वामी यांनी शिवथरघळीत समर्थांनी सांगितलेला दासबोध लिहून घेतला. तसेच सज्जनगडावरील समर्थांच्या वास्तव्यातही बहुथोरपणे गुरूसेवा केली. 'कल्याणा, छाटी उडाली' असे समर्थांनी म्हणताच कल्याणाने तात्काळ उडी मारून छाटी झेलली 'पायाला गळू झाल्याचा बहाणा करून' समर्थांनी सर्वच शिष्यांना म्हटले की, 'कोण हा गळू चोखील पाहू. कारण तरच तो बरा होणार आहे.' पण इतर कोणी तयार होईना. श्री कल्याणस्वामी मात्र धावले आणि गळू चोखायला सुरूवात केली. समर्थांनी तिथे आंबा बांधून ठेवला होता. पण परीक्षेत फक्त श्री कल्याणस्वामी उत्तीर्ण झाले. 'गुरूवाक्य' प्रमाण मानून वागणे हा एक व्यावहारिक अर्थ झाला. पण पारमार्थिक अर्थ कोणता म्हणाल ? तर गुरूवाक्य म्हणजे गुरुबोध, गुरुवचन, गुरुमंत्र होय. त्याच्या स्मरणचिंतन-मनन यामुळेच शिष्याचे कल्याण होते, हे भक्तीसूत्र त्यांनी प्रकट केले आहे. त्यांनी लिहिलेल्या पदातील भावार्थ पाहू !

### करी कृपेची छाया

**श्रीकल्याणस्वामींनी लिहिलेल्या 'श्रीगुरूराया' नामक पदात म्हटले गेले आहे की, 'जयजयजी हो श्रीगुरूराया। श्रीगुरूराया।। ध्रु।। अजरामरा अलक्ष अपारा। वाहीन मी निजपदी काया।।१।। नित्यानंदा नित्य मी परिपूर्णा। निरसी दुर्घट माया।।२।। सकळ चराचर मुनिवर सुरवर। चिंतिती तुझिया पाया।।३।। रिद्धीसिद्धी होऊनि मुक्ती तिष्ठताती। पावावया तुझिया ठाया।।४।। कल्याण दासा हृदयनिवासा। करी कृपेची छाया।।५।।'** इथे त्यांनी सर्वप्रथम आपल्या मनबुद्धीसह आपली काया गुरूचरणी अर्पण केली आहे. त्यात त्यांचा शरण्यभाव दिसून येतो. एक गोष्ट खरीच आहे की, सद्गुरूंना शरण गेल्याशिवाय ते उपदेश कसा करतील ? कृपाछाया कशी करतील ? शिष्याचे वा साधकाचे कल्याण तरी कसे करतील ? नाहीच ! म्हणून परमार्थप्रांती वाटचाल करायची असेल, तर सद्गुरूंना शरण जायला हवे. दुसरी गोष्ट म्हणजे सद्गुरूंना सर्व मुनिश्रेष्ठ देखील वंदन करतात. गुरूंनी दिलेली नाममंत्राची जपसाधना केली तर, ते सद्गुरू आपल्या हृदयातच येऊन निवास करतात. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे - अंतरी/हृदयी जर सद्गुरू येऊन राहिले, तर सतत यांची म्हणजेच त्यांच्या उपदेशाची आठवण होऊन आपण आपली साधना सातत्याने करीत राहतो. तसे झाल्यासच सद्गुरू आपल्यावर प्रेमकृपा म्हणा वा कृपाछाया करतात. सद्गुरूंची कृपा झाली तर काय अशक्य आहे ? सर्वकाही शक्य आहे. मग दासाचे/भक्ताचे कल्याण नक्कीच होईल,यात मुळीच शंका नाही. सद्गुरूंनी तर रामनामाचे पेवच उघडले आणि त्यातील राममंत्र/नाममंत्र भक्तांना देऊन स्मरणोपासनेने ईश्वरदर्शन प्राप्त करून घेण्याचे कृपाबळ त्यांना दिले आहे.

### गुरुवाक्य हेच 'प्रमाण'

**'श्रीगुरूवाक्य प्रमाण' नामक पदात श्रीकल्याणस्वामी म्हणतात की,'श्रीगुरूराजपदांबुजभजनी। कायिक वाचिक मन दिनरजनी।।१।। पतीतपावन तो। मानवजीवन सज्जन**

**तो ।।ध्रु. ।। ब्रह्मपरात्पर श्रीगुरूमूर्ती। भावी निरंतर अंतरवृत्ती ।।२ ।। दारासुतगृह श्रीगुरूचरणी। कविवर वदले तैशीच करणी ।।३ ।। कर्म उपासक श्रीगुरूवचनी। भजनविधीपर वैभवरचनी ।।४ ।। श्रीगुरूवाक्य प्रमाण जयासी। वरद हरिहर कल्याण त्यासी ।।५ ।।'** इथे काव्यरचनेच्या दृष्टीने आणि अर्थाच्या औचित्याच्या दृष्टीने तीन काव्यपंक्ती फार विशेषत्वाने प्रकटल्या आहेत. कशा म्हणाल ? तर, 'श्रीगुरुमूर्ती' कशी आहे? तर, ती निरंतर अंतर्यामी आहे. ती ब्रह्मस्वरूप आहे, पतितांना कृपापूर्ण होऊन गुरूमूर्ती त्यांना पावन करणारी म्हणजे- त्यांचा उद्धार करणारी अशी आहे.' श्रीगुरुचरणी' आम्ही सर्व कुटुंबीय शरण आलेले आहोत. 'श्रीगुरुवचनी' राहून आम्ही कर्म करीत राहतो. साहजिकच मग ही कर्मे 'सत्कर्मेच' होतात, यात शंकाच नाही.आता, सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे- जपासाठी, साधनेसाठी, उपासनेसाठी, 'श्रीगुरूवाक्य' हेच प्रमाण होय. गुरूवाक्य स्वरूप नाममंत्र हाच उपासनेचे साधन होय. समर्थ रामदासांनी दासबोधात गुरूवाक्य हेच परमार्थाचे प्रवेशद्वार आहे, असे म्हटले आहे. त्याचीच अनुभूती इथे श्रीकल्याणस्वामींच्या पदाचे चिंतन-मनन-स्मरण करताना येते. एकूण सर्वच संत-साधु-सत्पुरूष यांनी नाममंत्र आणि त्यांचे स्मरण हेच परमार्थाचे मुख्यस्वरूप असून अनुभूतीला ते फलश्रुती मानतात. त्यामुळेच श्री कल्याणस्वामी यांनी 'गुरुवाक्य प्रमाण मानून जो साधक स्मरणोपासना करतो त्याला ईश्वरदर्शन प्राप्त होऊन त्याचे कल्याण होते' हा भक्तीसिद्धांत इथे प्रकट केला आहे, असेच म्हणता येईल. या श्रीगुरुनामाचा महिमा काय सांगावा ? तो 'भववारी वारी स्मरणे। जडमूढालागी तरणे। जन्मासी येणे मरणे। नाही खेदू।।१ ।। असा आहे. गुरूशिवाय आणि नामाशिवाय परमार्थघडूच शकत नाही, हेच खरे !

### सद्गुरू- हृदयांतरीचा ठेवा

'सद्गुरूस्वामी' नामक पदात श्रीकल्याणस्वामी सांगतात की,'सद्गुरूराजाची मूर्ती कशी आहे ?' तर ती कृपासिंधूप्रमाणे आहे.वेदांना देखील त्याच्या कृपेचे स्वरूप पूर्णपणे कळलेले नाही. हा सद्गुरूस्वरूप असलेला रामराया कसा आहे ? तर, शंकरादी देवही त्याचे स्मरण-चिंतन करतात. तो ब्रह्मानंदस्वरूप आहे. मानवाला त्याचे स्वरूप कसे काय कळणार ? कळेल, पण केव्हा ? तर गुरूमंत्राने तो साधन करील तेव्हाच! कारण ईश्वरदर्शनाशिवाय त्याची कृपाशक्ती मुळीच कळून येणार नाही. त्यामुळेच सद्गुरूंचे स्थान कुठे आहे ? तर, **'दीनानाथ हे थोर ब्रीद गाजे। तेणे मानसी परमसुख माजे। सद्गुरूस्वामी पातले हृदयसेजे। नाम कल्याणघोष टाळी वाजे ।।'** याप्रमाणे आहे. म्हणजे काय? तर भक्त जेव्हा निरंतरपणे गुरूमंत्राचा जप करतो तेव्हा सद्गुरू आपोआपच त्याच्या हृदयांतरी येऊन राहतात. या गुरू आणि भक्त दोघांचीही अवस्था कशी म्हणाल ? तर, नाम-रूपे भिन्न, पण अंतरी मात्र ऐक्यभाव !

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**



श्रीगुरुपौर्णिमा विशेष

# परमार्थाचे जन्मस्थान। तेचि सद्गुरूचे भजन

श्री. शरद वामन बारपांडे, चाळीसगाव, मो. ९७६७२५४७२८

**आता सद्गुरू वर्णवेना। जेथे माया स्पर्शो शकेना।**
**ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ।।१-४-१**

अशा ह्या निःशब्द ओवीच्या पलिकडे असणाऱ्या सद्गुरूंच्या अभूतपूर्व स्तवनाने समासाची सुरूवात समर्थांनी केली आहे. गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने सद्गुरुंचे स्तवन, भजन, पूजन व गुरूदक्षिणा हे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू असलेले आपण वाचतो, पाहतो, ऐकतो. परंतु ''जेथे माया स्पर्शो शकेना'' असे जे शब्दांच्या पलिकडले आहे, तर मग हा खटाटोप कशाला? पण तरीही ते करावे असे परमार्थ मार्गात संकेत आहेत. ज्ञानेश्वरांनी तर प्रत्येक अध्यायाच्या सुरूवातीलाच निवृत्तीनाथांचे म्हणजे त्यांच्या सद्गुरूंचे स्तवन केले आहे व तेही अनेक उपमा, उत्प्रेक्षा व रूपक अलंकारांनी सजवून केले आहे. १६ व्या अध्यायाच्या प्रारंभी चित्सूर्याच्या रूपकाने सद्गुरूंचे केलेले वर्णन तर भावरम्य आहे.

**मावळवीत विश्वाभासू। नवल उदयला चंडाशु।**
**अद्वयाब्जिनी विकासू। वंदू आता ।।१६-१**

अर्थ-प्रचंड प्रखर किरणांचा सद्गुरूरूप चित्सूर्य उगवला की, सारा विश्वाभास मावळतो व अद्वैताचे कमळ उमलते अशा ह्या सद्गुरूंना मी वंदन करतो. गीतेच्या १३ व्या अध्यायात श्रीकृष्णांनी अर्जुनाला ज्ञानाची १८ लक्षणे सांगितली आहेत. त्यात ५ वे लक्षण ''आचार्योपासन'' आहे. ह्या आचार्योपासन लक्षणावर ज्ञानदेवांनी १०० ओव्यांचे भाष्य करून अंतरबाह्य गुरूसेवेचा परमोच्च आदर्श उभा केला आहे.

परमार्थ मार्गात काही संकेत ठरलेले असतात. एखाद्यास साक्षात्काराने किंवा गुरुकृपाप्रसादाने अनिर्वाच्य असे समाधान मिळाले तरी ते दुसऱ्यास सांगता आले पाहिजे. समर्थ म्हणतात-

**अनिर्वाच्य समाधान जाले। ते पाहिजे बोलिले।**
**बोलिल्यासाठी समाधान गेले। हे तो घडेना।।**दासबोध

त्यातलाच हा एक संकेत आहे की, जरी सद्गुरु परब्रह्मस्वरूप असले तरी व अनिर्वाच्य असले तरी त्यांचे भजन, पूजन, स्तवन पादसेवन हे आवश्यक आहे.

व्यावहारिक उदाहरणाने हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल. जसे एखाद्या रोग्याला डॉक्टरांनी सलाईन लावले तर त्यावेळी तो रोगी त्या सलाईनमध्ये कोणकोणते घटक आहेत त्याचे परिणाम त्याच्या रोगावर किती वेळात होतील, शरीरातील कोणकोणत्या धमन्यांतून त्याचा प्रवास असेल इ.इ. प्रश्न व चिकित्सा न करता श्रद्धेने, विश्वासाने तो औषध उपचार घेतो व बरा होतो त्याचप्रमाणे हे संकेत पाळून सद्गुरू स्तवन करावे.

**ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।**
**द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम्।**

हे सुप्रसिद्ध सद्गुरूंचे ध्यान गुरूगीतच आहे. ह्याच्या पुष्ट्यर्थ समर्थ म्हणतात-

**सद्गुरू भजना परते काही। मोक्षदायक दुसरे नाही।**
**जयास न मने तेहि। अवलोकावी गुरूगीता।।**७/१०/४३।।

सद्गुरूभजन, पूजन करावे हे निश्चित झाल्यावर गुरू आणि शिष्य ह्या दोघांच्या भूमिकेबद्दल थोडे चिंतन करू या. म्हणजे गुरूपौर्णिमेच्या उत्सवाचे सार्थक होईल अन्यथा केवळ भोजनप्रसाद, किती दक्षिणा मिळाली व त्याचा विनियोग कसा करायचा ह्यावर चर्चा करून, कार्यक्रम छान झाला असा शेरा मारून जो तो आपआपल्या घरी जातो.

ह्या चिंतनात सद्गुरू आणि सत्शिष्य ह्या दोघांच्या भूमिका आदर्शवत् आहेत असे गृहीत धरून सद्गुरूंनी सत्शिष्याला दिलेल्या उपदेशाचा व नामाचा विचार करू.

आदर्शवत् सद्गुरू आणि सत्शिष्यामध्ये उदाहरणार्थ रामकृष्ण परमहंस, विवेकानंद रामदासस्वामी-कल्याण, निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर, अलिकडचे तुकाई-गोंदवलेकर महाराज अशा बऱ्याच जोड्या सांगता येतील.

सद्गुरूंनी अनुग्रह दिल्यानंतर विचारांची एक साखळीच तयार होते, अनुग्रह देणाऱ्याची पात्रता, सांप्रदायिक परंपरा, शिष्यास येणारा अनुभव, शिष्यास दिलेले नाम किंवा उपदेश, अनुग्रहासाठी लागणारी सामुग्री व वेळ, महावाक्याचे विवरण, इ.इ. अनुग्रहाच्या संदर्भात येतात. जेव्हा सद्गुरू अनुग्रह देतात तेव्हा शिष्याला आलेला अनुभव व त्याच्यात झालेला बदल हा सर्वात मोठा मुद्दा आहे. जर बदल झाला नाही किंवा काही अनुभव आला नाही तर कुठेतरी कोणी एक कमी पडतो आहे असे समजावे. अनुभव हा आनंददाई असावा तसेच अनुग्रहात महावाक्य सर्वात महत्त्वाचे आहे. जर महावाक्यच नाही तर तो अनुग्रहच नाही. चार महावाक्ये आहेत. १) प्रज्ञानंब्रह्म २) अहंब्रह्माऽस्मि, ३) तत्त्वमसी, ४) अयमात्मा ब्रह्म ह्यापैकी जे सांगितले जाईल, त्याचे स्पष्टीकरण करता आले पाहिजे. ह्या बाबतीत समर्थांनी दशक ५ समास ६ मध्ये ओवी क्रमांक ४४ ते ५२ मध्ये हा विचार स्पष्ट मांडला आहे. ह्या वैचारिक तत्वज्ञानावर नाम किंवा उपदेश दिला जातो. त्यामध्ये साधनाही सांगितली जाते. त्यायोगे शिष्याला सारासार विचार, ध्यान व आत्मज्ञानाविषयी मार्गदर्शन असते. गुरूगीतेतील तीन मंत्र देतो म्हणजे वरील विषयास पुष्टी मिळेल.

**१) एवविधं गुरुध्यात्वा ज्ञानमुत्पद्यते स्वयम्।**
**तत्सद्गुरू प्रसादेन मूक्तोऽहमिति भावयेत॥**

अशाप्रकारे सद्गुरूंचे ध्यान केल्यानंतर शिष्याच्या ठिकाणी आपोआप ज्ञान होते त्या सद्गुरूंच्या प्रसादाने ''मी मुक्त आहे'' असा अनुभव येतो.

**२) गुरूदर्शित मार्गेण मनःशुद्धिं तु कारयेत्।**
**अनित्यं खण्डयेत् सर्वं, यत्किंचिदात्म गोचरम्॥**

गुरूंनी दर्शवलेल्या मार्गाने आपल्या मनाची शुद्धी करावी, आपल्याला जे काही थोडे जाणवते त्या सर्व अनित्य वस्तूंचे खंडन करावे. हा सारासार विचार करण्यास मार्गदर्शक मंत्र म्हणता येईल.

**३) ज्ञेयं सर्वस्वरूपं च ज्ञानं च मन उच्यते।**
**ज्ञानं ज्ञेयसमं कुर्यान् नान्यः पन्थाः द्वितीयकः॥**

सर्वरूपी आत्मा हा ज्ञेय (जाणण्यास योग्य वस्तू) आहे. ज्ञानालाच मन म्हणतात. ज्ञानाला ज्ञेयाप्रमाणे बनवावे(मनाला आत्मरूप बनवावे) आत्मज्ञान प्राप्तीचा ह्यापेक्षा वेगळा मार्ग नाही.

ह्या प्रकारे अनुग्रहावर चिंतन करणे हा एक व्याख्यानाचा किंवा स्वतंत्र लिखाणाचा विषय होऊ शकतो. अनुग्रहात सद्गुरूंनी 'नामसाधन' दिल्यानंतर त्यात सातत्य व तत्वज्ञानाची जोड दिली तर नामाचे ध्यानात, ध्यानाचे धारणेत व धारणेतून समाधीत परिवर्तन होऊ शकते. जाणीवपूर्वक घेतलेले नाम व न समजता घेतलेले नाम ह्यात फरक असणारच आहे. जसे 'नामस्मरण' व 'नामसंकीर्तन' जाणीवपूर्वक घेतलेले नाम हे नामस्मरणात न समजता घेतलेले नाम हे नामसंकीर्तनात येईल. ज्या व्यक्तीला किंवा घटनेला किंवा वस्तूला आपण पाहिलेले असते. त्यास 'स्मरण' म्हणता येईल. उदा. रामाची मूर्ती आपण पाहिलेले आहे. त्याप्रमाणे स्मरण करून रामनाम घेतले तर ते नामस्मरण होईल. न समजता किंवा केवळ आज्ञा करून घेतलेले नाम हे नामसंकीर्तन होईल. उदा. वाल्याकोळी ह्याने घेतलेले नाम हे नामसंकीर्तनात येईल. रामाचे नाव कसेही घेतले तर फायदा होतोच. नामसंकीर्तनात सातत्य व विश्वास ह्याची कास धरून फलप्राप्तीसाठी बराचवेळ वाट पहावी लागते. वाल्याचा वाल्मिकी ऋषी होण्यास बराच काळ लागला हे आपणास माहित आहेच. जाणीवपूर्वक घेतलेले नाम हे लवकर फल देते. परंतु त्यातही अनन्यता आवश्यकच आहे. समर्थ म्हणतात-

**येथे शिष्यप्रज्ञाची केवळ। प्रज्ञावंता न लगे वेळ।**
**अनन्यास तात्काळ। मोक्ष लाभे॥**

तेच भोळ्याभावाने घेतलेले नाम हे उधारीचे काम आहे.

**भोळा भाव सिद्धी जाव। ह्या उधाराचा उपाव।**
**रोकडा मोक्षाचा अभिप्राव। विवेके जाणावा।।**९-७-४९।।

विवेके जाणावा हे अधोरेखित करायला हवे. म्हणजेच विवेकाने जाणून घेतलेले नाम हे उधारीचे काम नाही. कारण तो परमेश्वर ज्ञानमय आहे. ''अज्ञाने तरी देव पाविजेल कैसा'' नारदाने फक्त त्याला ''राम'' हे नाम घे म्हणून सांगितले कारण त्यावेळी परिस्थिती तत्वज्ञान सांगण्याची वेळ नव्हती, आजही समाजात अनेक वाल्याकोळी दुकाने उघडून,फसव्या जाहिराती देऊन लोकांना लुटताहेत. मग ते दुकान शिक्षण क्षेत्रातील, आरोग्य क्षेत्रातील असेल. सरकारी दुकानेही ह्याच प्रकारची आहेत. तेव्हा असे वाटते गोंदवलेकर महाराजांसारखे नारदमुनी जरी त्यांना भेटले तरी त्यांचे कल्याण होईल. आजही तुमचे तत्वज्ञान ऐकायला त्यांना वेळ नाही परंतु नुसती आज सुरूवात जरी केली तरी हरकत नाही. किमानपक्षी ते मोक्षाच्या रांगेमध्ये उभे असतील. तत्वज्ञानाची जोड देऊन रामनाम कसे घ्यावे व रामरूपी अंतरात्मा कसा पहावा ह्याचे मार्गदर्शन ''गोंदवलेकर महाराजांची प्रवचने'' ह्या पुस्तकातील १० व १२ जुलैच्या प्रवचनात आहे. शेवटी असे म्हणेन की ''स्वये तूचि आहेसी ब्रह्म'' किंवा ''अहं आत्मा'' हे कधीची विसरो नये'' ही वचने म्हणजे नामसाधनेची फलश्रुती होय.

सद्गुरू केवळ शिष्याला 'नाम'च देतात असे नाही तर साधना सुद्धा सांगितली जाते. जेणेकरून शिष्याच्या वासनेचे जाळे तुटून अहंकाराची गाठही सुटते. व जीवामध्ये परमात्मा स्वतः प्रकट होतो. ह्या साधनेत अर्चनभक्ती येते. एकनाथ महाराजांनी नाथ भागवतातील तिसऱ्या अध्यायात ह्याचे सुंदर विवेचन केले आहे. वैदिक मंत्र आणि तांत्रिक मंत्र अशी मिश्रपूजा अत्यंत पवित्र आहे. ही पूजकाला निष्काम करते. परंतु त्याआधी सद्गुरूंचे मार्गदर्शन हवे ! शरणागती हवी ! एकनाथ महाराजांच्याच शब्दात-

**वैदिक अथवा तांत्रिक। गुरुमार्गे सिद्धिदायक।**
**यालागी गा आवश्यक। सद्गुरूसी देख शरण जावे।।**

प्रवृत्तीमार्गाच्या कार्याला किंवा निवृत्ती मार्गाच्या कार्याला गुरू हे आवश्यक आहे. आपल्या मनाने भजन केले तर अडचणीत सापडण्याची शक्यता असते. पाय आहे आणि रस्ताही आहे. जर वाटाड्या नसला किंवा आजच्या परिस्थितीत बोर्ड नसला तर रस्ता कुठे जातो व किती लांब आहे हे कळत नाही. परंतु सद्गुरूंसारखा वाटाड्या किंवा दासबोधासारखा फलक असला तर हा परमार्थमार्ग इच्छित ठिकाणी निश्चित पोहचवतो.


गुरू आणि ब्रह्म दोन्ही एकच आहेत हा भाव धरून, भक्तीपूर्वक त्यांची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घ्यावे. मग आपल्याला आवडेल अशा मूर्तीविषयी मंत्र-विद्या श्रद्धापूर्वक ग्रहण करावी. एखाद्याला गणेश देवतेबद्दल प्रेम असेल तर सद्गुरू त्यास गणेशमंत्र सांगतात.''ॐ गं गणपतये नमः'' ''एखाद्याच्या घराण्यात किंवा संस्काराने त्यास भगवतीवर प्रेम असेल तर त्यास ॐ ऐं ऱ्हीं क्लीं चामुंडायै विच्चै'' असा मंत्र मिळतो. रामाबद्दल आकर्षण असेल तर ''श्रीराम जयराम जय जय राम'' असाही मंत्र मिळू शकतो, सांप्रदायिक त्या त्या संप्रदायाचे मंत्र देतात.

नागपूरहून प्रसिद्ध होणारे ''प्रज्ञालोक'' नावाचे द्वैमासिकात पूर्वी डॉ. ब.स. येरकुंटवार, प्रधान संपादक यांनी मंत्रशास्त्रावर विस्तृत व अभ्यासपूर्ण लेखमाला लिहिली होती. त्यात मंत्राचे शरीरावर, मनावर होणारे परिणाम, वातावरणावर होणारे परिणाम तसेच मंत्राचे प्रकार म्हणजे बीज मंत्र, वरदमंत्र, स्वयंभू मंत्र ह्या बद्दल उत्तम मार्गदर्शन मुळातूनच वाचावे.

संत एकनाथ महाराज ह्या संदर्भात म्हणतात-

**१) तेथे निजाधिकार प्राप्ते।**
**जे मूर्ति आवडेल आपणीयाते।**
**तेचि मंत्र विद्या तेथे।**
**श्रद्धा संभरिते अंगीकारावी।।**
**२) तेव्हा गुरुमुखे मंत्र वोजा। पुरुषोत्तम महापूजा।**
**शिकोनिया निजकाजा।**
**भजावे अधोक्षजा शिक्षिता मते।।**

*पान १५ वर...*



# आल्या अतिथां अन्न द्यावे

श्री. चैतन्य सहस्त्रबुद्धे, यवतमाळ, मो. ९९२३८५७८५८

ॐ भवति भिक्षाम् देही' असा आवाज आला आणि सावकाराच्या कपाळावर आठ्या पडल्या. आली शिंची कार्टी, माधुकरी मागायला. अगं तो परसातला दरवाजा घे लावून, नाहीतर आपल्याच दाराशी घोळका करून बसायची ही पोरे!' सावकार गरजले तसे स्वयंपाकघरातून त्यांची बायको बाहेर आली. त्याच्याकडे पाहून म्हणाली 'बाकी हे काम मी अजिबात करणार नाही. अहो, असे काय करता, दारी आलेल्या याचकाला अन्न देण्यासारखे पुण्य नाही. व्हा बाजूला' म्हणून ती लगबगीने पत्रावळीत अन्न वाढून समोर गेली. दारापाशी एक पाच-सहा वर्षाचा बटू ताटकळत उभा होता. त्याच्या झोळीत धान्य घालून वर परसातील झाडाचा एक मोठा पेरू देऊन ती माऊली त्या मुलाला म्हणाली,'बाळ, एखादा श्लोक म्हण पाहू !' गोरेपान व तरतरीत चेहऱ्याचे ते पोर चुणचुणीत होते. अंगावर पंचा गुंडाळून डोक्यावर गणेशटोपी घातलेली होती. ध्यान मोठे छान होते. बाईंनी श्लोक म्हणण्याचा आग्रह करताच त्यानेही आढेवेढे न घेता 'हो म्हणतो की!' म्हणत 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।' हा श्लोक दणकून म्हटला.

नाना सावकाराचे ते ऐकून पित्त खवळले. 'ए शहाण्या, माधुकरी मिळाली ना तूला ? मग आता कशाला थांबला आहेस ? हे श्लोक मंदिरात म्हण जा !' घरातून नाना सावकार ओरडले तसे ते येवढेसे पोर दचकले व इकडे तिकडे पाहू लागले. कौतुकाची थाप पडण्याऐवजी रागाने धाक घालावा तसे ते शब्द होते.

'यांच्या बोलण्याकडे लक्ष नको देऊस तू ! येत जा हो.' असे म्हणत सावकाराच्या बायकोने त्याची समजूत काढली व निरोप दिला. ती घरात आल्याबरोबर सावकारांची बडबड सुरू झाली. 'आपली श्रीमंती एवढी वर नाही आलेली की आले पोरं की घाल त्याच्या झोळीत धान्य, खानावळ काढली नाही आपण, अन्नछत्र नाही चालू केलेले फुकट सर्व द्यायला.'

एरवी शांत राहणारी सावकाराची बायको आज मात्र वैतागली. नाना सावकार स्वभावाने वाईट नव्हते. सांगलीमध्ये त्यांची पिढीजात सावकारकी चांगली चालत होती. गावात त्यांना मान होता. देवाधर्मावर त्यांचा विश्वास होता. रोज एखादं तास मन लावून पूजा करीत मात्र द्रव्य लोभापायी कोणाला काही द्यायचे म्हटले की त्यांच्या जीवावर येई. रोज माधुकरी घालण्याबाबत ते बायकोला वाट्टेल ते बोलत आणि हुज्जत घालीत. नवऱ्याच्या त्रासापायी ती लपवून मागील दारातून माधुकरी मागणाऱ्यांना अन्न घाली पण एरवी कामात गढून गेलेला सावकार माधुकऱ्यांचा आवाज आळीत ऐकू येताच सावध होई. दरवाजा लावून घेई. बरेच दिवस त्या बिचारीने कसेबसे हे सर्व सहन केले. आज मात्र तिला रहावले नाही.

'अहो काय करायची असली श्रीमंती. दारी आलेल्याला दान नाही. भुकेल्यास द्यायला अन्न नाही. मग करायचे काय ? मी तुम्हांला स्पष्टच सांगते मी माधुकरी देणार काय वाट्टेल ते होवो.'

तिरमिरीत सावकाराची बायको स्वयंपाकघरात गेली. नाना सावकार विचारात पडला. लोभी मनुष्य धन संचय करण्याकरिता भरमसाठ विचार करतो व त्याकरता वाट्टेल ते करण्यास यास कमीपणा वाटत नाही. बायको ऐकत नाही म्हटल्यावर त्याने विचार केला की असे काही तरी केले पाहिजे ज्यामुळे परस्पर माधुकरीवाले पोरं दुसऱ्या घरी जातील. आपल्या दाराशी फिरकणार देखील नाही. काय करावे बरे ? आणि त्याला

एकदम कल्पना सुचली. लगोलग त्याने त्यावर अंमल करायचे ठरवले. त्याच दिवशी संध्याकाळी रंगाऱ्याकडे जाऊन दोन्ही बाजूने लिहिता येईल अशी पाटी तयार करवून मजकूर रंगवून त्याने गुपचूप घरी आणून ठेवली.

दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे माधुकऱ्यांची वेळ झाली तसे नाना सावकाराने बायकोच्या नकळत दाराबाजूला पाटी लावली व तो निश्चिंत मनाने आत जाऊन बसला. माधुकऱ्यांची हाक ऐकु आली की सावकाराची पत्नी लगबगीने दारापाशी जाणार होती पण कोणीच दाराशी आले नाही. काल परवा आलेले ते लहानसे पोर सुद्धा दारासमोरून पुढील घरी जाताना सावकाराच्या बायकोने खिडकीतून पाहिले तसे तिने आवाज दिला 'काय रे, माधुकरी नको का तुला ?' 'नको?' 'का रे ?' दारावरची पाटी वाचली मी !'

'पाटी?'

'हो, अजून स्वयंपाक तयार नाही ना तुमचा' एवढे बोलून उदास चेहऱ्याने ते पोर निघून गेले.

बाईने हातची कामे सोडून आधी बाहेर येऊन पाटी पाहिली. आपल्या यजमानाने ही युक्ती करून ठेवली तर...

तेवढ्यात सावकाराने पाने घ्या असा आवाज दिला. निमूटपणे तिने पाटपाणी घेतले, सावकाराने मनसोक्त जेवून घेतले. हात धुवून पोटावर हात फिरवत ते बाहेर आले आणि दारावरची पाटी त्यांनी उलटी फिरवली. त्यावर मजकुर होता, 'जेवणं झालीत !'

बाराचा सुमार होता. माधुकरी मागणारे विद्यार्थी येतच होते. ती पाटी पाहून निराशेने पुढे जात होते. एव्हाना नानाच्या बायकोला सर्व परिस्थिती उमजून आली होती. पाटीच्या दोन्ही बाजूचा मजकुर तिला ध्यानात आला होता. मात्र तिला करता येण्यासारखे काहीच नव्हते. पाटी पाहून दारावरचा विद्यार्थी माधुकरी घेऊन आलेल्या नानाच्या बायकोस नको म्हणायला लागला.

पाहता पाहता महिना गेला. रोज सकाळी सावकार पाटी उलट सुलट करून माधुकऱ्यांना परस्पर वाटेला लावत व स्वतःच्या हुशारीची दाद देत. तेच त्याची बायको या प्रकाराने अतिशय दुःखी कष्टी होई.

अशातच नाना सावकाराचा मित्र त्यांना भेटावयास एकदा घरी आला. तो सद्गुरू ब्रह्मचैतन्य महाराजांचा शिष्य असून त्यांच्या दर्शनाला गोंदवल्यास वरचेवर जात असे. त्याचे व सावकाराचे संभाषण सुरू असताना सावकाराच्या पत्नीच्या मनात आले की आपल्या बोलण्याने व समजवण्याने तर यजमानांच्या वागणुकीत काडीमात्र फरक नाही. निदान सत्पुरुषाच्या दर्शनाने व त्यांच्या उपदेशाने तरी यांचा लोभ नष्ट होईल. तेव्हा सावकार कामानिमित्त आत घरात गेले असता त्यांच्या मित्रासमोर तिने सर्व परिस्थिती कानावर घातली. ती म्हणाली 'भावोजी, यांचा चिक्कुपणा काही कमी होत नाही. रोज माधुकरी मागणारे येऊन रिकामे माघारी जातात हे मला काही बघवत नाही. एकदा तुम्हीत्यांना तुमच्या महाराजांकडे तरी घेऊन जा. त्यांच्या उपदेशाचा तरी फायदा होतो का पहा !''

त्या मित्राने म्हटले'वहिनी, तुम्ही काही काळजी करू नका. आपण सर्वजण गोंदवल्यास जाऊ.' तेवढ्यात सावकार बैठकीत परत आले आणि सावकाराची पत्नी आत निघून गेली. दोन-एक दिवसात मित्र सर्व व्यवस्था करून नाना सावकाराकडे आला.

'नाना आम्ही गोंदवल्यास जातो आहे. या खेपेस तुम्ही दोघेही आमच्याबरोबर या, आम्ही गाडी ठरवली आहे. त्यात जागा आहे. तुम्ही चलाच, नाही म्हणू नका.'

आता मित्राने बोलावले आहे आणि त्यात आपल्याला काही पैसे लागणार नाही हे पाहून नाना सावकार एकदम कबुल झाले.

सांगलीवरून मंडळी निघाली. गोंदवल्यास आली. नानांच्या पत्नीला मोठा आनंद झाला. श्रीमहाराजांच्या कृपेने मोठमोठी माणसे शरण येऊन नाम घेऊ लागली. नामस्मरणाने भगवंत साक्षात् साहाय्य करतो वगैरे अनेक श्रीमहाराजांचे प्रसंग नानाचा मित्र सांगलीतून

निघाल्यापासून अविरत सांगत होता. त्यामुळे गोंदवले पोहोचेपावेतो सर्वांची उत्सुकता व श्रीमहाराजांचा आदर पराकोटी पर्यंत पोहोचला होता.

थोरल्या राम मंदिरासमोर टांगा उभा राहिला. सर्व मंडळी खाली उतरली. हात पाय धुवून रामाचे दर्शन घेतले. महाराज कोचावर बसले होते. बाजूला पटाईत मावशी, भाऊसाहेब फॉरेस्ट वगैरे मंडळी काही ना काही कामे करीत होती. महाराज कुठली तरी हकिकत सांगत होते. ती सर्वजण उत्सुकतेने ऐकत होती. ही मंडळी आल्याबरोबर श्रीमहाराज 'या सांगलीची मंडळी आली वाटतं' म्हणाले. नानांच्या मित्राने श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला. मग त्याने नानासाहेब सावकारांची ओळख करून दिली. सावकाराने उभ्यानेच नुसते हात जोडून नमस्कार केला. महाराज त्यांचेकडे वळून म्हणाले 'नानासाहेब, तुम्हाला एक सांगू का ?'

'काय महाराज, सांगा ना!' सावकार म्हणाले. तसे अंर्तसाक्षी सद्‌गुरू ब्रह्मचैतन्य महाराज म्हणाले 'नानासाहेब, आपण जी माधुकरी मागणाऱ्यांसाठी पाटी रंगवून घेतली आहे ती देवावरच्या आपल्या श्रद्धेला काही शोभत नाही. मारुतीराय तीन वेळा आपल्याकडे आले पण ती पाटी पाहून आणि त्यामागचा हेतू जाणून त्यांना माघारी जावे लागले. देव केव्हा आणि कशा रूपाने येतो ते सांगता येत नाही. गरजू व्यक्तीला अन्नाला नाही म्हणे यासारखे मोठे पाप नाही.'

महाराजांचे शब्द ऐकून सावकार तर गारठूनच गेले. त्यांची पत्नी सद्‌गदीत होऊन तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. स्वतः महाराजांचा शिष्य असलेला नानांचा मित्र देखील आश्चर्यचकित झाला. श्रीमहाराजांनी त्याच्या मनातील हेतू आधीच ओळखून आवश्यक ती उपाययोजना लगोलग केली होती. थोडे थांबून श्रीमहाराज म्हणाले 'नानासाहेब, दैवयोगाने आपल्याला असा माधुकरी मागून विद्या करण्याचा प्रसंग आला असता तर ही पाटी पाहून काय वाटले असते याची कल्पना करावी.'

सावकार पश्चाताप दग्ध झाले. त्यांनी श्रीमहाराजांना लोटांगण घातले. 'महाराज, मी चुकलो, आता मला पदरात घ्यावे. आणि या अपराधातून मुक्त होण्याचा उपाय सांगावा.' त्यावर श्रीमहाराज म्हणाले'नानासाहेब, अतःपर ती पाटी लावून आणि दर द्वादशीस बारा माधुकऱ्यांना भोजनास बोलवीत जावे.' सावकारांनी ही गोष्ट तत्परतेने मान्य केली. श्रीमहाराजांकडून अनुग्रह घेऊन ते नामाला लागले.

गोंदवल्यातील हा परमात्मा आणखीन एका जीवास आत्मोद्धाराची वाट दाखवता झाला. व्यक्तीच्या चित्तवृत्तीमध्ये केवळ शब्दांच्या सहाय्याने त्या ब्रह्मस्वरूप सद्‌गुरूनाथाने लिलया बदल घडवून आणला.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

---

*...पान १२ वरून*

अध्याय ३ ओवी क्र. ८०० ते ८५० मध्ये पूर्ण पूजा विधान सांगितले आहे. शेवटी ते म्हणतात मूर्ती ध्यानाने तन्मयता होते व ऐक्य भावाने वृत्ती निश्चल राहते.

ह्याशिवाय मानसपूजा ही सर्वश्रेष्ठ पूजा आहे. काहीही सामुग्री जवळ नसली तरी सर्व मनाने कल्पून भगवंताला अर्पण करावे तसेच सद्‌गुरूंना सुद्धा.

अशा रितीने गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने त्यांचे वाङ्मयीन स्मरण करणे आवश्यक आहे. कारण

**तो बहुतांचे पालन कर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।**
**नाना साधने समर्था। सद्‌गुरूपासी ।।५-२-५४ ।।**

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

## सुजन वाक्य

**धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ।।**

(मनुस्मृति ६-९२)

▶ धैर्य, क्षमा, दम, अस्तेय, शौच, इंद्रियनिग्रह, धी (विवेकबुद्धी), विद्या, सत्य, अक्रोध ही धर्माची दहा लक्षणे आहेत.

अध्यात्मातील गुढवादावर ग्रंथराज दासबोधाच्या आधारे प्रकाश टाकणारी लेखमाला...

# अध्यात्म रहस्य कथा

**श्री. वि. भा. अभ्यंकर, पुणे,** मो. ९८५०९०३८९३

भौतिकशास्त्रात नवीन कल्पना गृहीत तत्त्व म्हणून स्वीकारली जाते. त्यानुसार प्रयोग करण्यात येतात. येणारे निष्कर्ष प्रत्ययास आले तर त्याला सिद्धांताचे रूप प्राप्त होते. याच प्रमाणे पूर्वसुरींचा अनुभव गृहीत तत्त्व म्हणून स्वीकारावा. स्वानुभवाने प्रतिति पावली तर तो संबंध खरा. शेवटी आपला स्वतःचा अनुभव हाच सत्याचा निर्णायक निष्कर्ष. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत दोन दुव्यांमधील संबंधाचे नाव प्रतीत्यसमुत्पाद असे ठेवले आहे.

Mystein या ग्रीक शब्दाचा अर्थ ओठ मिटणे, मौन, न बोलणे. मुनेर्भावः मौनव। अथवा मुनींची स्थिती. अनुभव शब्दांनी पूर्णतः व्यक्त करता येत नाहीत. रसाळ मधुर आम्रफल सेवनातील आनंद तरी कुठे व्यक्त होऊ शकतो ? म्हणून पाश्चात्य पौर्वात्य अशा अखिल महानुभवांचा जो प्रवाह वाहतो आहे त्याची कांस धरावी. फ्लेटिनस, संत ऑगस्टीन, एकहार्ट, ज्ञानदेव, तुकाराम वगैरे प्लेटिनसशी साम्य साधत आपण ज्ञानेश्वरांना ज्ञानराज म्हणावे की योगिराज ? डान्टे प्रमाणे त्यांना कविराज म्हणावे की सेंट जॉन ऑफ क्रॉस प्रमाणे गूढवादी ? मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा यांची नॉर्विचची ज्युलियन, सिएनाची कॅथरीन व संत तेरेसा यांच्याशी असणारी साम्ये दुर्लक्षित कशी करणार ? आत्मनिष्ठता व वैषयिक प्रतीकांचा वापर, दोन्हीत दिसतोच. Pilgrim Progress 'वारीची प्रगती' हे काव्य लिहिणारा जॉन बुनयन व तुकाराम एकाच घरचे. आपण गणिती पायथागोरसशी परिचित आहोत. पण तत्त्वज्ञ पायथागोरस, राजकीय संघटना बांधणारा पायथागोरसचे थेट समर्थ रामदासांशी साम्य आहे. त्याचा पंथ अल्पायु ठरला, तर समर्थांचे अस्तित्व व भूमिकेवर आज गढूळ वावटळ उठत आहे. संत इग्नेशियस लॉयलानेही अध्यात्मिक व राजकीय विचार दिले आहेत. अर्थात त्यांची प्रधानक्रमतेतील स्थाने विभिन्न होती. समर्थांचा सामर्थ्यपूर्ण क्रियाशीलता व अध्यात्मिक जीवन एकत्र गुंफणारा मार्ग राइसब्रुक ही सांगतो. प्रत्येकाची बलस्थाने, वैशिष्ट्ये वेगळी आहेत इतकेच.

बुध्दिवादी डीन इन्गे ज्ञानप्राप्तीच्या मार्गाचे वर्णन करताना म्हणतो की हाच मार्ग आत्म्याचे विकासाचा मार्ग असतो.परंतु तो क्वचित वापरला जातो. त्यासाठी बुद्धी-भाव यापेक्षा वेगळे साधन नसते. खरे पाहता Intuition अंतःप्रेरणा बुद्धीला छेद देण्यासाठी कार्यरत नसते तर अनुभवविश्वाचा विस्तार करण्यासाठी असते असे मानणे योग्य ठरेल. चक्रवाढ व्याजाचे अथवा काळ काम वेगाचे गणित अंकगणितापेक्षा बीजगणिताने सोपे वाटते. तसेच Integral calculus मध्येही method of substitution गणित सोपे करते. बुध्दि-भाव-उत्कट इच्छा ही साधने व्यावहारिक प्राप्तीसाठी, ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक ठरतात. शिवाय त्यामागे Intutition अंतःप्रेरणा वा अंतःस्फूर्ती खंबीरपणे उभी असावी लागते. तिचे काही वेगळे नियम वगैरे असले तर पुर्वानुभवींकडूनच माहीत होणार.

सत्पुरुषांचे विचार अनुभव जमेस धरून, वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून, स्वानुभवाने पडताळून, चिकित्सक बुद्धी गहाण न ठेवता तिच्या मर्यादांचेही भान ठेवून, बुध्दिवादाचा वापर करून, अनुभूत ते स्वीकारून असा मार्ग आक्रमण करणे शक्य असल्याचे मानूया. बुध्दिभाव उत्कट इच्छा गरजेच्या असल्या तरी पुरेशा ठरू शकतीलच असे नाही. कारण अध्यात्मिक अनुभवाची प्रेरकशक्ती ही स्वतंत्र व स्वयंभू असून अंतःप्रेरित आहे. या शक्तीचे

अंतःस्फुरक रूप व अध्यात्मिक अनुभवाचे अनिर्वचनीयत्व एकत्र आल्याने सर्वत्र ऐक्य असूनही त्यास गूढत्व आले आहे. आत्मप्रत्यय हीच कसोटी. म्हणूनच हा गूढवाद साक्षात्कारवाद म्हटला जातो.

''गूढवाद वा रहस्यवाद वा गहनवाद या नावानी ओळखली जाणारी ज्ञानशाखा-ज्ञानपरंपरा ही एक प्रत्यक्ष, कालनिरपेक्ष, माध्यमरहीत, अंतःप्रेरित असे परमेश्वराचे आकलन असते.'' गूढवादाचा असा अर्थ घेतल्यास त्यास गुप्त, दुर्बोध, घबराट होण्यासारखे असे समजण्याचे कारण उरत नाही. हे सत्य साधारणपणे दूरस्थ, अप्राप्य मानले जाते, हा अपसमज आहे. प्रेमार्द्र शांत स्वस्थ असा विसावा ही मनाची सहजस्थिती आहे. एक अवर्णनीय आनंदानुभव स्थिती हा पूर्वासुरींचा अभिप्राय.

अखंडपणे अंतिम सत्याचे दर्शन, अनाहत नाद श्रवण होऊ लागते. असा संबंध जडला म्हणजे पारमार्थिक जीवन सुरू होते. मग बहुदा साधक योगभ्रष्ट होत नाही. असे अविचल जीवन हे ध्येय, असे ध्येय व प्राप्तीचा मार्ग तर्कविरोधी नसून तर्कपूरक बुध्दिगम्य आहे. अर्थात बुध्दिचातुर्य, बुध्दिविलास किंवा एक उच्च प्रकारची करमणूक किंवा टिंगल टवाळीचा विषय नव्हे. मार्गात बुद्धीचे साहाय्य दीर्घ उत्कटता याचे महत्त्व आहे. काही जण याला 'आत्मसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान' म्हणतात. याला गूढविद्या म्हटले तरी ही गूढ विद्या नाही, प्रकटविद्या आहे. मात्र ज्याला अनुभव आहे त्याला प्रकट त्याचे साधे बोलणेही आत्मनिवेदन आणि इतरांची ती पोपटपंची.

'प्लेटोची पत्रे' मधील सातव्या पत्रात तो म्हणतो 'ह्या विषयी मी स्वतःचे असे लिहू शकलो नाही न भविष्यात लिहेन.' हा विषय इतर विषयांप्रमाणे नाही. जर मी थोडं काही लिहू शकलो असतो तर मानव जातीची मोठी सेवा ठरली असती.'

व्यावहारिक ज्ञानासाठी, विज्ञान तंत्रज्ञानासाठी, काव्यादी सृजनासाठी बुध्दिभाव उत्कट इच्छा लागतात. अल्बर्ट आइनस्टाइन, युकावा सारखे वैज्ञानिक, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकरांसारखे कलावंत, सृजनप्रक्रियेत अल्पांशाने का होईना तत्कालिक निर्मम अवस्था प्राप्त होत असल्याचे मानतात. त्र्याऐंशी वर्षांचा अश्रद्ध चित्रकार पिकासो हेलन परमॅलीनला मुलाखत देताना म्हणाला 'नक्कीच काही तरी दैवी चमत्कार, बस दुसरा शब्दच नाही वापरता येत. लोक मला चूक म्हणोत पण जी चित्रं साऱ्यांना हलवतात त्याचे कारण अज्ञात देवाचा त्याला स्पर्श घडलेला असतो. हे सत्य.'

'केवळ सूत्रबद्ध लेखन, बुध्दिसामर्थ्य ही आत्मानुभूतीची लक्षणे होऊ शकत नाहीत' असे हेराक्लीटस म्हणतो. म्हणूनच रात्र-दिवस, तृष्णा-तृप्ती, सुख-दुःख ही ऐहिक द्वंद्वे सापेक्ष असून ती अंतिम सत्यास लागू होत नाहीत. ॲरिस्टॉटल Truth (सत्य) व Error चूक या संज्ञांबाबात असे म्हणतो की चुकीच्या पातळ्या/प्रती असतात, सत्याच्या नव्हे. सत्य एकमेवाद्वितीय, अपरिवर्तनीय असे असते. ते परमेश्वरात स्थित असते.

भक्तिमार्ग जसा भोळ्या-भाबड्यांचा नव्हे तसेच हा अनुभव गुढाचा नसून विवेकाचा आहे. म्हणून तर दासबोधात 'विवेक' हा शब्द अडीचशे वेळा आला आहे. अगदी सावधानतेने व खात्रीने विश्वाला धारण करणाऱ्या अध्यात्मिक शक्तीला रामानुजाचार्य 'अंतर्यामी' म्हणतात. तर शून्यलब्धी Calculus या गणितशाखेचा जनक लायब्नीट्झ, सृष्टीतील सकल वस्तुजात ज्यायोगे बांधले गेले आहे त्याला vinculum substrantitum म्हणतो. स्पेन्सर सारखे बुध्दिवादी अशी शक्ती मानायला तयार असतात. पण देव माझ्यासमोर देहधारण करून उभा राहीला तर मी तो खरा मानेन असं सांगतात. म्हणजे अगदी Reserve Bank of India ने दिलेली नोटही खरी नव्हे ! कारण RBI चे गव्हर्नर कुठं माझ्यासमोर येतात? असो.

सद्गुरू मार्ग दाखवतील, साधन देतील, त्याचा उपयोग ज्याचा त्याने करून घ्यायचा असतो. व्यावहारिक जीवनातही पाठ्यपुस्तके वाटाडे विकत घेतले तरी पडताळा स्वतःचा हवा. तत्त्वज्ञान केवळ बौद्धिक कसरत नव्हे तो एक अनुभवाचा विषय आहे. योग व भक्ती वरकरणी

विवाद्य, द्वंद्वात्मक वाटतात. पण योग बाह्यरंगी मानला तर भक्ती हा अंतरंगी गाभा आहे. एक क्रियाशील कृती तर दुसरे देव-मानवा संबंधी वाटणारी कृतज्ञता व प्रेम. मानवतेचे प्रेम हे प्रसंगोद्भव (incidental) अपघाताने (accidental) जन्मलेले नसून मूलभूत (essential) असते.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

*या लेखमालेसाठी घेतलेले संदर्भ-*


1) The Essential Mystics : Ed. Andrew Harve Castle Book N.J.
2) Sufis, Mystics and Yogis of India : Bankey Bihari, Bharatiya Vidya Bhavan
3) Devotional Poets and Mystics. Part I & II. Publication Div. Ministry I & B, Govt. of India
4) Sufis of Sindh : Dr. Motital Jotvani Publication Div.
5) Baba Farid : Balvant Singh Anand Sahitya Akadem, N.Delhi
6) Mystic Awareness - K. Ramkrishna Rao. Prasarranga, University of Mysore.
7) The Religion of Ravindranath Tagore and Sufi Mysticism in India. Dr. V.S. Naravane University of Pune.
8) Shaikh Nizamuddin Auliya : Khaliq Ahmad Nizami, National Book Trust
9) Mysticism in Maharashtra : R.D. Ranade
10) मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य डॉ. यु.म. पठाण, महा.राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
11) गुरुदेव रानडे चरित्र आणि तत्त्वज्ञान- शं.गो.तुळपुळे, यशवंत प्रकाशन पुणे.


## रघुवीर समर्थ मासिक सभासदांशी हितगुज

❁ 'रघुवीर समर्थ मासिक' प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टामार्फत पाठविले जाते.

❁ महिन्याच्या २५ तारखेपर्यंत मासिक न मिळाल्यास कृपया स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये चौकशी करावी.

❁ एखाद्या महिन्याचा अंक न मिळाल्यास २५ तारखेनंतर स्थानिक प्रतिनिधी अथवा सातारा कार्यालयाकडे संपर्क केल्यास आपणास दुसरी प्रत पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

❁ **अंकासंबंधी समस्या निवारणासाठी संपर्क –**
**श्री. रवि देशपांडे – ९४०५५४२४६१ (सातारा कार्यालय)**

❁ मासिकाची वर्गणी–
**वार्षिक वर्गणी– रु. १५०/–, चार वर्षांसाठी – रु. ५००/–आठ वर्षांसाठी – रु. १०००/–**

❁ कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

❁ मासिकाच्या कव्हर पाकिटावर आपल्या पत्त्याच्या खालील बाजूस वर्गणी संपण्याचा कालावधी दिलेला आहे. कृपया वर्गणीदारांनी तो पाहून एक महिना आधीच वर्गणी M.O. किंवा D.D. ने पाठवावी किंवा खालील बँक खात्यात आपण **चेकने** किंवा **ऑनलाइन** जमा करावी.

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सज्जनगड IDBI Bank, Satara City Branch,**
**बचत खाते क्र. 45110010830237 IFSC - IBKL 0000451**

❁ वर्गणी पाठविल्याची माहिती एका स्वतंत्र पोस्टकार्डवर किंवा ईमेल द्वारे किंवा एस.एम.एस. करून आपले संपूर्ण नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांकासहित कळवावी. ''**रघुवीर समर्थ**'' साठी असा उल्लेख करावा.

**❁ मासिकाची वर्गणी पाठविण्याचा पत्ता ❁**
**श्रीरामदास स्वामी संस्थान, सातारा कार्यालय**
**'चंद्रहास' प्लॉट नं. ३६ ब, सर्व्हे नं. ४६७/७ अ, उत्तेकरनगर, सदरबझार, सातारा ४१५००१.**
ई-मेल : raghuvirsmasik@gmail.com

अभंग योगवसिष्ठ

# वसिष्ठांचा सारा भर पुरुषकार-प्रयत्नांवर (लेखांक ४ था)

**श्री. वामन वा.कोल्हटकर** , फोन (०२०) २५४३८६६३, email - wavako@gamil.com

(विज्ञान मंदिर या फिजिक्स प्रयोगशाळेचे जनक) गणितमंदिर, कीर्तनशाळा, पुणे

पौरुष, पुरुषकार, प्रयत्न हे सारे समानार्थी शब्द आहेत. वसिष्ठांचा सारा भर या पुरूषाकारावर आहे. त्यांचा पक्का सिद्धांत आहे की प्रयत्नानेही मिळत नाही असे या त्रिलोकांत काहीही नाही. पिच्छा न सोडता चिकाटीने शास्त्रीय प्रयत्न करूनच बृहस्पती देवगुरू झाले. या धड्याच्या चौथ्या सर्गांत ते म्हणतात :

**पौरुषेण प्रयत्नेन त्रैलोक्यैश्वर्य सुंदराम् ।**
**कश्चित्प्राणिविशेषोहि शक्रतांसमुपागताः ॥१३॥**
**पौरुषेणैव यत्नेन सहसाम्भोरुहास्पदम् ।**
**कश्चिदेव चिदुल्लासो ब्रह्मतामधितिष्ठति ॥१४॥**
**सारेण पुरुषार्थेन स्वेनैव गरूडध्वजः ।**
**कश्चिदेव पुमानेव पुरूषोत्तमतांगतः ॥१५॥**
**पौरुषेणैव यत्नेन ललनावलिताकृतिः ।**
**शरीरी कश्चिदेवेह गतश्चंद्रार्धचूडताम् ॥१६॥**

हे श्लोक मला फार महत्त्वाचे वाटल्याने मुद्दाम मुळातलेच पत्त्यासह उधृत केले आहेत.

यांचा एकत्र अर्थ असा की इंद्र, ब्रह्मा, विष्णु, सदाशिव हेही पौरुषप्रयत्नाने त्या त्या पदांवर गेले आहेत. म्हणजे, तुम्ही आम्ही मनावर घेऊन दृढ प्रयत्न केले तर आपणही ती पदे भूषवू शकू. अर्थांत हे आवश्यक प्रयत्न बहुत जन्मांचे असणार यात वाद नाही. पण हेही खरे की एकच ध्यास धरून जन्मोजन्म सत्त्वशुद्ध तप करून तसे होऊ शकते. किंबहुना तसे महासंकल्प थोर महत्त्वाकांक्षा मनी बाळगून ज्या महान विभूतींनी पुरे केले तेच आजचे ब्रह्मा-विष्णु शिव आहेत. असे भगवान वसिष्ठ इथे सांगत आहेत. हे वाक्य स्पष्ट व्हावे म्हणून थोडे खोलातले लिहितो.

या सृष्टीत असंख्य ब्रह्मांडे आहेत हे आजचे सायन्सही मान्य करते. ती सारी ब्रह्मांडे एकदम चालतात. प्रत्येकी एक ब्रह्मा, समजा, अशा १०० ब्रह्मांडांसाठी एक विष्णु. या हिशेबाने विष्णुही अनेक. आणि याच पद्धतीने शंकरही अनेक एकाच वेळी काम करीत असतात. शिवाय ते विदेहमुक्त झाले की त्यांच्या जागी पुढचे ब्रह्मादी येत असतात. ते कोण असतात ? असेच महामहत्त्वाकांक्षी पुण्यात्मे. शुद्ध तप करून ते ते स्थान मिळवितात. तेच वसिष्ठ इथे सांगत आहेत. वरील श्लोक हे नुसते काव्यात्मक नाहीत. वसिष्ठांचे सांगणे नेहमी फार भव्य पातळीवर असते याचे हे एक उदाहरण.

आपल्यासारख्या सामान्यांची महत्त्वाकांक्षा चांगली नोकरी मिळावी. धंदा चांगला चालावा. कारखाना काढावा, कोणाला वाटते की निवडणुकीत निवडून येत येत वरपर्यंत जावे, त्यापेक्षाही काहींना वाटते की आपण शास्त्रज्ञ कलाकार वगैरे व्हावे, काहींना वाटते की आपण जग जिंकावे. काही सात्विक लोकांस वाटते की आपण जगत्कल्याणासाठी संत-महंत होऊन ईश्वराला त्याच्या कार्यात मदत करावी. तर काहींना थेट ईश्वरच व्हावेसे वाटते. या संदर्भातले काही इतिहास आपण याच योग वासिष्ठांत पाहणार आहोत. अर्थात महत्त्वाकांक्षा जेवढी अजस्त्र तेवढे ती पुरी करण्यासाठीचे प्रयत्नही अजस्त्र ! आणिकही एक महत्त्वाची गोष्ट या संस्कृत श्लोकांत वसिष्ठांनी जाता जाता स्पष्ट केली आहे ती अशी महत्त्वाकांक्षा बाळगून कोणीही प्राणी पौरूषाच्या बळावर वर उल्लेखिलेली श्रेष्ठतम पदे मिळवू शकतो. तो माणूसच पाहिजे असे नाही आणि पुल्लिंगी पाहिजे असेही नाही. इंद्र,शंकर होण्याबाबतच्या श्लोकांत, पूर्वीच्या कुठल्यातरी जन्मांत स्त्री असलेल्या व्यक्तींनी महत्त्वाकांक्षा आणि महाप्रयत्न यांच्या बळावर इंद्रपद, शिवपद प्राप्त करून घेतले असेच स्पष्ट म्हटले आहे... असे भव्य विचार झेपणे, पचणे आपल्याला संवय नसल्याने कदाचित पहिल्यांदा

थोडे जड जाईल. पण जसजसे आपण या ग्रंथाला नीट समजून घेऊ तसतसे मनाचे मळभ दूर होत जाऊन विषय स्वच्छ डोळ्यासमोर येऊ लागेल.असो. इतके बोलणे होते तो पहिला दिवस समाप्त झाला आणि दुसऱ्या दिवशी सूर्योदयाला रामासह सर्वसभा आतुरतेने वसिष्ठांचा बोध ऐकण्यास उपस्थित झाली..

इथे एक गोष्ट नमूद करायला हवी की त्या वेळी तिथे उपस्थित असलेल्या वाल्मिकी ऋषींनी, 'आज वसिष्ठांनी काय सांगितले' त्याचे केलेले निरूपण म्हणजे हा ग्रंथ. त्यामुळे त्यात प्रत्येक दिवस संपल्याची नोंद आहे. असे सुमारे २३ दिवसांपर्यंत आहे. नंतरचा ग्रंथ वाल्मिकींनी दिवस संपल्याचे न नोंदविता पुरा केलेला दिसतो. आकारावरून, ते पुढचे दिवस ८-१० असावेत. असो.

वसिष्ठ प्राक्तन म्हणजे दैव आणि पौरुष म्हणजे प्रयत्न याबद्दल कशी वर्णने करतात पहा :

**प्राक्तन ऐहिकयत्न ते एडके।**
**एकमेकांसी ते झुंजताती।**
**ऐहिकप्रयत्न करोनी शास्त्रीय।**
**जिंकूनि प्राक्तन सुखी व्हावे।।**
**प्राक्तन ऐहिक हे दोन वृक्ष।**
**छेदिता एकास अन्या बळ।।**
**ऐहिकप्रयत्ने छेदी न जो अन्या।**
**पारावार दैन्या नसे त्याच्या।।**
**विषयलंपट मूढ सत्प्रयत्न।**
**न करिता दीन होती स्वये।।**
**मग मूढभावे दैव बलवान।**
**म्हणती परी कर्म आपुलेचि।।**
**दृश्य कर्मालागी म्हणती प्रयत्न।**
**अदृश्य कर्मासी म्हणती दैव।।**
**दैव नांवे कोणी न मनमाने भूत।**
**पूर्वकृत यत्न तेंचि दैव।।**

पण प्रयत्न करताना एक पथ्य महत्त्वाचे- प्रयत्न हा उद्वेगरहित हवा.

**वासुदेव म्हणे उद्वेगरहित। यत्न होई सिद्ध सिद्धांत हा।।**

बलवंत हा नेहमी विजयी होत असतो. त्यामुळे दैव आणि प्रयत्न यात जे अधिक बलवान ते विजयी होणार यात नवल नाही. पण, हे तर खरे की दैवाचे बल पूर्वीच निश्चित झालेले असते. मात्र प्रयत्नाचे बळ आपल्याला चिकाटी, चातुर्य, विवेक, मनाचा खंबीरपणा इ.गुणांनी वाढविता येते.

वसिष्ठ म्हणतात :

**आळशी ते भ्याड लपुनी दैवाआड कष्टताती।।**

आळशीपणा किंवा अधर्म्य-चुकीचे वागणे हे कारण नसता, आपल्या दुष्ट प्राक्तनाचे बळ वाढवीत असतात. वसिष्ठ अनुभवार्थ स्वतःचाच निर्वाळा देऊन प्रयत्नांचे श्रेष्ठत्व पटवून देतात. ते सांगतात :

**झुगारूनि दैवा याचि गाधिराजे।**
**ब्राह्मण्य प्रयत्ने संपादिले।।**
**आकाशगामित्व तेवि मुनिपद।**
**लाभले आम्हास पौरुषेचि।।**
**त्रिभुवनी सत्ता लाभली दैत्यांसी।**
**कांस उद्योगाची धरिल्यानेचि।।**
**पौरुषबळेचि देवही विजयी।**
**दानवांते पाही जिंकुनिया।।**

(गाधिराज म्हणजे विश्वामित्र. ते क्षत्रियकुळांत जन्मलेले. परंतु एका प्रसंगाने त्यांना ब्राह्मणपणाचे महत्त्व कळले. मग ते पुण्यप्रयत्न करून त्याची देही त्याची डोळा ब्रह्मर्षी झाले... जातीच्या कार्डावर खोटी नोंद करून नाही आणि दादागिरी करूनही नाही. तर शास्त्रीय मार्गाने योग्य ते तप करून)

**परब्रह्म आणि नियती**

परब्रह्म नित्य आहे. निरंजन आहे. निरवयव आहे. निर्गुण आहे. निराकार आहे. पण ते सद्रूप आहे. चिद्रूप आहे. त्यात 'आहेपणा' आहे म्हणून त्याला सद्रूप आहे असे म्हणायचे. ते चैतन्यमय आहे म्हणून त्यास चिद्रूपत्व आहे असे म्हणायचे.

नियती बद्दल वर्णन करताना वसिष्ठ म्हणतात की-

**पदार्थरूपी सत्य नियति असे।।**

पदार्थ तो की ज्याला या त्रिगुण, पञ्चभूते यांनी तयार झालेल्या विश्वांत काही व्यावहारिक अर्थ असतो. थोड्याशा शास्त्रीय परिभाषेत बोलायचे तर जो द्रव्य, गुण,कर्म, सामान्य, विशेष समवाय आणि अभाव यापैकी काहीतरी एक असतो तो पदार्थ. पदार्थांबाबत कार्यकारणाचे नियम अचल म्हणजे न बदलले जाणारे असतात. उदाहरणार्थ पाणी हे धातूच्या भांड्यात साठविता येते. वर्तमानपत्राच्या कागदाच्या खोळीत ते साठवून ठेवता येत नाही. हे दोन्ही निसर्गनियम आहेत. त्यांना नियती असे म्हणायचे. कारण, असे का घडते ते कोणत्या तरी कार्यकारणभावाने स्पष्ट करता येते. पदार्थ विशिष्ट तऱ्हेने का वागतात याचा कार्यकारणभाव देता येतो. वसिष्ठ सांगतात की परब्रह्म हे पदार्थ नाही. ते स्वतः कोणत्याही कार्यकारण भावात बसत नाही पण ते विश्वातील सर्व कार्यकारण भावांचे पायाभूत अधिष्ठान आहे. पदार्थ आहेत म्हणून विश्व आहे. आणि ब्रह्म हे विश्वाचा मूलाधार आहे. विश्व असते तेव्हा त्याचे आधारभूत असे ब्रह्म असतेच. तेव्हाही ते त्याच्या, वर उल्लेखलेल्या सर्व वर्णनाबरहुकूमच असते आणि विश्वसृष्टीचा उदय वा अस्त झाला तरीही ते आहे तसेच असते. पण त्याच्या आधारावरच विश्वभ्रमाचा नियतीचा कारभार चालू असतो. नियती म्हणजे, हा विश्वपसारा ज्या नियमांनी चालतो ते नियम. त्यांचा कोण्या एका व्यक्तीच्या सुखदुःखाशी संबंध नसतो आपण अमुक अमुक कायिक, मानसिक किंवा बौद्धीक प्रयत्न केले तर विशिष्ट परिस्थितीत अमुक अमुक फळ मिळणार या बाबतचे नियम म्हणजे ही नियती. किती अग्नीने कोणास किती चटका द्यायचा हे ठरविते ती नियती. गुरूत्वादी सृष्टनियम ही नियती. यानंतर वसिष्ठ जाता जाता आपला थोडा इतिहास सांगतात. ते म्हणतात–

**सर्वप्रकाशक मायाधार एक।**
**प्रगटे तरंग तोचि विष्णु।।**
**विष्णुहृदयी त्या मेरू हाचि दण्ड।**
**दिग्दले केसर तारका त्या।।**
**कमळांत ऐशा उत्पत्ति ब्रह्मयाची।**
**निर्मियेली सृष्टि विविध तेणे।।**

अशी ही सृष्टी पुढे विस्तारत गेली. पण राग,लोभ इ.मनाचे आणि मग शरीराचे आजार, जयापजय आळस, दारिद्र्य अशा अनेक दुरवस्थांमुळे लोक दुःखाने होरपळू लागले. सुखसोयी, सत्तीर्थे यांचा अशा दुःखापासून मुक्त होण्यास काही उपयोग नाही. तपादिकांचाही काही उपयोग नाही. मूळ ज्ञानच या दुःखापासून सोडवू शकेल हे ओळखून परब्रह्माच्या एका लाटेतून त्याने मला जन्मविले. मी लोकांस ज्ञानदान करावे म्हणून. परब्रह्मरूपांतच वृत्ती स्थिर असलेल्या मला ब्रह्मदेव म्हणाले :

**प्रवेशे चंद्रात कलंक त्यापरी ।**
**अज्ञान क्षणभरी बाधो तुज ।**

असे मला ज्ञान शिकविण्यासाठी माझ्या बाबांनी मला मुद्दाम अज्ञानी केले आणि नंतर ज्ञानदान केले.

कृतयुगात सर्व लोक ज्ञानसंपन्न होते; पण पुढे पुढे लोभ, काम, क्रोध इ.च्या आहारी लोक जाऊ लागले म्हणून त्यांना वठणीवर ठेवण्यासाठी राजधर्म आणि राजे बाबांनी निर्माण केले. पण पुढे ते राजेच स्वधर्म सोडून प्रजेला छळू लागले..

रामा, हे आत्मज्ञान ज्याला आहे, तो कधीही मोहात न पडता स्वधर्म पालन करून जनकल्याणही करू शकतो असे दाखवून देण्यासाठी श्री विष्णूलाच शापनिमित्ते तुझ्यारूपाने बाबांनी आणले आहे. तुझ्यासारखा श्रेष्ठ शिष्य आणि माझ्यासारखा वाकबगार गुरू असा हा महायोग जुळून आला आहे. रामा, विवेकाला वैराग्याची जोड देऊन हे ज्ञान पचनी पडू शकते.बाबा रे,

**अत्यंत विषम स्थिती या संसाराची।**
**थोरही कीटचि ज्ञानाविण।।**

म्हणून हे ज्ञान आत्मसात करणे फार उपयोगी. नव्हे नव्हे आवश्यकच आहे. हे ज्ञान समजून घेण्यास बुद्धी सुसंस्कृत करणे आवश्यक आहे. म्हणून शास्त्राभ्यास उपयोगी पडतो.

**प्रमेय, प्रमाण, प्रमाता व प्रमाज्ञान**

प्रमेय म्हणजे जे नेमके जाणून घ्यायचे आहे ते. प्रमाणे

म्हणजे ज्यांच्या सहाय्याने समजून घेण्याचा विषय खरा की खोटा, आपण जे जसे समजून घेतो आहोत ते बरोबर की चूक, ह्याचा योग्य तो परामर्ष करण्यास लागणारी तत्वे. प्रमाता म्हणजे ज्ञान समजून घेण्यास पुढे सरसावणारे आपण आणि जे बरोबर, गफलत न होऊ देता, जसे मूळ आहे तसे समजून घेतले आहे ते प्रमाज्ञान.'प्रमा' म्हणजे जे जसे आहे तसेच ते समजून घेण्याची बुद्धीची शक्ती.

कोणतीही गोष्ट शिकायला-आत्मसात करायला जी शिस्त असावी लागते त्यासाठीची आवश्यक बैठक या चारात सामावलेली आहे. वादविवादासाठी एखादी गोष्ट अभ्यासणे वेगळे आणि एखाद्या जिवंत किंवा ग्रंथरूप गुरूचरणी लीन होऊन,'शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।' अशा भावनेने ज्ञानार्जनास प्रारंभ करणे वेगळे. शंका कोणत्याही विचाराव्या. रामानेही वसिष्ठांचा पारा चढू शकेल अशा अनेक शंका या ग्रंथात विचारलेल्या दिसतील. पण त्यामागील हेतू वितंडवाद घालीत बसणे हा नसून आचरण करिता येण्याइतपत नीट समजून घेणे हाच होता. म्हणून वसिष्ठांनीही विराट गुरूचे रूप घेऊन विविध स्तरावरून, पौनःपौन्याला न कंटाळता, कधी प्रात्यक्षिके दाखवून, रामास उत्तरे दिली. यातील जवळजवळ सर्व निरूपण हे वसिष्ठांचे स्वानुभवकथन आहे आणि ते अनुभव इतके अफलातून आहेत की अभ्यासक अंतर्मुख होतो आणि त्या अनुभवातील अगदी अस्सल अशी,'प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि,' अशा सर्व प्रमाणांची बेमालूम गुंफण अभ्यासकास हळू हळू प्रमाज्ञानाच्या मुक्कामी घेऊन जाते. दृष्टांताची खैरात मात्र वाचकास बरेचदा दमविते. पुढे ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इ.मराठी ग्रंथांनी हीच 'उपमा'पद्धत आपल्या ग्रंथ निरूपणास वापरल्याचे दिसते. बरेचदा दृष्टांतही या योगवासिष्ठातलेच दिसतात. प्रमाणांच्या संदर्भात बोलताना मुनीवर्य म्हणतात-

**दृष्टावबोधे ज्या अननुभूत ज्ञान। दृष्टांत त्या नाम ज्ञाते देती।। प्रकाशाविण न बोध पदार्थाचा। दृष्टांताने तैसा ज्ञानबोध।। दृष्टांत ते जाणे एकदेशी नित्य। जाणावे तात्पर्य दृष्टांताने।। वासुदेव म्हणे पूर्ण दृष्टांत न। होण्या ब्रह्मज्ञान अवनीवरी।।**

वसिष्ठ म्हणतात-

**वेदवाक्य तेंचि परिणामी सत्य। हित मित पथ्य तेंचि एक।। सर्व वेदांताचे सार ब्रह्मज्ञान। तेंचि साध्य जाण दृष्टांतासी।। यास्तव सर्वदा साध्यावरी दृष्टी। ठेवूनी कुतर्की जाऊ नये।। अभ्यासके व्हावे विचारप्रवण। रुजवावे सौजन्य शास्त्राभ्यासे।। संतसंगे तीक्ष्ण करूनिया बुद्धी। तुर्येची विश्रांती संपादावी।।**

हे सारे सांगण्याआधी वसिष्ठांनी शम, संतोष विचार आणि सत्संगाची जरूरी हे शास्त्र समजण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. ते म्हणतात -मोक्षाच्या द्वारावर चार द्वारपाल आहेत.. शम, विचार, संतोष व सत्संगम. यापैकी किमान एकाला तरी हाताशी धरावे लागते असे त्यांचे म्हणणे. शम म्हणजे हो काय ? मनासह अंतर्बाह्य इंद्रियावर ताबा असणे हा शम. विचार म्हणजे विषय समोर आले की त्यातील नित्य-स्थिर समाधान देणारे कोणते आणि अनित्य-तात्पुरते सुख देणारे कोणते, कल्याणकारक काय आणि खड्ड्यात घालणारे काय हे त्रयस्थ दृष्टीने बिनचूक ओळखण्याची शक्ती. संतोष म्हणजे हावरट बनून आपले समाधान उगाच न गमविणे. आपले बरेच सुख-समाधान आपण खोटी प्रतिष्ठा, फुकटची मिजास करणे, लोकांत छाप पाडणे, स्वतःस कोणीतरी वेगळे समजणे, पदोपदी आपला मान मरातब रहावा, स्पर्धेत आपण नेहेमी पुढे असावे. असे, थोडक्यात. इतर जगाच्या तुलनेवर आपले सुख समाधान बेतत असतो. वस्तुतः अन्नवस्त्रादी दैनंदिन गरजांच्या फार बाहेर आपला संतोष जायची गरज नाही. मुलेच मनासारखे वागत नाहीत, सुनांचे अमके अमके लाड पुरविता आले नाहीत, चारधाम यात्रा राहिली. वखवखीपोटी असंतुष्ट रहायला कारणे अनंत! आत्मकल्याणाचा विचारही मनी येत नाही. काय म्हणावे या स्थितीला ? टांगटिंग टिंगा की टांग टिंग टिंगा! इथे हा ४ था लेख थांबवितो.

।।जय जय रघुवीर समर्थ।।



संत तुकाराम महाराजांचे साखळीचे बारा अभंग

# तुका म्हणे (अभंग ७ वा)

सौ. माधुरी दि. जोशी, बुलढाणा, मो. ९८२२१९०९६३

**अभंग -७**

**ओळखा रे वस्तु सांडा रे कल्पना।**
**नका आडराना जाऊ झणी ।।१ ।।**
**झणी जाल कोठे बुडवाल हीत।**
**विचारी मनांत आपुलीया ।।२ ।।**
**आपुलीया जीवे शिवासी पहावे।**
**आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।।३ ।।**
**घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे।**
**भूती लीन व्हावे तुका म्हणे ।।४ ।।**

आत्मवस्तूला ओळखताना कल्पनेच्या पलीकडे जावे लागते. अर्थात कल्पनेला सांडावे म्हणजे नाहीसे करावे लागते. परंतु कल्पना नावाची शक्ती अशी प्रभावशाली आहे की ती कल्पनेतच मानवाला गुंतवून ठेवते. व कल्पनातीत असणाऱ्या आत्मवस्तूशी एकरूपता होऊ देत नाही. वास्तविक पाहता आत्मवस्तूला शब्द ज्ञानाने जाणण्यासाठी कल्पनाच मदत करते. कल्पनेचे २ प्रकार ग्रंथात वर्णिले आहेत.

परमार्थात मदत करणारी एक संवादी कल्पना व परमार्थापासून दूर नेणारी संसारात अडकवणारी विसंवादी कल्पना. विचाराच्या माध्यमातून साधना करायला लागल्यावर विसंवादी कल्पना जीवाला छळते व परमार्थात प्रतिबंध निर्माण करते. त्याच सूक्ष्म गोष्टीचा ऊहापोह तुकाराम महाराज या अभंगात करीत आहेत.

कल्पना नावाची एक अफाट शक्ती मानवाजवळ आहे. तिचा योग्य प्रकारे वापर करून मानव कल्पनातीत अशा आत्मवस्तूला ओळखू शकतो. परंतु साधना करताना तीच कल्पनाशक्ती प्रपंचाकडे सुसाट वेगाने धावत सुटते. त्या प्रापंचिक प्रवाहात माणूस कसा अडकतो हे त्याचे त्यालाही उमगत नाही. त्यामुळे आत्मवस्तूपासून तो फार फार दूर राहतो.

**मना कल्पना धीट सैराट धावे**
**तया मानवा देव कैसेनि पावे**

असे समर्थ मनाचे श्लोकात (१०४) स्पष्टच म्हणतात. समर्थ कल्पनेचे २ प्रकार १७२ व्या श्लोकात सांगतात.

**स्फुरे विषयी कल्पना ते अविद्या ।**
**स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।।**
**मुळी कल्पना दो रुपे तेचि झाली**
**विवेके तरी सस्वरुपी मिळाली ।।१७२।।**

समर्थ, विषयी कल्पनेला अविद्या व ब्रह्म कल्पनेला सुविद्या म्हणतात, संसाराबद्दल च्या कल्पना करीत राहणे हीच अविद्या किंवा विसंवादी कल्पना व ब्रह्माविषयी कल्पना करणारी सुविद्या किंवा संवादी कल्पना होय. संवादी कल्पना देवाकडे न्यायला मदत करते तर विसंवादी कल्पना संसाराकडे खेचते. अनेक जन्मांच्या संस्कारामुळे संसाराची ओढ सहजच असते व ह्या ओढीमुळे किंवा आसाक्तीमुळे संसाराचे विचार (कल्पना) सहजच स्फुरत राहतात. परंतु त्या विचारांना आळा घालून, देवाविषयीची कल्पना जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक करावी लागते. श्रीगुरु किंवा देवाची मानसपूजा, मनाने शास्त्राचे किंवा गुरू उपदेशाचे केलेले चिंतन, कल्पनेनेच तीर्थक्षेत्री जावून तिथल्या पवित्र वातावरणात रममाण होण्याचा प्रयत्न करणे बहिर्मुख धावणारी वृत्ति अंतरात्म्याकडे म्हणजेच मुळाकडे वळविण्याचा प्रयत्न करणे ह्या सर्व गोष्टी संवादी कल्पनेमध्ये मोडतात असे शास्त्र सांगते.

अशुध्द कल्पनेमुळे पाप व शुध्द कल्पनेमुळे पुण्य, अशुध्द कल्पना म्हणजे नकारात्मक विचार तर शुध्द कल्पना म्हणजे सकारात्मक विचार. शुध्द कल्पनेमुळे समाधान तर अशुध्द कल्पनेमुळे बंधन असा हा मनाचा खेळ सतत

सुरू राहतो. ह्या खेळातून बाहेर पडून मनाला, कल्पना शक्तीला परमेश्वरी अनुसंधानात गुंतविण्यासाठी आपले बळ कमी पडते, त्यासाठी समर्थांची प्रार्थना उपयोगी पडते. स्वतः समर्थ तुमच्या आमच्यासाठी करूणाष्टकात म्हणतात,

**मनी कामना कल्पना ते नसावी।**
**कुबुद्धी कुडी वासना नीरसावी।**
**नको संशयो तोडी संसार वेथा।**
**रघुनायका मागणे हेचि आता।।**

किंवा

**मन हे आवरेना की वासना वावरे सदा।**
**कल्पना धावते सैरा, बुद्धी दे रघुनायका।।**

सांसारिक कल्पनाशक्तीला थोपविण्यासाठी आपल्या प्रयत्नाबरोबरच परमेश्वराची प्रार्थना करणे अगत्याचे आहे. वैराग्याशिवाय ह्या काम-क्रोधादी विकार व कल्पनाशक्तीला आवरणे कठीण जाते. म्हणून समर्थांची प्रार्थना करताना उद्धव स्वामी म्हणतात-

**नको काम हा क्रोध चांडाळ पापी।**
**नको मोह तैसा मद क्रूर रूपी।**
**मना कल्पनेपासूनी सोडवावे।**
**समर्था मला पूर्ण वैराग्य द्यावे।।**

वैराग्य कमी पडत असल्याने विषयांकडे कल्पना धाव घेते. ही अशुद्ध कल्पना रामभेटीला अडथळा निर्माण करते. समर्थ एके ठिकाणी म्हणतात।

**मना कल्पना कल्पिता कल्पकोटी।**
**नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी।।५९।।**

तुकाराम महाराजही ह्या अभंगात तेच सांगतात.

**ओळखारे वस्तु सांडारे कल्पना।**
**नका आडराना जाऊ झणी।।१।।**

प्रपंचाची आसक्ती हेच आडरान होय. नुसता प्रपंच आडरान ठरत नाही. पण त्याची आसक्ती मात्र त्यातून बाहेर पडू देत नाही. एखाद्या दाट जंगलात माणूस गेला की त्याला तेथून कसे बाहेर पडावे समजत नाही किंवा चिखलात रूतला की बाहेर निघणे फार अवघड जाते. तो जो जो बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो तो तो त्यात अधिकाधिक फसतच जातो. त्याचप्रमाणे प्रपंचासक्तीच्या दलदलीत माणूस अधिक फसत जातो. प्रपंचाविषयीचे मी-माझेपण हे फार घातक ठरते. देह म्हणजे मी व देहादी प्रपंच माझा ही कल्पना जेवढ्या लवकर नाहीशी होईल तेवढ्या लवकर त्या आडरानातून आम्ही बाहेर पडू. म्हणून प्रपंचाचं मिथ्यत्व ओळखून त्याच्याविषयी वैराग्य निर्माण व्हायला हवं.

प्रपंचात गुंतले, प्रपंच सत्य वाटू लागला की मनुष्य आपले हित साधू शकत नाही. मग पुन:पुनः जन्ममरणाच्या चक्रात तो अडकतो आणि म्हणून आताच मनात विचार करा असे तुकोबा म्हणतात.

**झणी जाल कोठे बुडवाल हीत।**
**विचारी मनात आपुलीया।।२।।**

मनाने संसाराच्या कचाट्यात सापडले की ते मनच मग बंधनाला कारणीभूत होते. म्हणून देहाने प्रपंच करावा व मन भगवंताच्या अनुसंधानात ठेवावे असे गोंदवलेकर महाराज म्हणतात. आपले नेमके उलटे होते. देहाने परमार्थविषयक गोष्टी (पूजा,पाठ,वाचन,पारायण, तीर्थयात्रा,दानधर्म) करतो व मनाने प्रपंचाच्या चिंतनात अडकतो. महाराज सुंदर दृष्टांत देतात. जात्याच्या दोन पाळ्या असतात. वरची पाळी सतत फिरत असते व खालची पाळी खुंट्याला स्थिर असते. तसे देहाने प्रपंचाची कर्तव्ये करीत फिरावे पण मन मात्र परमेश्वराच्या नामरूपी खुंट्याजवळ स्थिर ठेवावे. असे करण्यातच आपले हीत दडले आहे.

**मना कल्पना वाऊगी ते न कीजे।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे।।**

असे समर्थ म्हणतात. प्रपंचात सुख आहे ही कल्पना वाऊगी आहे. ती पालटली पाहिजे.

**विवेके कुडी कल्पना पालटीजे**

म्हणून प्रपंचातील लक्ष काढून भगवंताकडे लक्ष लावता यायला हवे. अर्थात हे सांगणे, वाचणे, लिहिणे जेवढे सोपे आहे तेवढेच ते करणे मात्र महाकठीण आहे. मन किंवा

कल्पना अशी काही वस्तू नाही की ती हातात धरून ह्या टोपलीतून दुसऱ्या टोपलीत टाकायची. मन देवाकडे लावणे, अत्यंत अवघड आहे; त्यासाठी सतत अभ्यास (प्रयत्न) व वैराग्य तसेच प्रार्थना ह्याची आवश्यकता आहे. म्हणून ज्या ज्या वस्तू, पदार्थ, व्यक्तीवर मन जाईल त्या त्या वस्तू,पदार्थ, व्यक्तीच्या नाम, रूप, गुणाला बाजूला सारून त्याच्या मागे असणाऱ्या अस्ति भाति प्रियाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करावा असे शास्त्र वा संत, गुरू सांगतात. अस्ति, भाति, प्रियाच्या पाठीमागे म्हणजे मुळाशी सत्, चित् आनंद नावाचे तत्त्व दडलेले आहे. त्या तत्त्वाचा वेध घ्यावा. सातत्याने अशा प्रकारे वृत्ती मुळाशी नेल्यास नाम-रूपादी जगताकडील लक्ष हळूहळू कमी होऊन आत्मचिंतन वाढीस लागेल. एक प्रसिद्ध श्लोक आपण नेहमी म्हणतो. पण त्याचे गांभीर्य हवे तसे जाणले जात नाही.

**ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे**
**त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे**
**मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी**
**तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ।।**

हा श्लोक आम्ही फार लहानपणापासून तोंडपाठ म्हणत असतो. पण त्याचा अर्थ मात्र जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. ज्या ज्या ठिकाणी माझे मन जाईल त्या त्या ठिकाणी नामरूप बाजूला केले तर तुझे निजस्वरूप, आत्मतत्त्व लपून राहिलेले आहे. त्या आत्मतत्त्वाला नमस्कार असो असा त्याचा भावार्थ सूचित होतो. व्यतिरेक बोध व अन्वय बोध ह्या दोन्ही बोधांचा शास्त्रानुसार वापर करून मनाने निजवस्तूकडे झेपावे असे संत सांगतात. समर्थांच्या दोन ओव्या या संदर्भात फार बोलक्या आहेत.

**अरे जो चंचळास ध्याईल । तो सहजचि चळेल ।**
**जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ।।११/२/३९ ।**
**जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल ।**
**जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ।।११/२/३७ ।।**

वस्तूच्या बाह्यांगाचा विचार न करता वस्तू ज्या अधिष्ठानावर कळते त्याच्यावर लक्ष केंद्रित करण्याचा अभ्यास करावा लागेल. म्हणजे वृत्तीज्ञानामध्ये प्रवाहित न होता असलेल्या ज्ञानाकडे वृत्ती वळवावी लागेल. होणारे ज्ञान हे तात्कालीक व बदलणारे असून असणारे ज्ञान हे स्थायी स्वरूपाचे आहे. स्थायी स्वरूपावर लक्ष केंद्रित करण्याची सवय जडवून घेतली तर आत्मचिंतन घडू लागेल व त्याचा परिणाम म्हणून आत्मभाव जागृत होईल. आत्मभाव जागृतीतून आत्मानुभव येईल म्हणून महाराज पुढे म्हणतात,

**आपुलीया जीवे शिवासी पहावे ।**
**आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।।३ ।।**

आत्मवस्तुचा शोध घेण्यासाठी विचारसाधना सद्गुरू सांगतात. देहोऽहं ह्या कल्पनेच्या ऐवजी शिवोऽहं ही कल्पना (विचार) तेथे उपयोगी पडते. ज्ञानेश्वर माऊली या संदर्भात सांगतात,

**परतोनि पाठीमोरे ठाके । आणि आपणीयांते आपण देखे ।**
**देखतखेंवो वोळखे । म्हणे ते तत्व मी ।।६/३६६ ।।**

समर्थांची उक्ती यापेक्षा काही वेगळी नाही.

**ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।**
**पहावे आपणासी आपण । या नांव ज्ञान ।।**

आपणीयांते आपण देखे, किंवा पहावे आपणासी आपण व तुकोबांचे वरील अभंगातील ‘आपुलीया जीवे शिवासी पहावे त्या तिन्ही चरणांचा मतितार्थ एकच निघतो. पहिला आपण जीव ह्या अर्थाने वापरला असून दुसरा आपण शिव ह्या अर्थाने वापरल्याचे लक्षात येते. आपणच आपले स्वरूप पाहण्यासाठी मागे मागे जात गेल्यास आपणच शिवस्वरूप आहोत हे लक्षात येते. देह म्हणजे मी नाही तर देहाला पाहणारा मी देहापासून वेगळा आहे. इंग्रजीमध्ये आम्ही My Body असे म्हणतो ? I Body असे म्हणत नाही. म्हणजेच मी शरीर नाही तरी शरीर माझे आहे. माझा हात, माझा पाय, माझं डोकं, माझं शरीर अशी शब्दरचना आपण करतो. जे जे माझं आहे ते ते मी नाही असे संत आम्हाला सांगतात.

**माझे शरीर ऐसे म्हणतो। तरी तो जाण देहावेगळाचि तो।**
**मन माझे ऐसे जाणतो । तरी तो मनहि नव्हे ।।६/२/२९।।**

माझे मन माझी बुद्धी, माझे चित्त, माझा अहंकार, माझे प्राण एवढेच नव्हे तर माझा जीव असे आपण ज्याअर्थी म्हणतो त्याअर्थी ह्या सर्वांना पाहणारा मी ह्या सर्वांपासून वेगळा असलाच पाहिजे. मग खरा मी आहे कोण ? तर सद्‌गुरू सांगतात,

**सोऽहं हंसा तत्त्वमसी। ते ब्रह्म तू आहेसी।**
**विचार पाहता स्थिती ऐसी। सहजचि होते।**।१३.२.२०

आपणच तो शुद्ध आत्मा आहोत. वरील सर्व घटकांचे आपण साक्षी आहोत. वरील घटकांचा निरास करीत गेल्यास फक्त एक तत्त्व उरते व ते तत्त्वच तुझे स्वरूप आहे असे सद्‌गुरू सांगतात. अशाप्रकारे सतत चिंतन करीत गेल्यास गुरूकृपेने एक दिवस चित्त चैतन्यात विलीन होऊन जाईल व आत्मसुखाचा अनुभव येईल.हे आत्मसुख न संपणारे, न विटणारे, शाश्वत स्वरूपाचे आहे. त्याचा वारंवार अनुभव घ्यावा असे तुकोबा सांगतात. अर्थात शिवोऽहं भावात राहण्याचा सतत प्रयत्न करावा. ह्या शिवोऽहं भावाला जसजशी दृढता येत जाईल तसतसे सहजावस्थेकडे जाणे होईल. एकदा का मी आत्मरूप आहे हा अनुभवात्मक निश्चय झाला की आपोआप सर्व चराचरामध्ये दडलेला आत्मा पाहण्याची दृष्टी ईशकृपेने प्राप्त होईल म्हणून पुढील चरणात म्हणतात,

**घ्यावे आत्मसुख स्वरूपी मिळावे।**
**भूती लीन व्हावे तुका म्हणे ।।४ ।।**

अखंड विचाराच्या साधनेने जीवभाव नाहीसा होऊन (बाधीत होऊन) आत्मभाव स्थिर होईल. असा साधक मग सर्व प्राणीमात्रांमध्ये आत्मतत्त्व पाहू लागेल. आत्मवत् सर्वांना मानेल. त्याला सर्वदूर आपणच आत्मरूपाने विलसत आहोत असे जाणवू लागेल.

**जे जे भेटे भूत। ते ते मानीजे भगवंत।**

असा भक्तियोग त्याला हस्तगत होईल.

**पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे। तितुकी भगवंताची घरे**

असे दिव्य ज्ञान त्याचे पचनी पडेल तो सर्वांविषयी नम्र होईल. सर्व ठिकाणीच देव (आत्मा) पाहू लागल्याने ना कोणाविषयी द्वेष ना कोणाविषयी राग अशी निर्व्दंद्व अवस्था त्याला प्राप्त होते. अशा व्यक्तीचे वर्णन करताना भगवत् गीता म्हणते

**आत्मोपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ।।६/३२ ।।**

सुख-दुःख या दोन्ही विषयी तो समदर्शनी होतो. ''वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः'' असे भगवंत त्याचे विषयी उद्‌गार काढतात व म्हणून सर्व प्राणीमात्रांविषयी अत्यंत लीन होतो.

''विश्वंभरा शरणागत भूत जात वंदूनी'' असे तुकोबा एका अभंगात म्हणतात. संपूर्ण विश्वात तो परमात्मा भरून राहिला आहे हे ज्ञान झाल्याने सर्व भूतांच्या ठायी शरणागत होऊन वंदन करतो. म्हणजेच ज्ञानोत्तर भक्तीचा तो अधिकारी होतो.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।**

असा उत्तम वैष्णव हे संबोधन त्याला लागू पडते.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

प्रतिसाद

## ...बाल वाचकांचा...

प्रिय ताईस, (सौ. अनुजा सोमण) आपला 'रघुवीर समर्थ' या मासिकातील एप्रिल २०१३ मधील 'दासबोध सानुल्यांसाठी' लेख वाचून अतिशय आनंद झाला आणि त्याबरोबर ज्ञानही मिळाले.

अहंकार हा मानव जातीचा फक्त शत्रुच नव्हे तर सगळ्या दुःखांचे मुख्य कारण आहे. अहंकारामुळेच उच्च-नीचपणा, श्रीमंती-गरिबी, व्यसनाधिनता, समाजाला अधोगती आणते.

प्रत्येक व्यक्तीने अहंकारास नष्ट केले तर स्वतःची, कुटुंबाची उन्नती झाल्याशिवाय राहणार नाही.

आपली,

**कुमारी सिध्दी चंद्रकांत पाटील**

कोल्हापूर पब्लिक स्कूल, कोल्हापूर

५ वी ब



# दृष्टांत

श्री. अमृतबुवा रामदासी,
मो. ९४०४५९०७७३ सज्जनगड

**येथील येथे अवघेचि राहाते। ऐसे प्रत्ययास येते**
**कोण काये घेवून जाते। सांगाना का ।।** ।दासबोध १२/८/२८

मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर आपले ईप्सित जर आपण साध्य करू शकलो नाही तर आपल्या एवढे दुर्दैवी आपणच. चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या कचाट्यातून मोकळा होण्याचा एकमेव राजमार्ग म्हणजेच आपल्याला मिळालेला नरदेह होय.

हा संसार प्रतिकात्मक, क्षणभंगुर आहे आणि इथल्या सगळ्या वस्तू इथेच राहणार आहेत. वास्तविक पाहता आपण ज्याला आपलं घर म्हणतो ते घर आपल्या पश्चातही पृथ्वीवरच राहणार आहे. कालांतराने आपल्याप्रमाणे ते अजून कुणाचं तरी होणार आहे. ज्या शरीराला आपण माझे माझे म्हणतो, तेच एक दिवस आगीच्या भक्षस्थानी पडणार आहे. या मातीत ते मिसळून जाणार आहे. मग आपण कोणत्या गोष्टीसाठी अहंकार बाळगायचा ? आपल्याला प्रत्येक गोष्ट ही भगवत्कृपेनेच प्राप्त झालेली आहे म्हणून जर श्रीमंती प्राप्त झाली तर अहंकारी न होता याउलट भगवंताबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे कारण त्याची कृपा आपणावर ओतप्रोत झालेली असते. म्हणूनच आपल्याला हे ऐहिक सुख प्राप्त झाले आहे. माणूस पैसे तर भरपूर कमावतो पण तरीही पैशाची कमतरता भासतेच. भरपूर पैसे कमवल्याने मनुष्य श्रीमंत होत नाही. मनुष्य श्रीमंत तेव्हाच होतो जेव्हा त्याला कळते की पैसा म्हणजे काय ? याचा वापर आणि उपयोग काय व किती ? ही समज जेव्हा आपल्यामध्ये रूजते आणि वृद्धिंगत होते तेव्हा पैशाची कमतरताच संपून जाते. आपण याच भ्रमात असतो की पैशाची कमतरता भरून काढायची असेल तर पैसे जास्तीत जास्त कमविणे हाच उपाय. आपल्या समोर अशी कित्येक उदाहरणं आहेत की कित्येक लोक भरपूर श्रीमंत असूनही पैशाची चिंता भेडसावतच असते. जर जास्ती पैसे कमवणे हेच समाधान असलं असतं तर आज ही सगळी मंडळी समाधानी असली असती.

या पृथ्वीवर श्रीमंती फक्त पैशानेच ठरते असे नाही. या भूतलावर पैशाच्या श्रीमंतीपेक्षाही अशा अनेक गोष्टी आहेत ज्याने मनुष्य श्रीमंत समृद्ध आणि सुखी होऊ शकतो. प्रेम, ध्यान, साहस, निडरता, आरोग्य या गोष्टी आपल्या जवळ अधिक असणे हे एक श्रीमंतीचे लक्षणच आहे. माणसाने जर प्रेम, ध्यान, साहस, निडरता, आरोग्य हे न मिळवता जर फक्त पैसाच कमविणे हेच उद्दिष्ट ठेवले तर पुढे जाऊन पश्चात्तापाशिवाय काहीच मिळणार नाही.

एक श्रीमंत व्यापारी एका साधूचा शिष्य असतो. ते साधू नेहमी लोकांना सदाचार आणि नैतिकता यांचा उपदेश करत असतात. दुसरीकडे हा व्यापारी शिष्य या गोष्टीचा अहंकार करत असतो की मी लखपती, मी श्रीमंत माझ्याजवळ खूप जमीन-जुमला, जायदाद आहे.

इतर शिष्यांनी त्या व्यापारी शिष्याची तक्रार त्या साधूंकडे करून त्यांना सविस्तर माहिती सांगितली. त्या साधूंना खूप वाईट वाटले. त्यांना वाटले की जिथे लोकांना सदाचार, नैतिकता शिकवतो तिथे माझा शिष्यच असा विचार आणि आचार बाळगतोय हे चुकीचे आहे. हे त्यांना काही पटलं नाही. त्यांनी मनोमन निश्चय केला या शिष्याला धडा शिकवावाच लागेल. ते साधू तेच करत होते जे प्रत्येक गुरूचं कर्तव्य असतं, ते आपल्या शिष्यांना नैतिकता, सदाचाराचे उत्तम ज्ञान देण्याचे प्रयत्न करत होते.

एक दिवस त्या साधूंनी त्या अहंकारी व्यापारी शिष्याला म्हणाले, मी तुला एक सुई देत आहे, तिला सांभाळून ठेव. जेव्हा तू मला पुढच्या जन्मी भेटशील तेव्हा ही सुई मला वापस कर. त्या व्यापारी शिष्याने काही विचार न करता ती सुई आपल्या गुरूकडून आपल्याकडे ठेवून घेतली. त्याला अजिबात जाणीव झाली नाही की गुरू आपल्याला काहीतरी शिकवण्याचा प्रयत्न करत आहेत. नंतर त्याला जाणीव झाली की तो आपल्या मृत्युनंतर या सुईला कसे काय सोबत घेऊन जावू शकतो. पुढच्या जन्मी आपल्या गुरूंना ती सुई कशी काय वापस देऊ शकू. जेव्हा मनुष्य मरतो तेव्हा त्याला जाळणारा अग्नीसुद्धा सोबत येत नाही तिथे इतर गोष्टींचा विचारच काय ? असा विचार करून तो साधूकडे परत जातो. आणि सुई वापस देत म्हणतो ही घ्या तुमची सुई. मी मृत्युनंतर ही सुई माझ्याबरोबर कशी घेऊन जाऊ शकतो ? आणि पुढच्या जन्मी ही सुई तुम्हाला कशी काय परत देवु शकतो. तेव्हा साधू हसत-हसत म्हणाले, जर तू तुझ्या मृत्युनंतर एवढी छोटीशी सुई पण सोबत घेऊन जाऊ शकत नाहीस तर ज्यावर इतका अहंकार करतोस ते जमीन-जुमला, जायदाद कशी घेऊन जाशील ? व्यापारी शिष्याला धडा मिळाला. त्याने आपल्या व्यवहारासाठी क्षमा मागितली.

तात्पर्य -

**हाट भरला संसाराचा। नफा पहावा देवाचा**
**तरीच या कष्टाचा। परियाये होतो ॥१२/८/३४॥**

समर्थांनी दासबोधात सांगितलेच आहेकी जे जे इथे आहे दिसतय ते इथेच राहणार आहे याचा प्रत्यय निरंतर येत असतो. जे आपल्या सोबत येणारं असं ते शोधून मिळविण्याचा प्रयत्न केला तरच जीवनाचं सार्थक होईल.

**॥जय जय रघुवीर समर्थ॥**

## 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या सभासद संख्या वाढीच्या संकल्पात सक्रिय सहभाग घेऊन समर्थ विचार अधिकाधिक वाचकापर्यंत पाहोचविणारे समर्थ भक्त

१) श्री. प्रभाकर आराध्ये, पुणे
२) श्री. नितीन देसाई, जबलपूर (मध्यप्रदेश)
३) डॉ. सुनयना बांडे, इंदौर (मध्यप्रदेश)
४) श्री व सौ सिद्धांती, नांदेड
५) श्री. वैभव आगरकर , खेड, रत्नागिरी
६) डॉ. कमल वैद्य, सांगली
७) श्री. एस. व्ही कुलकर्णी सर, शेवगाव, अ.नगर
८) श्री. श्रीपाद ठोंबरे, बारामती
९) श्रीमती प्रिया फुलंब्रीकर, पुणे
१०) सौ. विनिता कुलकर्णी, डोंबिवली
११) सौ. सविता श्रीपाद विद्वत, चिंचवड
१२) श्री.उदय सभारंजक, प्रवरासंगम नेवासा, जि.अहमदनगर
१३) श्री.दिलीप जोशी, बुलढाणा
१४) श्री.श्रीकांत महाशब्दे, नंदुरबार
१५) श्री. आदित्य देशपांडे, जि. यवतमाळ

## मासिक 'रघुवीर समर्थ' वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| रु. १५० | एक वर्षासाठी |
| रु. ५०० | चार वर्षांसाठी |
| रु. १००० | आठ वर्षांसाठी |




# विश्वातील महान तत्त्वज्ञ-महर्षी वेदव्यास

**श्री. ग. प्र. कुलकर्णी** - मो. ८७९३३६०८१४



युवक मित्रहो,

सप्रेम जय रघुवीर!

भारतीयांच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनात दिव्य विचारांची पेरणी करून एक सुसंस्कारीत व समर्थ मानवसमाज उभा करण्याचे महान कार्य ज्या थोर तत्त्ववेत्त्याने केले ते थोर तत्त्वज्ञ (The great philosopher) म्हणजे महर्षी वेदव्यास. पराशर ऋषी व सत्यवती यांचे पुत्र. त्यांना रंगाने काळे असल्याने 'कृष्ण' व यमुनाद्वीपात जन्म झाल्याने 'द्वैपायन' म्हणून 'कृष्णद्वैपायन' असे मूळ नावाने संबोधितात.

कृष्णद्वैपायन व्यासांनी अथक परिश्रम घेऊन पुढील हजारो वर्षे मानवाच्या पिढ्यांना आपल्या जीवनाच्या पुष्टीसाठी पुरेल असे 'ज्ञानान्न' निर्माण करून ठेवले. त्या महर्षी वेदव्यासांचा अल्पसा परिचय 'व्यास पौर्णिमेच्या' निमित्ताने करून घेऊया.

संत श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात..

**म्हणौनि श्रीव्यासांचा थोरू। विश्वासि जाला उपकारु।**
**जे श्रीकृष्णउक्ति आकारु। ग्रंथाचा केला।।**

आज भारतीय संस्कृतीच्या आधाराने आपले जीवन समृद्ध करणारा विश्वसमुदाय श्री व्यासांनी केलेल्या परिश्रमाचीच मधुर फळे चाखतो आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही ! भारतातील व भारताबाहेरील विविध गुरू-शिष्य परंपरेतील सश्रद्ध अनुयायी असलेल्या व्यक्तीस श्री व्यासांबद्दल पूज्यभाव असणे साहजिकच आहे. परंतु विश्वातील कोणत्याही भौगोलिक प्रदेशातील, कोणाही धर्ममत-संप्रदायी असलेल्या, दुराग्रहरहित चिकित्सकास, साहित्यिकास व मानवी संस्कृतीच्या वाङ्मयीन अभ्यासकास श्री वेदव्यासांबद्दल आदर वाटावा असे त्यांचे वाङ्मय आहे. विश्वातील मानव समाज सुसंस्कृत करण्यासाठी धडपड करणाऱ्या व्यक्तीस व्यासांची महती विशेषत्वाने कळून येईल.'जीवेत् शरदः शतम्। नंदाम् शरदः शतम्। मोदाम शरदः शतम्। अजिताः स्याम शरदः शतम्। अदीनाः स्याम शरदः शतम्। असा संदेश देऊन समर्थ मानव उभे करणाऱ्या वेदांची महती ज्यांना ठाऊक असेल त्यांना महर्षी व्यासांच्या उंचीची थोडीशी कल्पना येईल.

त्यांनी वैदिक वाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास केला. वेदांचे पृथक्करण करून पुनश्च अध्ययन व संशोधन केले. म्हणून 'विव्यास वेदान्', त्यांना लोक 'वेदव्यास' असे संबोधू लागले. महर्षी वेदव्यासांनी अर्थभेदाच्या दृष्टीने वेदांचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार विभाग करून ते अनुक्रमे पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमंत या शिष्यांना शिकविले. त्यांच्या पुढील अध्ययन, अध्यापन, संशोधनाचे दायित्व आपल्या शिष्यांना दिले.

वेदांमधील ज्ञान समाजातील सर्व स्तरांत घेऊन जाणे व त्यांचे जीवन समृद्ध करणे या हेतूने ते सुलभ पद्धतीने, सोप्या भाषेत सांगण्याची आवश्यकता श्री व्यासांना जाणवली. त्यातूनच मत्स्य, कूर्म, वराह, वामन, विष्णु, नारद, गरूड, लिंग, स्कंद, शिव, मार्कंडेय, पद्म, अग्नि, ब्रह्म, ब्रह्मवैवर्त, ब्रह्मांड, भागवत आणि भविष्य अशा अठरा पुराणांची रचना केली. या पुराणांचा उद्देश जाणूनच 'भागवत' पुराणाच्या प्रसारासंदर्भात नारदांना सनत्कुमारांनी...

**इदं भागवतं नामं पुराणं ब्रह्मसम्मितम्।**
**भक्तिज्ञानविरागाणां स्थापनाय प्रकाशितम्।।**

(श्रीभागवत महात्म्य अ.२ श्लोक ७१)

**दूरेहरिकथाः केचित् दूरेचाच्युतकीर्तनाः ।**
**स्त्रियः शूद्रादयो ये च तेषां बोधो यतो भवेत् ।।**
(श्रीभागवत माहात्म्य अ.६ श्लोक ६)

वेदातील ज्ञानाने परिपूर्ण असलेले हे पुराण भक्ती, ज्ञान व वैराग्य यांची जनमानसात स्थापना करण्यासाठी प्रकाशित केले आहे. याच्या श्रवणासाठी जे भगवत्कथा व ईश्वरीय उपदेशापासून वंचित राहिलेले लोक आहेत असे स्त्री-शूद्रादी यांना आवर्जून श्रवणासाठी आमंत्रित करावे, असे म्हटले आहे.

'महाभारत' हा इतिहासग्रंथ व्यासांनी लिहिला. यास 'पंचमवेद' असे म्हटले आहे. विदेशी अभ्यासक डॉ.विंटरनिड्स म्हणतात,''जगात महाभारतासारखे लिखाण नाही. विश्वात अशा प्रकारचा इतिहास पाहायला मिळणार नाही.'' महापंडित डॉ. वासुदेवशरण अग्रवाल म्हणतात, ''महाभारत हा खरोखरी भारतवर्षाचा आद्य विश्वकोश आहे. जगातील कोणत्याही महाकाव्यापेक्षा त्याचे महत्त्व वादातीत आहे. तो केवळ इतिहास नाही. त्यात केवळ सत्य घटना-प्रसंग-कथा नाही तर ते भारतीय धर्म आणि नीती यांचे अक्षय भांडार आहे.''

श्रेष्ठ तत्त्वज्ञ श्री. पांडुरंगशास्त्री आठवले म्हणतात,''वेदव्यासांच्या इतिहासात उत्कटता आहे. महाभारतातून जीवनाकडे पाहण्याची एक दृष्टी मिळते. समाजशास्त्र, नीतीशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र अशा मानवी जीवनाच्या अंगावर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ आहे. व्यास जीवन देतात. व्यासांचे वाङ्मय वाचाल तर पतन होणारच नाही.''

आध्यात्मिक जीवन समृद्धीसाठी, आत्मलाभासाठी व्यासांनी 'ब्रह्मसूत्रांची' रचना केली. ब्रह्मसूत्रातील ५५५ सूत्रांमध्ये तत्त्वज्ञान, आत्मा-अनात्मा (self & non self) यांची चर्चा त्यांनी सुंदर रितीने केली आहे. या ब्रह्मसूत्रांत विश्वातील कोणतीही दार्शनिक विचारधारा त्यांनी बाकी ठेवली नाही.

पुढील काळात आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, मध्वाचार्य, निम्बार्काचार्य अशा दार्शनिकांनी श्रीव्यासांच्या आधारे आपापले दार्शनिक सिद्धांत मांडले.

या ब्रह्मसूत्रांबद्दल श्रीकृष्णांना कसा आदर वाटतो, ते श्रीमत् भगवद्गीतेत दिसून येते.

**ऋषिभिर्बहुधागीतं छंदोभिर्विविधैः पृथक ।**
**ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ।।१३-४ ।।**

ब्रह्मसूत्र वाचा असे सांगून श्रीकृष्णानेही त्यांचा आधार घेतला आहे. अशा प्रकारे व्यासांच्या ग्रंथातून जगातील सारे ज्ञान आणि अनुभव प्रकट झाला. यामुळे 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' असे म्हटले जाते. भावार्थदीपिकेत संत श्री ज्ञानेश्वर माऊलीही म्हणतात,

**म्हणउनि महाभारती नाही । ते नोहेचि लोकी तिहीं ।**
**येणे कारणें म्हणिपें पाही । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय ।।**

महर्षी वेदव्यास म्हणजे मूर्तिमंत वाङ्मयीन पुरूष. आपले संपूर्ण जीवन ज्ञानसाधनेसाठी आणि ज्ञानदानासाठी खर्ची घालून महर्षी वेदव्यास या राष्ट्राच्या स्वाभिमानाचा विषय झाले आहेत. भारत ही पुण्यभूमी, देवभूमी का आहे, या प्रश्नाचे उत्तर व्यासांकडे पाहून मिळते.

आषाढ पौर्णिमा, गुरूपौर्णिमा हा दिवस 'व्यास पौर्णिमा' म्हणून ओळखला जातो. ज्ञानाचा प्रवाह अबाधित, अखंड ठेवणारी गुरू-शिष्य परंपरा महर्षी वेदव्यासांनी अधिक सक्षमपणे प्रवाहीत केली.

महर्षी वेदव्यास आपणास पूज्य आहेत. परंतु त्यांची पूजा केवळ एक पुराणपुरुष म्हणून गंधफुले वाहून होऊ शकत नाही. त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास न करता त्यांच्या प्रतिमेचे केलेले पूजन ही खरी उपासना नसून 'उपहासचं आहे. श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास..

**ग्रंथाचे करावे स्तवन । स्तवनाचे काय प्रयोजन ।**
**येथे प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ।।**

दा.२०-१०-३३ ।।

युवक मित्रांनो या व्यास पौर्णिमे च्या निमित्ताने त्यांचे वाङ्मय अभ्यासण्याचा व त्याप्रमाणे जीवन घडविण्याचा संकल्प करूया.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**




# अभंग आस्वाद

**श्री. प्रसादबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२१५७४२००**

**देह हे पंढरी आत्मा पंढरीनाथ। यात्रा महोत्साव सर्वकाळ। आम्ही यात्रेकरू नित्य यात्रा करू।**
**दर्शनी साद पांडुरंग। भक्ती हेचि वीट भाव धरू नीट।**
**उभा जो वरिष्ठ ब्रह्मादिका। वैराग्य भीवरा ज्ञान पुंडलिक।**
**तेथोनि सन्मुख पांडुरंग। निजबोधे दर्शन रामदासा जाले।**
**यात्रेचे खुंटले अनुसंधान।**

पंढरपूर हा शब्द उच्चारताच साधुसंताच्या आणि भक्त भाविकांच्या प्रेमगंगेला महापूर येतो. श्री ज्ञानेश्वरांपासून ते समर्थ रामदासांपर्यंत सर्वच संतांनी पंढरी हे माहेर असल्याचा निर्वाळा एकमुखाने दिला आहे. सर्वांचे श्रद्धास्थान असणारी पंढरी ही विठुरायाची नगरी !

भगवंत पुंडलिकाच्या उत्कट भक्तीने प्रसन्न होऊन पंढरपुरी अवतरले आणि जीवाला परमार्थाची दिशा दाखवण्यासाठी अठ्ठावीस युगे विटेवरती उभे आहेत. आषाढ महिना सुरू होताच वारकऱ्यांना वेध लागतात ते पंढरपुरचे! अनेक शतकांपासून लाखो लोक कशाचीही तमा न बाळगता पंढरपुरकडे रवाना होतात आणि त्या परब्रह्म भगवान विठुरायाच्या चरणी लीन, विलीन, तल्लीन होतात. अशा विठूरायाची महती सर्वच संतांनी गायलेली आहे. त्याला समर्थ रामदास तरी अपवाद कसे असणार ?

समर्थ रामदासस्वामी स्वतः पंढरीची वारी करायचे. श्री समर्थांनी विठ्ठलावरती केलेल्या आरत्या, सवाया तसेच पांडुरंगावरती केलेले अभंग आजही सज्जनगडावरील सांप्रदायिक भजनामध्ये गायली जातात. समर्थांच्या श्रद्धेपोटी विठ्ठलाने रामरूपात दर्शन दिल्याची कथा सर्वश्रुत आहेच.

समर्थांचे अभंग वर-वर पाहायला गेलो तर सोपे वाटतात, पण लक्ष्यार्थाने त्याचा विचार केला तर त्या अभंगाचा योग्य निश्चित अर्थ लागत नाही. संतांना आलेले अनुभव ते अलंकारिक भाषेत ते रूपके वापरून किंवा दृष्टांत देऊन सोपे करून सांगतात. आम्ही मात्र त्या अभंगातील लक्ष्यार्थ न जाणता तो अभंग वाच्यार्थाने घेतो.

**देही असोनिया देव। वृथा फिरतो निदैव**
**नाभी मृगाच्या कस्तूरी। मृग हिंडे वनांतरी ।।**

देहामधे भगवंताचे वास्तव्य असूनही लोक वृथा इकडे तिकडे फिरतात, ज्याप्रमाणे मृगाच्या नाभीत कस्तुरी आहे पण ते मृग त्याचा शोध घेण्यासाठी वनात इकडे तिकडे फिरते.

आपल्या सर्वांना व्यावहारिक सत्तेतील पंढरी माहीत आहे, पण समर्थांनी आम्हाला या अभंगातुन आध्यात्मिक पंढरीची ओळख करून दिली आहे. ''देह हि पंढरी आत्मा पंढरीरी' माझा देह हीच पंढरी आहे व तेथे अविनाश असा आत्मा (विठ्ठल) विटेवरती उभा आहे, अशा आत्मरूपी विठ्ठलाच्या भेटीसाठी श्वासोच्छ्वासाच्या येरझारा करून त्याच्यावर अनुसंधान ठेवले त्याचीच खऱ्या अर्थाने त्याचीच यात्रा पूर्ण झाली असे म्हणता येईल, आणि अशी यात्रा आम्ही नित्य करू कारण 'दर्शनी साद पांडुरंग' कोटी मदनाच्या सौंदर्याचा गाभा असलेला तो, सर्व घटाघटात व्यापक रूपाने असलेल्या आत्मरूपी विठ्ठलाच्या दर्शनाची आस जोपर्यंत पूर्ण होणार नाही तोपर्यंत ही वारी चालूच राहणार आहे.

ज्या पंढरपूरमध्ये पांडुरंग उभा आहे तो त्या विटेवरती पण ही नेमकी कोणती वीट आहे तर ती भक्तीरूप विट आहे. भक्तांच्या भक्तीमुळे परब्रह्म अठ्ठावीस युगे भक्तीच्या जोरावर त्या ठिकाणी उभे आहे. त्यासाठी मात्र पांडुरंगावर असणारी श्रद्धा, भाव मात्र डोळस हवा, कारण भाव हे

***पान* ३६ *वर...***

दासबोध-
सानुल्यांसाठी

# बदल

**सौ. अनुजा सोमण सातारा,** मो. ९४२३३२४३३३



**आपल्या कुटुंबातील लहान मुलांना हे सदर वाचायवास द्यावे. या सदरातील गोष्टीचे तात्पर्य त्यांना जसे समजले तसे स्वहस्ताक्षरात लिहून पाठविणाऱ्या बालवाचकांची नावे मासिकात प्रसिध्द केली जातील.**

बालमित्रांनो मागील अंकात आपण आपल्या ज्ञानाचा उपयोग अचूक कसा करायचा याचा विचार केला, हो ना ? आज आपण बदल या विषयी बघणार आहोत. मुलांनो प्रसिद्ध लेखक ओ हेन्री यांची एक कथा आहे.

एक चित्रकार असतो. एका वृत्तपत्रात येशूचे चित्र काढून हवे अशी तो जाहिरात वाचतो. अनेक शाळांत भेटी दिल्यानंतर एक विलक्षण लाघवी, निष्पाप, निरागस चेहरा असलेला बारा वर्षांचा मुलगा त्याला भेटतो. तो त्या मुलाचा मॉडिल म्हणून वापर करतो अन् चित्र साकारतो. त्या चित्रामुळे त्याला भरपूर प्रसिद्धी अन् पैसा मिळतो.

सुमारे २२ वर्षांनंतर त्या चित्रकारास पुन्हा सैतानाचे चित्र काढण्यास सांगण्यात येते. चित्रकार अनेक तुरूंग पालथे घालतो. अखेरीस त्यास अट्टल गुन्हेगाराचा चेहरा मिळतो. त्याचा तो मॉडिल म्हणून वापर करतो. अन् चित्र काढतो, अन् त्या गुन्हेगारास बक्षिशी देतो. त्यावर तो गुन्हेगार स्वत:वरच हसतो, अन् म्हणतो,''बालपणी मला ही बक्षिशी तू दिली नव्हतीस.''

पाहिलंत ! मुलांनो परमेश्वराने हे सुंदर आयुष्य फुलवण्यासाठी, सत्कार्यासाठी दिलं. पण आपण याचं काय करतो ? आपल्यातील चांगले बदल हे संगतीने, सहवासाने, चांगल्या सवयीने घडतात. अन् चांगलं कृत्य घडवून आणतात. मुळात सज्जन असलेला 'कर्ण' दुर्योधनाच्या कुसंगतीने बिघडला. अन् अधर्माचा साथीदार बनला. तर मुळात डाकू असलेला, 'वाल्या कोळी' केवळ नारदमुनींच्या क्षणिक सहवासाने वाल्मिकी ऋषी बनला.

श्री स्वामी समर्थ रामदासांच्या मते अवगुण हे प्रयत्न पूर्वक सोडता येतात. सद्‌गुणांवर अवगुणांची मात होते. श्रीदासबोधासारख्या पवित्र ग्रंथ वाचनाने मन, बुद्धी, इंद्रिये यांना अचूक योग्य वळण लावता येते. चातुर्य अंगी आणता येते.

**रेखा तितुकी पुसोनि जाते। प्रत्यक्ष प्रत्ययास येते।**
**डोळे झांकणी करावे ते। काये निमित्त।**
**घालून अकलेचा पवाड। व्हावे ब्रह्मांडाहून जाड।**
**तेथे कैचे आणले द्वाड। करंटेपण।।**

मनानी दुबळी असणारी माणसं, हातावरच्या रेषांवर अन् भविष्यावर, विश्वास ठेवतात. तर खंबीर अन् परिस्थितीशी झुंजणारी माणसं आपल्या हस्तरेषा आपणच रेखाटतात. म्हणजे उत्तम भविष्य घडवून आणतात. तेव्हा 'यत्न तो देव जाणावा' या वचनानुसार संतसहवास, ग्रंथसहवास, अचूक यत्न या योगे उज्ज्वल भविष्याची कास धरा. अन् अंतरातील (मनातील) चांगले बदल घडवून आणण्यासाठी चांगलीशी योजना आखा.

बालमित्रांनो आपण आपल्या भविष्यासाठी कोणती योजना आखलीत ? कोणत्या चांगल्या सवयी लावून घेतल्यात ते पुढील अंकी जरूर कळवा.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

**पृष्ठ प्रायोजक :**
**स. भ. श्री. स्वानंद कुलकर्णी, मिरज**
**एस. के. इन्व्हेस्टमेंटस्**

# जुना दासबोध-विविध शिकवण-समास दहावा (लेखांक ११ वा)

सौ. मंजिरी श. धूपकर, पुणे. मो. ९९२३०४५५५४

**अतिलीनता जिहीं धरिली। त्यांची देहबुद्धि खंगोनि गेली।**
**दिवसेंदिवस गृहासि आली। न पाचारितां शांति।।११**

भूवरी अवतार घेण्याचा संतांचा उद्देश हा केवळ लोक कल्याणाचा असतो. म्हणून कारणाने किंवा कधी अकारणही पण लोकचिंता आणि लोकोपदेश ते करीत असतात. त्यांचे सहज आणि नित्य बोलणे हा लोकांसाठी उपदेश होतो. 'विविध शिकवण' ह्या समासात श्रीसमर्थांचा असा उपदेश मोक्षासाठी आहे. लोककल्याणासाठी केलेला उपदेश एकाग्रतेने लोकांनी ऐकावा अशी त्यांची तळमळ आहे. ह्या उपदेशाचे श्रवण, चिंतन, मनन, प्रत्यक्ष आचरण करून माणसाने जन्ममृत्युच्या चक्रातून आपली सुटका करून घ्यावी;असा श्रीसमर्थांचा ध्यास आहे.

श्रीसमर्थांचे ग्रंथ म्हणजे आंतरिक तळमळीचा आविष्कार आहे. ग्रंथकर्ता म्हणून 'रामदास' नाव आहे. ह्या ग्रंथाच्या श्रवणाचा परिणाम एवढा प्रभावी आहे की ह्याच्या नियमित श्रवणाने मोक्ष मिळतो. ते श्रवण कसे असावे याचेही मार्गदर्शन अगदी स्पष्टपणे श्रीसमर्थांनी केले आहे. अर्थात श्रवणाच्या वेळी मन निरूपणाशीच एकाग्र झाले पाहिजे. श्रवण करताना विषयाच्या संदर्भातील चिंतनातून काही शंका निर्माण झाल्या तर श्रोत्याने निरूपणकाराकडून त्याचे निरसन करून घ्यावे;असे श्रीसमर्थ सांगतात. निरूपणाचे शब्द केवळ कानावर पडणे; अशी श्रवणकर्त्याची भूमिका नसावी तर कानावर पडणाऱ्या शब्दांच्या अर्थाशी, अर्थाच्या आत्म्याशी मनाने गुंतून जावे असे की एखादा कंजूष मनुष्य आपल्या धनाशीच मनाने बिलगून असतो. म्हणजे चिंतन हे श्रवणकर्त्यांचे धन आहे; असा त्याचा उपजत सहजभाव असावा. आपल्या एकाग्रतेचा त्याला अहंकार नसावा. अहंकारामुळे त्याने वक्त्याला काही आवाहन केले, व्यत्यय आणला तर श्रोत्याने स्वतःवरच आघात करणे होईल. वक्त्याचे बोलणे पटले नाही, वक्त्याचे ज्ञान पुरेसे वाटले नाही किंवा ते ज्ञान खोटे वाटले; तर स्वतःशी त्या ज्ञानाचा विचक्षणबुद्धीने विचार करावा आणि वक्त्याचे व्याख्यान झाल्यावर त्यांच्या सोयीने, त्यांना भेटून नम्रपणे आपण आपली शंका विचारावी. पण वक्त्याने जर गुळमुळीत उत्तर दिले आणि वेळ निभावून नेली तर तेही लक्षात घेऊन दुसऱ्या तज्ज्ञ व्यक्तीला आपली शंका नम्रपणे विचारावी. अहंकाराचा दुष्परिणाम आणि लीनतेचे महत्त्व श्रीसमर्थांनी येथे सांगितले आहे.

**लीनतेसारिखें रत्न। उदंड केला जरी प्रयत्न।**
**तरी न जोडे यत्न। केला पाहिजे।।९**

लीनता ही रत्नासारखी मौल्यवान असते. ती अंगीभूत असली किंवा प्रयत्नाने मिळविता आली तर व्यक्तिमत्त्वाची प्रसन्नता व्यापक होते. समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी लीनता अंगी बाणविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. लीनता अंगी बाणविण्यात यश मिळाले तर क्रोधाला आपोआपच निरोप मिळतो. क्रोधासारखाच, अभिमानही लीनता नष्ट करतो. क्रोध आणि अभिमान, मनाचे हे दोन शत्रू नष्ट झाल्यावर मनाला आपोआपच शांतता प्राप्त होते. लीनतेचे सामर्थ्य समाधानी मनाचा मोठा आधार असतो. नास्तिक वृत्ती पालटून लीनतेमुळे व्यक्ती सश्रद्ध होते. काही कलह निर्माण झाला असता त्या ठिकाणीही लीनता दाखविली तर कलहही थंडावतो. लीनता ही देहबुद्धी नष्ट करून आत्मबुद्धीकडे नेणारी वृत्ती आहे. देहबुद्धी नष्ट झाली म्हणजे देहाभिमानामुळे निर्माण होणाऱ्या कलहाला अस्तित्वच उरत नाही. मग शांती मिळविण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत; ती सहजच मिळते. लीनता

हा अंतर्भाव आहे. तो आत्म्यासारखा अमूर्त आणि चैतन्यमय आहे. तो स्वतःचा स्वतःला जाणवला म्हणजे आपली समृद्धी वाढवतो.

शाश्वत-अशाश्वताचे ज्ञान देणारे माध्यम शब्द असतात. पण शब्दांचे महत्त्व अर्थ व्यक्त होण्यापुरतेच. म्हणून थोड्या शब्दांत ज्ञान व्यक्त करता आले पाहिजे.

**व्युत्पत्ति असली तरी आपणासि काय।**
**आपण धरावी अर्थाची सोय।**
**अर्थ टाकूनि येर न्याय। करूं नये सर्वथा।।१६.**

शब्द म्हणजे देह आणि अर्थ म्हणजे आत्मा. शब्दाचा विचार हा फक्त अर्थाच्या स्थानापुरताच महत्त्वाचा आहे. शब्द अशाश्वत आहे आणि अर्थ शाश्वत आहे. ज्ञानाचा मार्ग हा अशाश्वताकडून शाश्वताकडे जातो. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. देहबुद्धी-देहाहंकारातून निवृत्त होऊन अंगी लीनता धरल्यावर आत्मस्वरूपाची जाणीव होते. जाणीवेचा अहंकार धरणे म्हणजे पुन्हा देहबुद्धीकडे वळणे आहे. आत्मज्ञानाचा विचार निःस्पृहपणे केल्यावर अंगी तेज बाणेल. म्हणून श्रीसमर्थ उपदेश करतात की आत्मज्ञानाचा अहंकार धरू नका.

आधीच्या समासात झालेल्या गुरूशिष्यांच्या संवादाचे स्मरण ह्या समासात पुन्हा आले आहे. त्यामुळे गुरूंच्या उपदेशामधला, संवादातला सुसंगतपणा येथे स्पष्ट होतो.

**तुवां पूर्वीचे समासीं प्रश्न केला। त्याचें स्मरण आहे मजला।**
**तरी तो आतां तुजला। सांगेन होई।।२०**
**परी जें तुज मागीतलें। त्याचें उत्तर नाहीं आलें।**
**तरी तुज मागतां कैसें वाटलें।**
**तें यथार्थचि सांग आतां।।२१।।**

ह्यामध्ये शिष्याला श्रवणाचे महत्त्व सांगितले होते. (समास ९) श्रवणाचा आळस न करता अत्यंत दुर्लभ, अगदी ब्रह्मादिकांनाही कठीण अशी शांती मिळविण्यास गुरूंनी शिष्याला सांगितले होते. (९-२९) ह्याचेच सविस्तर विवेचन प्रस्तुत समासात आले आहे. गुरू म्हणतात, तुला जे मी मागितले (श्रवण करताना मन विचलित होऊ देऊ नकोस. एकाग्र मनाने श्रवण पूर्ण कर.) ते तू देऊ शकतोस पण मन स्थिर करणे, निर्विकल्प करणे हे तुझे तुलाच करायचे आहे आणि ते तुला कठीण जात आहे. गुरूंनी शिष्याच्या मनाची द्वन्द्वावस्था ओळखली आहे. आपले हित कशात आहे ते शिष्याला कळते पण वळत नाही. शिष्याने मन एकाग्र करून स्वतःचे हित साधावे हे आग्रहाचे मागणे गुरू शिष्याला करतात.

**इतुका आग्रह याचि कारणें। जें तू वैराग्यें उणें।**
**आणि तुज मुक्त करणें। हे प्रतिज्ञा आपली।।२४।।**

शिष्याचे कल्याण करणे हा गुरूंचा आणि एकूणच संतांचा जीवनोद्देश असतो; म्हणून शिष्याला मुक्ती मिळावी ही गुरूंची तळमळ आहे. शिष्य आत्मज्ञानी व्हावा म्हणून गुरू उपदेश करतात. शब्द ज्ञानाने मुक्ती मिळत नाही. आत्मज्ञानाने माणूस जीवनमुक्त होतो. ऐहिक जीवनात, देहाचे कारण आणि योग्य-अयोग्य उपयोग समजतो; तोही आत्मज्ञानामुळे. शब्दज्ञान हे देहबुद्धीसारखे असते. देह म्हणजे मी, असे माणूस समजतो. तद्वतच, शब्दज्ञान म्हणजे ज्ञान समजून तो मुक्ततेचा विचार करतो. तो इंद्रियांना संयमित करून स्वतःच्या देहातीतपणाची कल्पना करतो. पण ही त्याची कल्पना म्हणजे त्याची वृत्ती नसते. ह्यातून त्याचा स्वतःशी संघर्ष होतो. आपण देहातीत आहोत. आपली देहबुद्धी संपुष्टात आली आहे असे त्याला वाटते. तरीही आपला अपमान झाला तर तो चिडचिड करतो. स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी तो धडपडत असतो. ही तर देहबुद्धीचीच लक्षणे आहेत. म्हणजे त्याला वाटले तरी कल्पनेनेही त्याला मुक्ती मिळालेली नसते. इतकेच नव्हे तर; देहाने पांगळा होऊनही तो देहासक्त असतो. त्याला कधीही समाधान लाभत नाही.

शिकविणे म्हणजे घोटून घेणे. सामान्य माणसाला स्वतःचे हित कशात आहे हे न समजल्यामुळे ते पुन्हा पुन्हा सांगावे लागते; हे काम संत करतात. तरीही माणूस योग्य मार्गाने चालत नाहीच. म्हणून समर्थ परिस्थिती समजूनही उपदेश करीत राहतात.

**ऐसे वैभवें भुलले। आणि आधार घेऊं लागले।**
**तयां प्रति कांहीं न चाले। ब्रह्मादिकांचेंही।।३६।।**

वेदशास्त्रांचा अभ्यास करणाऱ्याला अभ्यासाने आनंद होतो. हा आनंद म्हणजे शब्दज्ञानाच्या वैभवातच त्याचे मन रमलेले असते. वेद म्हणजे ज्ञान. आयुष्याबद्दल योग्य ज्ञान झालेच तर प्रपंचाचे असारपण उमगते; पण तेवढेच. म्हणून काही त्याला प्रपंच सोडवत नाही. पण प्रपंच आपल्याला सोडत नाही; असे तो म्हणतो. प्रपंचासक्तीचे समर्थन अशा शब्दांनी केले जाते. ह्याचा अर्थ वेदशास्त्रांचा अभ्यास आणि झालेला आनंद हे शब्दज्ञान आहे. मग खऱ्या वैभवाची, आत्मज्ञानाची आणि त्याची भेटच होत नाही.

मायेचा फास, आकर्षणाचा मनावरचा पगडा मोठा असतो. ह्यात गुंतून माणूस स्वतःचे अधःपतन करतो. स्वतःच स्वतःचा शत्रू होणाऱ्याला परमेश्वरही तारू शकत नाही; तेथे इतरांची काय कथा ! 'रामायण', 'महाभारता'सारखे अक्षर वाङ्मय श्रवण केल्यावर त्यातील चिरंजीव, शाश्वत तत्त्वांपर्यंत न जाता, त्यातील भव्यदिव्य ऐहिक वैभवात मन गुंतते आणि मग त्यातील 'राम' श्रवणकर्त्याला सापडतच नाही. बाह्य गोष्टींवरच मन झुलत राहते; तोपर्यंत रामाची उपासना होणार नाही आणि ईश्वरापासून तो दुरावलेलाच राहणार. देहाने सगुण मूर्तीजवळ राहणे म्हणजे उपासना नव्हे तर परमेश्वर अंतःकरणात अवतरला पाहिजे आणि अंतःचक्षूंना दिसला पाहिजे. मुखाने स्तोत्र म्हणताना क्षणभरही चित्त त्यात नसेल तर ती उपासना नव्हे. श्रीसमर्थ उदाहरण देतात, पंचपक्वान्नाचा स्वयंपाक करून भुकेलेल्यांना जेऊ घातले, त्यानेच आपले पोट भरले असे आपण न जेवताच म्हणालो तरी पोट भरत नाही. तसेच मला ज्ञान हवे असे म्हणण्याने अज्ञान जात नाही.म्हणजेच शब्दज्ञान पुरेसे नाही हे स्पष्ट आहे. शब्दांचा आधार जे ग्राह्य धरतात त्यांना,त्यातला धोका अनुभवल्यावर दुःख होते, ते भांबावून जातात. त्यासाठी संत लोभाला बळी न पडता विवेकाने वागतात.

लोककल्याणाच्या कार्यात स्वतःला त्रास झाला, किंबहुना कोणी दोष दिला तरीही संतांचे लोककल्याणाचे कार्य चालूच असते. ह्याचाच प्रत्यय श्रीसमर्थांच्या उपदेशात दिसतो.

**श्रोतीं सावध ऐकावें। मजला अभिमानी म्हणावें।**
**तरी आपुलें करूनि घ्यावें। समाधान तुम्हीं।।४९।।**

चौऱ्यांशी लक्ष योनी फिरून आल्यावर आत्म्याला नरदेह मिळतो. बुद्धी आणि विवेकाच्या जोरावर मोक्षाचे दार मनुष्यजन्मातच उघडणे शक्य असते. पण मनुष्यजन्माचे श्रेष्ठत्वच न समजल्यामुळे इतर योनींप्रमाणेच मनुष्यजन्मातही जगणे होते. किंबहुना इतर अनेक प्राण्यांमध्ये जेवढे इमान असते तेवढेही मनुष्यप्राण्यामध्ये दिसत नाही. 'मी कोण आहे ?' ह्याचे उत्तर मनुष्यप्राणी चैतन्याच्या प्रत्येकक्षणी म्हणजे श्वासोच्छ्वासाने देत असतो. श्वासोच्छ्वासात उमटणारा 'सोऽहम्।' हा ध्वनी त्याला स्वतःलाच ऐकू येत नाही; मग उमजणे ही तर खूपच दूरची गोष्ट आहे. त्यामुळे तो देहबुद्धीत वावरून आपले श्रेष्ठत्व आपणच दूर ठेवतो. हे सांगण्यासाठी श्रीसमर्थांनी काही उदाहरणे दिली आहेत. राजपदावर असणाऱ्याने भीक मागण्याची अभिलाषा धरली, लाचारी केली तर तो जसा त्याच्या राजपदाला अयोग्य ठरतो. तसेच नांव कुबेर पण कष्टमय जीवन जगतो. नावाने लक्ष्मी पण हातात भिकेची झोळी. तसे स्वतःला निःस्पृह समजायचे आणि ऐहिक वैभवासाठी हळहळायचे. हे अनेक विरोधाभास श्रीसमर्थांनी दाखविले आहेत. उत्तम प्रतिभावंत, स्वतंत्रपणे उत्कृष्ट स्वानंदासाठी काव्यनिर्मिती न करता राजाची भाटगिरी आपल्या काव्यातून करतात. राजहंस, ज्याच्यासाठी खाद्य म्हणून मोत्याचा चारा आहे; त्याने शेण खाणे, हेही मनुष्यजन्मात देहबुद्धीत गुंतून आपल्या जन्माची विटंबना करण्यासारखेच आहे. आपण अमर आहोत, असे म्हणणाऱ्याला मृत्यु आला, सगळ्या कला जाणणाऱ्याला कलांचा प्रारंभच माहिती नाही आणि अत्यंत सुंदर व्यक्तीचे नाक नकटे असावे; तसेच नाव आचार्य पण, त्याला आचमनही करता येत नाही आणि सुंदराच्या कपाळावर कोडाचा डाग; असेच आत्मारामाची जाणीव न होता देहबुद्धीने वावरणाऱ्यांचे आहे.

**ईश्वर अभिधानाचा गौरव। ज्ञान विचारितां शून्य स्वयमेव।**
**तैसा विदेही म्हणवी त्यासी हांव।**
**दृढ देहबुद्धीची ।।५८।।**

पंचमहाभूतांपासून तयार झालेला देह पंचमहाभूतातच विलीन होतो. तरी हा नश्वर देह शाश्वत आत्म्यावर आरूढ होऊन हा देह म्हणजे मी ही भावना दृढ करतो. म्हणून मुक्ती, बद्धता ही भाषा करणे असंबद्ध आहे. पण जो स्वतः आत्मबुद्धीपर पोहोचला आहे त्याला हा विचार शोभतो. पण तो, नीटपणे तो विचार स्पष्ट करू शकत नाहीत. ह्या सर्व विवेचनातून, उदाहरणांतून माणसाला शहाणे करावे, त्याचे कल्याण करावे, हा श्रीसमर्थांचा हेतू आहे. शिकविणे म्हणजे घोटवून घेणे. म्हणूनच विविध उदाहरणांनी, कारणांनी, पद्धतींनी आपली शिक्षकाची भूमिका तळमळीने निभावण्याचे काम श्रीसमर्थ पुढील समासात आणि एकूणच करीत राहिले.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**


## 'रघुवीर समर्थ' मासिकातील पृष्ठदानासंबंधी

**'रघुवीर समर्थ'** मासिकाच्या समर्थ विचार कार्यात पृष्ठदान करून सहभागी व्हा.

आपण आपल्या नावाने, आपल्या दिवंगत आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ किंवा परिवारातील सदस्याच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रीसमर्थ विचारांचा प्रसार व प्रचार सेवा म्हणून अंकातील एक अथवा अधिक पानांचे प्रायोजकत्व स्वीकारू शकता. प्रायोजित केलेल्या पानावर आपले नाव छापले जाईल.

**पृष्ठदान सेवा मूल्य :**
**एका अंकातील एका पानासाठी रु. ५००/-**

**अधिक माहितीसाठी संपर्क-**
**स. भ. मंदारबुवा रामदासी, ९७६३२७१४०७**


***...पान ३१ वरून***

देवाचे वर्म आहे, आणि वर्म चुकल्यास साध्य प्राप्त होत नाही. आठ अवतारांत भक्तांकरिता अनेक कष्ट सोसून आता कमरेवर हात ठेवून उभा आहे.

**दोन्ही हात ठेवुनि कटी। उभा भीवरेच्या तटी।**
**कष्टलासी साठी। भक्तिकाजे। विठ्ठल।।**

तुकाराम महाराज एखादी आई शाळेतून येणाऱ्या मुलाची आतुरतेने वाट पहात अशीच उभी असते, तद्वत विठोबा हा भक्तांची वाट पहात पंढरपुरास उभा आहे.

**सच्चिदानंद घन। पंढरीये परिपूर्ण**
**कर ठेवुनी जघन। वाट पाहे भक्तांची।।**
**वैराग्य भीवरा ज्ञान पुंडलिका। तेथोनि सन्मुख पांडुरंग**

अंतरंगातल्या खऱ्या पंढरीचे आणि आत्मस्वरूपी श्री विठ्ठलाचे दर्शन समर्थांना घडले, त्यांना स्वात्मप्रत्यय सर्व लोकांना यावा यासाठीचा उपाय समर्थांनी या अभंगात दिला आहे. ज्यावेळी हा जीव वैराग्यरूपी चंद्रभागेमध्ये स्नान करेल त्यावेळी 'सन्मुख उभा पांडुरंग' स्वयंप्रकाशरूप आत्मतत्वाची भेट होईल, असे दर्शन ज्यावेळी जीवाला घडेल, त्यावेळी तो विठ्ठल स्वरूप होईल, भगवंत त्याला दूर राहणार नाही आणि सर्व यातायात संपून जाईल अशी ही पंढरपुराची वारी जीवनामध्ये करूया. भवसागर तरण्यासाठी संतांनी सांगितलेल्या मार्गाने जाऊया.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

## सुजन वाक्य

**पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।**
**पुत्रस्तु स्थविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति।।**

(मनुस्मृति ९-३)

► कुमारी असताना स्त्रीचे रक्षण पिता करतो. तरुणपणात पती तिचे रक्षण करतो. स्त्री वृद्ध झाल्यानंतर मुलगा तिचे रक्षण करतो. स्त्रीला संरक्षण नाही अशी स्थिती कधीच असता कामा नये. ती असुरक्षित असू नये.

ग्रंथ परिचय

॥ श्रोते पुसती कोण ग्रंथ
काय बोलिले जी येथ ॥

# समर्थ शिष्य कल्याण

**संपादक - गणेश शंकर देव**

**समर्थ शिष्य कल्याण** - संपादक - गणेश शंकर देव
पृष्ठसंख्या- २८८ किंमत- २२५ रु.
सवलत मूल्य- १५० रु.+ टपाल खर्च २५ रु.
प्राप्तीस्थळ- सुनिल चिंचोलकर,
अजिंक्यनगर, हिंगणे खुर्द, पुणे ४११ ०५१
मो.- ९४२३७४२४४४
मोरया प्रकाशन, अनुश्री ४०/१० एरंडवणा,
पुणे ४११ ०३८. मो.- ९२२३५०१०५२

कै. शंकर श्रीकृष्ण देव यांचे समर्थ संप्रदायावर फार मोठे उपकार आहेत. गेल्या १००-१२५ वर्षांत समर्थांवर जे विपुल लेखन झाले त्याचे आश्रयस्थान देवांनी स्थापन केलेले. समर्थ वाग्देवता मंदिर आहे. त्यांच्याच आशिर्वादाने त्यांचे सुपुत्र कै.गणेश शंकर देव यांनी 'समर्थ शिष्य कल्याण' हा ग्रंथ १९४५ साली प्रसिद्ध केला. गेली ६७ वर्षे हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. त्याची दुसरी आवृत्ती नुकतीच मोरया प्रकाशनचे श्री.दिलीप महाजन यांनी कल्याण स्वामींच्या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त प्रसिद्ध केली आहे. अत्याधुनिक छपाई तंत्रामुळे दोन्ही आवृत्यांमधील फरक झटकन लक्षात येतो. त्यात कल्याण स्वामींचे हस्ताक्षर, त्यांचे मौलिक पत्र, डोमगाव येथील त्यांचे समाधी मंदिर, ते परळीहून पाणी आणीत ते मोठे हंडे यांची रंगीत चित्रे सादर केल्याने पुस्तक अतिशय सुबक आणि सुरेख झाले आहे.

या ग्रंथाचे ३ भाग आहेत. पहिल्या भागात कल्याण स्वामींची समग्र कविता असून दुसऱ्या भागात कल्याण स्वामींच्या शिष्यप्रशिष्यांनी केलेले कल्याण स्वामींचे स्तवन आहे. या भागात सुमारे ५६ रचनांचा अंतर्भाव असून स्तवनपर एवढ्या रचना समर्थांच्या अन्य कुणाही शिष्यावर नाही. यातच कल्याण स्वामींचे श्रेष्ठत्व सामावले आहे. तिसऱ्या भागात कल्याण स्वामींचे चरित्र दिले आहे. चरित्र गद्यमय असून पहिल्या दोन भागांतील सर्व रचना पद्यमय आहेत. या ग्रंथाच्या आधारेच माझे 'कल्याणा, छाटी उडाली' हे पुस्तक मी लिहिले आहे. अनेकांची अशी चुकीची समजूत आहे की 'सोलीव सुख' हे प्रकरण समर्थांचे आहे. पण ते कल्याण स्वामींचे असून देवांनी पहिल्या भागात ते छापले आहे. समर्थांच्या कृपास्पर्शाने कल्याणांचे अंतर्बाह्य जीवन कसे बदलले ते त्यांनी अनुभवाचे बोल काव्यबद्ध केले आहेत. समर्थांच्या स्पर्शाचा असाच प्रभाव दिनकर स्वामींवर झाल्याने स्वानुभव दिनकर या ग्रंथात पहायला मिळतो.

हा ग्रंथ म्हणजे कल्याण स्वामींचा ज्ञानकोश झालेला आहे. कै.देवांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'ऑल अबाऊट कल्याण'. त्यात कल्याणांच्या हिंदी कवितेचा पण अंतर्भाव आहे. कल्याण स्वामींच्या विविध आरत्या, भूपाळ्या, पंचीकरण, शुकअख्यान, ध्रुवअख्यान, अन्य देवांचे स्तवन करणाऱ्या रचना, समर्थांचे स्तवन करणारी पदे, स्फुटश्लोक, अष्टपदी, नाममहिमा सांगणाऱ्या रचना या सगळ्यांचा अंतर्भाव पहिल्या भागामध्ये वाचता येईल.

नमस्कार माझा तया दासबोधा (पान ५५), हृदय कल्याणाचे (पान ९५) श्रोत्यांची प्रार्थना (पान १३०) या रचनांवर समर्थांची विलक्षण छाप आढळते. पान १११ वरील 'सज्जनाचा वेध' या रचनेत कल्याण स्वामींनी स्वतःकडे नारीभाव किंवा दासीभाव घेतला आहे. संतमाळेतील रचनेत (पान ५३) अनेक वारकरी संतांचे स्तवन आहे. समर्थांनीदेखील संतांच्या आरतीत विविध वारकरी संतांना वंदन केले आहे. समर्थांप्रमाणेच कल्याण स्वामींनी गणेश, शारदा, श्रीराम, श्रीहनुमान, दत्तात्रेय, शंकर, श्रीकृष्ण या विविध देवांची पदे रचली आहेत. समर्थांच्या आरतीत 'नृप शिवाजी तारीला' हा स्पष्ट उल्लेख शिवसमर्थ भेटीचे कागदपत्र समजावे.

दुसऱ्या भागात अनंत कवी, आत्माराम महाराज, केशव स्वामी उंब्रजकर, तडवळ्याचे जगजीवन, दिगंबर, तुळजापूरचे नरहरी, मोरोपंत, राघव, लक्ष्मण, शिवराम, शिवदिनकेसरी या विविध संतकवींनी कल्याण स्वामींच्या गुणांचे वर्णन करणाऱ्या विविध रचना आहेत. ही सुमारे ३० पृष्ठे वाचली म्हणजे कल्याण स्वामींचा केवढा प्रभाव संप्रदायावर होता ते ध्यानात येते. कल्याण स्वामी हे काही समर्थांचे उत्तराधिकारी नव्हते पण समर्थांच्या शिष्यांची यादी करताना समोर पहिले नाव त्यांचेच येते. तिसऱ्या भागातील त्यांचे चरित्र वाचताना त्यांचा अधिकार अनेक प्रसंगांतून प्रकट होतो. स्वतः समर्थांनी अनेकदा शिष्यांची परीक्षा घेतली त्यात कल्याण स्वामींच कसोटीला उतरले हे ध्यानात येते. कल्याण स्वामी हे दासबोध ग्रंथाचे लेखनिक तर होतेच पण त्यांनी रचलेली दासबोधाची आरती रोज सज्जनगडावर दासबोध वाचनानंतर म्हटली जाते. हा त्यांचा केवढा मोठा सन्मान आहे !

समर्थ भक्तांनी समर्थ समजावून घ्यायचे असतील तर हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा. याचा प्रामाणिकपणे अभ्यास करावा. ३०० व्या पुण्यतिथी निमित्त कल्याण स्वामींचे स्मरण, मनन, चिंतन करण्याची ही सुवर्णसंधी सोडू नये. श्री.दिलीप महाजन यांनी हा ग्रंथ पुन्हा प्रकाशात आणला म्हणून त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. श्री.महाजन हे रामदासीच असून कै. अनंतराव रामदासी यांच्या परंपरेतील निष्ठावान साधक आहेत. धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिराने उदार अंतःकरणाने त्यांना प्रकाशनाची परवानगी दिली म्हणून हा ग्रंथ उपलब्ध होऊ शकला हे विसरून चालणार नाही.

**विशेष सवलत**

**आषाढ शु. १३ शके १९३५ ते १९३६ या श्री कल्याणस्वामींच्या त्रिशत पुण्यतिथी वर्षात वर्षभर हा ग्रंथ सवलत मूल्य केवळ १५० रु.त मिळणार आहे. वाचकांनी मोरया प्रकाशनशी संपर्क साधावा.**

## सुविद्या प्रकाशनाची श्री विठ्ठल भक्तांना अनोखी भेट

आषाढ शुद्ध एकादशीचा सुंदर योग साधून सुविद्या प्रकाशन, सोलापूर यांनी संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ.नरेंद्र कुंटे यांच्या 'अहर्निशी परमार्थ, 'भक्तिपंथाच्या पाऊलखुणा', आणि 'वारकरी संप्रदायाचा भक्तिसोपान' या तीन छोटेखानी ग्रंथाचे प्रकाशन केले आहे. डॉ. कुंटे सरांचे दै. तरूण भारत, दै. लोकमत, दै.जागर या सुप्रसिद्ध दैनिकांत सदररूपात प्रसिद्ध झालेले व वाचकांच्या पसंतीस उतरलेले संतसाहित्याचे चिंतन यामुळे वाचकांना स्थायी स्वरूपात उपलब्ध झाले आहे.

'अहर्निशी परमार्थ' या छोटेखानी ग्रंथात संत श्री तुकाराम महाराजांच्या गाथ्यातील निवडक अभंगांवर भाष्य केले आहे. अभंगांच्या माध्यमातून व्यक्त होणारे श्री तुकोबारायांचे भाव, आराध्यदैवत पांडुरंगाशी साधलेला संबंध व संवाद यातून त्यांचा आंतरिक प्रवास समजतो. त्याचबरोबर आपल्या प्रपंचात राहून परमार्थ कसा साधावा, याची गुरुकिल्ली वाचकांना मिळते.

'भक्तिपंथाच्या पाऊलखुणा' या ग्रंथाद्वारे भक्तिमार्गावर चालणाऱ्या साधकासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन केले आहे. यात गुरूकृपेचे महत्त्व, नामसाधना व पथ्ये, देवप्राप्तीचे इंगित, मंत्रदीक्षा, चिंतनाचे महात्म्य, ज्ञानप्राप्ती या विषयासंबंधी अतिशय सोप्या भाषेत परंतु सांगोपांग मार्गदर्शन केले आहे.

'वारकरी संप्रदायाचा भक्तिसोपान' या ग्रंथात 'निवृत्ती ते निळोबा अशा वारकरी संप्रदायातील समृद्ध संतपरंपरेचा परिचय वाचकांना होतो. या ग्रंथात संत निवृत्ती महाराज, संत श्रीज्ञानेश्वर, श्रीसोपान, संत मुक्ताई, संत जनाई, नामदेव, श्री गोरोबा, श्री विसोबा खेचर, श्री सावतोबा, श्री नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत सेना महाराज, संत कान्होपात्रा, श्री भानुदास, श्रीनिळोबा अशा संतमालिकेच्या चरित्र व भक्तिमार्गी विचारांचा परिचय करून देऊन..

**साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले।**
**अवघे मिळोनि एकचि, जाले। देहातीत वस्तु।।**

(दासबोध)

या समर्थोक्तीचा प्रत्यय प्रा. डॉ. कुंटे सर आपल्या लेखणीतून आणून देतात. या तीनही ग्रंथाद्वारे विठ्ठल भक्तीचा मळा यंदा अधिक फुललेला आहे. वाचकरूपी भ्रमर याचा आनंद निश्चित घेतील असा विश्वास वाटतो.

प्रकाशक- सुविद्या प्रकाशन, सोलापूर
(०२१७) २७२२५१०

लेखक- प्रा.डॉ.नरेंद्र कुंटे, मो. ९४२२६५३६३६

मूल्य - १) अहर्निशी परमार्थ - रु.४०/-
२) भक्तिपंथाच्या पाऊलखुणा - रु.५०/-
३) वारकरी संप्रदायाचा भक्तिसोपान-रु.९०/-

**'रघुवीर समर्थ' मासिकाची वर्गणी भरण्यासाठी व जाहिरात, पृष्ठप्रायोजन सेवा करण्यासाठी मासिकाच्या पुढील प्रतिनिधींशी संपर्क करावा.**

| | प्रतिनिधीचे नाव | ठिकाण | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|
| १) | श्री. ठोंबरे श्रीपाद रघुनाथ | बारामती | ९६८९६०३६६६ |
| २) | श्री. माधव रामचंद्र देशपांडे | सांगली | ९८६०२४२४२३ |
| ३) | श्री. तुकाराम गोविंदराव मार्कंडेय | जालना | ९४२३४५७६६५ |
| ४) | श्री. सुधाकर भगवान रामदासी | बीड | ९४०३४८६६६९ |
| ५) | डॉ. अशोक नारायणराव कुलकर्णी (सेलगांवकर) | परभणी | ७५८८५७१६०१ |
| ६) | श्री. सोपान रामभाऊ तिडके | जालना | ९४२१४२५५७८ |
| ७) | सौ. निशा श्रीकांत महाशब्दे | नंदुरबार | ९८२३५४८६४९/९४२१५२४२३८ |
| ८) | सौ. पुष्पा विश्वनाथ प्रभुणे | ठाणे(मानपाडा) | ९८२०१०४६६५ |
| ९) | श्री. दिलीप दिनकर जोशी | बुलढाणा | ९८५००७९४६७ |
| १०) | श्री. केदार कृष्णनाथ कुलकर्णी | वाई | ९९२२२३४००३ |
| ११) | श्री. दिलीपकुमार पोपटराव माने | करमाळा (जि. सोलापूर) | ८००७२२७७७५ |
| १२) | श्री. रामचंद्र भगवंत गौरकर | बार्शी (जि. सोलापूर) | ९७६३१३८८२६ |
| १३) | श्री. संजय हरिदास पाटील | पंढरपूर | ८४४६४१९१४२ |
| १४) | सौ. सखी प्रदीप कुलकर्णी | लासलगाव(जि.नाशिक) | ९२७२२५१०३० |
| १५) | श्री. नरेंद्र कवडे | पंढरपुर | ९४२१०३१७३२ |
| १६) | श्री. स्वानंद कुलकर्णी | मिरज | ९४२२६१५६१९ |
| १७) | श्री. अनिल शिवाजीराव मुळे | औरंगाबाद | ९४२३१४८४८२ |
| १८) | श्री. प्रदीप नातू | कल्याण | ९९६७३७९३१६ |
| १९) | श्री. कुलकर्णी अशोक दिगंबर | (अंबरनाथ) ठाणे | ९८६९४६८५२० |
| २१) | श्री. धीरज पेटकर | (फलटण) सातारा | ९४२११११९६११ |
| २२) | श्री. रोहित कुलकर्णी | परभणी | ९८९०५३११३३ |
| २३) | श्री. शरद वामन बारपांडे | चाळीसगांव | ९७६७२५४७२८ |
| २४) | श्री. उदय लक्ष्मीकांत सभारंजक | नेवासा(जि. अहमदनगर) | ९८८११७७०२६ |
| २५) | श्री. सुधीर रामदासी | निलंगा (लातूर) | ८०५५१०४०६३ |
| २६) | श्री. संतोष कुसूरकर | कोयाळ (जि. अहमदनगर) | ९३२६६९९९८४ |
| २७) | श्री. श्रीधर सीताराम रामदासी | माजलगांव (जि.बीड) | ९४२३७५७३५२ |
| २८) | श्री. नितिन देसाई | जबलपूर(म.प्र.) | ०९४२५८००८९२ |
| २९) | श्री. विनोद चावरे | नांदेड | ९४२३१३५६७५ |
| ३०) | श्री. रोहित गौरीशंकर वाळिंबे | (भोर) पुणे | ७८७५६३१५०५ |
| ३१) | श्री. सोपान तिडके | जुना जालना | ९४२१४२५५७८ |

## कीर्तन शिबीरातील शिबीरार्थींचे मनोगत

लहानपणी मी एकदा माझ्या आजीबरोबर कीर्तनाला गेले. एवढाच माझा कीर्तनाशी संबंध. पण मी काय ऐकले ते मला आठवत नाही. त्यात माझी मैत्रीण कीर्तन करते हे कुतूहल होते व आपण पण कीर्तन शिकावे असे मला वाटले. माझ्या मैत्रिणीने मलासुद्धा आग्रह केला की तू सुद्धा माझेबरोबर कीर्तन शिकायला चल. मी आई-वडिलांना विचारले की मला कीर्तन शिकावयाचे आहे तर मी कीर्तन शिबीराला जाऊ का ? तर माझे आई-वडील मला म्हणाले 'अवश्य कीर्तन शिक ! आपण तर संत आहोत व तू कीर्तन शिकलीस तर त्या नावाचे सार्थक होईल. त्यांनी मोठ्या आनंदाने मला कीर्तन शिकण्यास परवानगी दिली.

कीर्तन म्हणजे काय ? हा मोठा प्रश्न होता माझ्या समोर. कीर्तनाची 'की' सुद्धा माहित नव्हती मला. त्याच दरम्यान मला सज्जनगडावर कीर्तनाचे शिबीर असल्याचे कळले. तर मी सज्जनगडावर गेले होते. शिबीराच्या पहिल्या दिवशी कीर्तन कसे करावे हे माहित नसताना मला समोर उभे केले आणि एक कीर्तनाचा भाग वाचायला दिला. मी कशी वाचन करते ? माझी भाषा, माझा आवाज त्यांनी बघितला. त्यानंतर बुरसे बुवांनी आम्हाला कीर्तन करताना त्याच्यात भाव, व्यक्तिचित्र कसे रेखाटतात हे शिकवले. नंतर आम्हाला कीर्तनाच्या श्लोकांचे अर्थ पटवून दिले आणि आम्ही ते लोकांना कसे समजावून सांगायचे हे त्यांनी शिकवले. त्यांनी आमच्याकडून तेवढा सराव करून घेतला. सकाळी पूर्वरंगाचा व दुपारी उत्तररंगाचा सराव असा आमचा दिनक्रम होता. बुरसे बुवांनी आम्हाला खूप नवीन श्लोक शिकवले व त्याचा मतितार्थ समजावला. कीर्तनाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे आम्हाला खूप ज्ञान प्राप्त झाले. शिबीराच्या शेवटच्या दिवशी त्यांनी आम्ही केलेला सराव बघितला.शेवटच्या दिवशी आम्ही सगळ्यांनी कीर्तन केले. मी कीर्तन करत असताना आधी थोडी घाबरलेली होते परंतु एकदा कीर्तन सुरू केले आणि त्या कीर्तनात रमत गेले व पूर्ण कीर्तन पार पडले. आजच्या युगात कीर्तनाचे महत्त्व आजच्या पिढीला पटवून देणे हे खूप विशेष आहे. परंतु बुवांनी आम्हाला कीर्तनाचे महत्त्व पटवून दिले हे आमच्यासाठी खूप विशेष आहे. त्यानंतर मी दोने कीर्तने केली.

यापुढे कीर्तन शाळा-कॉलेजामधून व्हावे व युवा पिढीला संस्कृतीच्या चांगल्या परंपरा वाढविण्याचे धडे त्यातून मिळावे. समर्थ भारत उभारण्याच्या कामात कीर्तनातून हातभार लागणार आहे व त्या दृष्टीने कीर्तनाची मांडणी कशी होईल याचे मार्गदर्शन मी सज्जनगड संस्थानातून मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे.

**-कु. स्वरांजली प्रशांत संत**

❖❖❖

मी एक यजुर्वेदाचा छोटासा शिष्य आळंदीत असतो. माझं आळंदीत वेदाचं शिक्षण चालू होतं आणि आळंदीला नृसिंह मठात स.भ. वासुदेवबुवांची ७ दिवस कीर्तनं आहेत, म्हणून कळलं. मला तर कीर्तन ऐकण्याचा फार छंद हो ! पण खर सांगतो त्यांच्या कीर्तनाची प्रतिमा माझ्यावर अशी उमटली की विचारता सोय नाही. कीर्तन संपलं की बुवांकडे गेलो आणि बुवांना म्हणालो मलाही तुमच्यासारखं कीर्तन शिकायचं. त्यावेळेस त्यांनी मला सांगितलं की तू सज्जनगडावर ये. मला गडावरची माहिती सांगितली. ह्याआधी मी समर्थांचं वंदनीय असं चरित्र, दासबोध वाचला. कीर्तन शिबीरास आलो.

पहिल्या दिवशी आपला परिचय करून द्यायचा असं ठरलं. माझी वेळ आली, तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. तरी बुवांनी हिमंत दिली. हळूहळू वर्ग पुढे जात होता. जरा विचार करण्यासारखी गोष्ट की आमच्या सारख्यांना दोन वाक्य बोलणं अवघड आहे तर अशा विद्यार्थ्यांना दहा दिवसात कीर्तन बसवून घेण नुसतं कीर्तन बसवून घेणं नव्हे तर कीर्तनाचं महत्त्व पटवणं. दहा दिवसांत अवघ्या कीर्तनाचा महिमा सांगणं. कीर्तन जीवनात उतरवणं,

कीर्तनातील त्या प्रसंगात त्या विद्यार्थ्याला उतरवण, कीर्तनाचे शब्द श्रोत्यांच्या मनात रूजवणे, अगदी सामान्यातील सामान्य मुलाला देखील आणि हुशारातल्या हुशार मुलाला देखील पचवायला सोपं जावं अशा पद्धतीने शिकवणे खरंच याला कीर्तन म्हणतात. काही लोक म्हणतात ज्याला काही येत नाही तो टाळ कुटतो म्हणजेच कीर्तन करतो. पण जो बुवांना जवळून अनुभवतो तो सहज म्हणतो, ज्याला सगळं येतं तोच कीर्तन करतो. याला म्हणाव, एक गुरू, एक उत्तम कीर्तनकार. त्यामुळे बुवा रोज सांगायचे कीर्तन बाहेरून आत नको जायला. ते आतून बाहेर निघावं. महत्त्वाचं म्हणजे ते म्हणायचे कीर्तन म्हणजे शब्दानुभव आहे. असे गुरू लाभणं फार अवघड आहे. म्हणून ज्ञानेश्वर महाराज देखील ज्ञानेश्वरी मध्ये म्हणतात एक परीस देखील लोखंडाला सोनं करतो पण परीस करत नाही. पण गुरू हा विद्यार्थ्याला नुसतं सोनं करत नाही तर परीस करतो हे अनुभवल्याशिवाय कळत नाही.

असं करता करता समर्थांसमोर उभं रहायचा दिवस प्रगटला. मनात थोडीशी भिती, थोडा आनंद पण बुवांच्या मार्गदर्शनाने सगळ्या गोष्टीला झुंज देऊन आमच्या ३५ विद्यार्थ्यांचा संच येतो आहे व समर्थांच्या चरणाशी आणि अधिकारी श्रोत्यांच्या मनाला भिडणारी शब्द सुमनांजली वाहतो आहे. प्रत्येकजण आत्मविश्वासाने बोलतो आहे. समर्थचरणी सेवा रूजू करतो आहे. आनंदात चक्क दोन तासाचं अस्खलीत किर्तन समर्थांच्या व बुवांच्या आशिर्वादाने पार पाडू शकलो.

एखाद्या मुलीचं लग्न झालं की ती जेव्हा निघते आणि निघाल्यावर मागे वळून पाहते. तेव्हा तिच्या काळजात पाणी येते. अगदी तसे आम्हाला गड उतरताना झालं. जसं त्या मुलीला आई पाठीवरून हात फिरवून पंखात बळ आण असं म्हणते तसंच समर्थांनी आम्हाला सांगितलं. समर्थ संप्रदायाचं नाव हे सुवर्ण पटलावर लिहिण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी समर्थांचा, सर्व अधिकारी वर्गाचा, स.भ.वासुदेव बुवांचा मला आशिर्वाद हवा आणि खांद्याला खांदा देणारी सर्व कीर्तन शिबिरातील प्रखर व्यक्तिमत्त्वे माझ्या जीवनात हवी !

**-चि. वे. मू. शुभम भानुदास पंचभाई**

❖❖❖

**भगवंतास कीर्तन प्रिये। कीर्तने समाधान होये।**
**बहुत जनासी उपाये। हरिकीर्तने कलयुगी ।।**

समर्थांनी कीर्तनाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य सुरू केले. या मधल्या काही वर्षांत या रामदासी कीर्तन परंपरेला आलेली मरगळ दूर करण्यासाठी समर्थ रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांच्यामार्फत कीर्तन शिबिर आयोजित करण्यात येते. ११०० मठांपैकी आज जेवढे मठ अस्तित्वात आहेत त्या प्रत्येक मठातून एक कीर्तनकार आणि मठपती तयार व्हावा तसेच मठाच्या आजूबाजूच्या परिसरातून रामदासी कीर्तनकार तयार व्हावेत अशी संस्थानाची अपेक्षा आहे.

मे २०११ पासून कीर्तन प्रशिक्षण शिबिरास सुरूवात झाली. शिबिराचे हे तिसरे वर्ष. संस्थानाने रामदासी कीर्तनकारांची तरूण पिढी घडविण्याचे उत्तम कार्य हाती घेतले असून या शिबिराला महाराष्ट्रातूनच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरूनदेखील प्रतिसाद मिळत आहे. शिबिराच्या तीनही वर्षात महाराष्ट्रातील विविध भागांतून विद्यार्थी कीर्तन प्रशिक्षणासाठी आले होते. कीर्तन प्रशिक्षणात विशेष म्हणजे कुठलाही भेदभाव न बाळगता सर्वांसाठी सुरू केलेला रामदास स्वामी संस्थानचा रामदासी कीर्तनकार घडवण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे.

या शिबिराला प्रशिक्षक म्हणून स.भ.वासुदेव बुवा बुरसे आणि त्यांच्या पत्नी सौ. गीताबाई वासुदेव बुरसे यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. संस्थानने बुरसे बुवांची कीर्तन प्रशिक्षक म्हणून नेमणूक करून आम्हा प्रशिक्षणार्थींवर समर्थ कृपाच केली. त्यांच्या ओघवत्या वाणीतून जणू समर्थ स्वतःच मला शिकवत आहेत असे सतत जाणवत होते.

सर्व विद्यार्थ्यांची सकाळच्या चहा-नाष्ट्यापासून जेवणाची, राहण्याची, निवासाची उत्तम व्यवस्था

संस्थानतर्फे करण्यात आली होती. कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून शहाजीबुवा रामदासी आणि प्रसादबुवा रामदासी हे सर्व शिबिरार्थींकडे कटाक्षाने लक्ष देत असत.

१० दिवस चाललेला हा कीर्तन प्रशिक्षण सोहळा संपूच नये असे वाटत होते. विशेष म्हणजे समर्थ वंशज श्री. भूषण स्वामी यांचा मुलगा चि. साक्षेप हादेखील कीर्तन प्रशिक्षणात सहभागी झाला होता.

दि. १८ मे रोजी श्री समर्थ मंदिरातील सभामंडपात आमचे कीर्तन प्रात्यक्षिक घेण्यात आले. आम्हा कीर्तन प्रशिक्षणार्थींचा कौतुक सोहळा बघण्यासाठी समर्थ वंशज श्री.भूषण स्वामी, श्री.बाळासाहेब स्वामी आणि मोहनबुवा रामदासी उपस्थित होते. आमच्या सर्वांचा दि. १९ मे रोजी प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अशा प्रकारे १० दिवसांचा कीर्तन प्रशिक्षण सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी मी असं सांगू इच्छिते की आपण सगळे मिळून कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून हिंदू समाजावर आलेली मरगळ दूर करण्याचा प्रयत्न करू व हिंदूंना संघटितपणे उभं करण्याचा प्रयत्न करू.

**-कु. रेणू रामदासी**

❖❖❖

भक्ती, ज्ञान आणि नाट्य ह्या तीनही कलांचा संगम म्हणजे कीर्तन. कीर्तन हे आजच्या २१ व्या शतकात सर्वोत्तम भक्ती मार्ग सांगितला आहे.परंतु आजची परिस्थिती काही वेगळीच आहे. आज आपण कीर्तनाला गेलो की तरु ण पिढी आपल्याला दिसते का ? सर्व वृद्धजन आपल्याला दिसतात. तेही वेळ जावा म्हणून ! कीर्तन म्हणजे टाईमपास नव्हे! कीर्तन म्हणजे लाईफपास आहे. हे मला कीर्तनातून शिकायला मिळालं.

मी इयत्ता सहावीला असताना माझ्या वडिलांच्या नोकरी निमित्त आमचं कुटुंब दादरला रहायला आलो. माझ्या आईला देवधर्माची आधीपासूनच आवड होती. दादरच्या विठ्ठल मंदिरात दर्शन व कीर्तनासाठी आई व माझी मावशी नेहमी जात असे. मला वेळ मिळेल तसा मीही त्यांच्याबरोबर जात असे. तिथे मला ह.भ.प. श्री. शशिकांतबुवा उत्पात गुरूजींचे मार्गदर्शन लाभले.

पुढे एकदा संस्थेतच स.भ.श्री.कौस्तुभबुवा रामदासी यांचे कीर्तन ऐकण्याची संधी मिळाली. कीर्तन संपल्यावर मी कौस्तुभबुवांचा परिचय करून घेतला. त्यावेळी बुवांनी मला सज्जनगडावरच्या कीर्तन शिबिराबद्दल माहिती दिली व मी त्यांच्या बरोबरच गडावर गेलो.शिबिरात प्रशिक्षक म्हणून स.भ.श्री.वासुदेवबुवा बुरसे हे लाभले. ह्या दहा दिवसांच्या शिबिरात मी खूप काही शिकलो. प्रसंगातील भाव कीर्तनात उतरवण्याची पद्धत मला विशेष आवडली.प्रसंगातील भाव व त्यातील उत्कटता गुरूजी समजावून सांगत असत. प्रत्येकाला उभ करायचं, त्याला सर्वांसमोर बोलता यावं हा त्यांचा उद्देश. गुरूजी म्हणत,''प्रसंग जगा त्याशिवाय कीर्तन होऊच शकत नाही !'' अशी शिकवण्याची पद्धत मी आजपर्यंत अनुभवलेली नव्हती.

प्रत्येक विद्यार्थ्याला ७ ते ८ दिवसांमध्ये समर्थ समाधीसमोर कीर्तन करण्यासाठी तयार करायचं यापेक्षा अवघड कार्य काय ? पण ४ ते ५ दिवसांत सगळे मुलं फाड फाड बोलू लागले. ही सगळी किमया आमचे या गुरूजींचीच बर का ! आज गुरूजींच्या हातून दर वर्षी या शिबिरातील ३० ते ४० विद्यार्थी घडत आहेत. गडावरून कीर्तनकारांची रत्नांची खाण बाहेर पडून ठिकठिकाणी कीर्तनं करून समर्थांचा संदेश लोकांपर्यंत पोहचवत आहे.

असा हा कीर्तन शिबिराचा आनंद अविस्मरणीय आहे. गडावरती राहण्याची व भोजनाची सोय अतिशय उत्तम होती. कुठल्याही प्रकारची कमतरता आम्हा सर्व शिबिरार्थींना जाणवली नाही. याचे सर्व श्रेय स.भ. शहाजी बुवा रामदासी यांनाच जाते कारण त्यांनी आमची खूप काळजी घेतली. हे शिबिर आयोजित करून सज्जनगड संस्थानने आमच्यासाठी ज्ञानाची शिदोरीच खुली केली आहे.

**केदार संतोष पानसरे, इ.९ वी**

❖❖❖

# श्री कल्याणस्वामी त्रिशताब्दी पुण्यतिथी महोत्सव समिती

## डोमगांव व परंडा

१७ जुलै २०१३ ते २१ जुलै २०१३ (२११ वी आषाढ शु. १३ शके १९३५)

### कार्यक्रम पत्रिका

सर्व भाविकांना कळविण्यात येते की, श्री कल्याण स्वामी त्रिशताब्दी पुण्यतिथी महोत्सव, संयुक्त समिती, परंडा व डोमगांव यांचे वतीने श्री कल्याणस्वामींची २११ वी पुण्यतिथी उत्सवानिमित्त खालील कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरी सर्व भाविकांनी यात तन-मन-धनाने सहभागी होऊन आपली सेवा रूजू करावी.

| कार्यक्रम | डोमगांव | परंडा |
|---|---|---|
| 'श्रीस' अभिषेक | सकाळी ६ वाजता | सकाळी ७ वाजता |
| श्रीमत् दासबोध पारायण | सकाळी ८ ते १ | सकाळी ८ ते १२ |
| महिला भजनी मंडळाचे भजन, हरिपाठ | दुपारी ३ ते ४ | दुपारी ३ ते ४ |
| दैनंदिन उपासना, आरती | सायं. ६ ते ७ | सायं. ६ वा. |
| किर्तन | सायं. ४ ते ६ | रात्री ९ वाजता |

### कीर्तन महोत्सव

वेळ- डोमगांव येथे दुपारी ४ ते ६, परंडा येथे रात्री ९ ते ११

| | |
|---|---|
| बुधवार-१७/७/२०१३ | समर्थभक्त उदय श्रीनिवास कुलकर्णी, मिरज |
| गुरूवार-१८/७/२०१३ | समर्थभक्त कु.अनुपमा कांडळगांवकर, मुंबई |
| शुक्रवार-१९/७/२०१३ | समर्थभक्त प्रसादबुवा रामदासी, सज्जनगड |
| शनिवार-२०/७/२०१३ | समर्थभक्त राघवेंद्र देशपांडे, ढोकी |
| रविवार-२१/७/२०१३ | डोमगांव येथे गुलालाचे कीर्तन राष्ट्रीय कीर्तनकार भरतबुवा रामदासी,बीड यांचे |
| वेळ स. १० ते १२ | परंडा येथे गुलालाचे कीर्तन वेण्णास्वामी मठाधिपती, कौस्तुभबुवा रामदासी, मिरज |
| | नंतर दोन्ही ठिकाणी आरती व महाप्रसाद होईल. |
| सोमवार-२२/७/२०१३ | 'गुरुपौणिमेनिमित्त' सकाळी ९ वाजता प्रथेप्रमाणे गुरुपूजनाचा कार्यक्रम. |

टीप - परंडा येथे समर्थ शिष्यवर योगीराज श्री कल्याणस्वामी यांचे देहविसर्जन स्थळ (आद्य समाधी) असून डोमगांव येथे स्वयंभू समाधी व श्रीराम मंदिर आहे.

पारायणासाठी बाहेरगावाहून येणाऱ्याची निवास व भोजन व्यवस्था केली आहे. कृपया येण्यापूर्वी आठ दिवस आधी संपर्क करावा म्हणजे व्यवस्था करणे सोईचे होईल. व त्यांचे कडून सहकार्य अपेक्षित आहे.

टीप- देणगी चेक/रोख/डी/डी.च्या स्वरूपात स्वीकारली जाईल.

(A/C. No. ५२१७४३८७१११८ श्री. कल्याणस्वामी मठ संस्थान, डोमगांव)

संपर्क :

**श्री. अविनाश जहागीरदार,** डोमगांव, ९४२१४८१२२८

**श्री. अजय कुलकर्णी,** बार्शी, ९८८१७९३१६३

**श्री. पुरूषोत्तम वैद्य,** परंडा, ९९६०१०१९९१, (०२४७७) २३२३८९

**डॉ. श्री.संजय जहागीरदार,** डोमगांव, ९४२२९६३२६३, ९६०४९९३८४४४

**श्री. रामचंद्र गौरकर (सर)**, बार्शी, ९७६१३८८२६

# संस्कार शिबीरातील शिबीरार्थींचे मनोगत

**मना वासना दुष्ट कामा नये रे।**
**मना सर्वथा पापबुद्धि नको रे।।**
**मना धर्मता नीती सोडू नको हो।**
**मना अंतरी सार विचार राहो।।श्रीराम।।**

गडावर संस्कार शिबिर सुरू होते. तसेच त्या शिबिरातला एक दिवस पालकांसाठी आहे असे समजल्यावर खूप आनंद झाला. लगेच तिसगावच्या प्रकाशबुवांना व गडावरील शहाजीबुवांना फोनाफोनी करून गडावर येण्याचे निश्चित झाले. प्रचंड पाऊस सुरू होता तरी जायचे नक्की केले. जायचा दिवस उजाडला. निघायची गडबड सुरू झाली. त्या गडबडीतच छत्री व स्वेटर घ्यायचे विसरले. पण समर्थांवर पूर्ण भार टाकला होता आणि कदाचित समर्थांचीच अशी इच्छा असावी की, मी गडावर यावं म्हणून की काय कोठेही रस्त्यात आम्हाला पाऊस लागला नाही. गडावर पोहोचल्यावर आम्हाला एक खोली दिली गेली. त्यात आम्ही एकूण दहा जणी होतो. मैत्री व्हायला फार वेळ लागला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून काकड आरतीला गेलो. काकड आरतीनंतर जरा इकडे-तिकडे फिरून ९.०० वाजता नाष्टा करून १०.०० वाजता आमचे सत्र सुरू झाले. सत्रानंतर संध्याकाळी उपासनेला बसलो. पण तिसगांव येथील श्री. दिनकर स्वामींच्या मठातच बालपण गेल्यामुळे संस्कार, उपासना यांचे बाळकडूच मिळालेले होते. पण लग्नानंतर त्यावर जी धूळ साठली ती येथे येऊन निघायला लागली होती.

श्री. मराठे सर यांनी आज मुलांना आपण कसे समजावून घ्यायला हवे ते खूप छान व सोप्या भाषेत सांगितले. तसेच सुनितीताईंनी पाल्यांची 'पालकाकडून अपेक्षा'' या विषयावर आपण मुलांना कसं गोष्ट सांगत एखादी गोष्ट किंवा पद्धत समजावून सांगतो त्याप्रमाणे सांगितले. यामुळे दुपारचं गरमागरम जेवण... नाही जेवण म्हणता येणार नाही प्रसादाला...! तो पोटभर खाऊनही थोडीसुद्धा डुलकी आली नाही. नंतर तिसरं सत्र परत मराठे सरांचं. त्यांनी आपण कसे वागले पाहिजे हे आम्हाला सांगितले व पटवून दिले. नंतर शेवटची १० मिनिट उरली असताना भूषण स्वामींना आम्ही विनंती केली की त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावं.आणि त्यांनीही आमची विनंती स्वीकारून आम्हाला मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी आयुष्यभर त्यांची ऋणी राहीन. त्यांनी आम्हाला बहुमोल असं मार्गदर्शन केले. 'जे त्रैलोक्याहून वेगळं। जे वेदश्रुतिसी नाकळे।। तेची जयाचेन वोळे। परब्रह्म अंतरी।।''

अशा रितीने सत्राचा समारोप झाला. गडावर आल्यावर आपण आपल्या माहेरी आलो आहोत असे वाटले. नवीन मैत्रिणी मिळाल्या, मोठमोठ्या लोकांशी चर्चा करायला मिळाली, त्यांना आपले प्रश्न विचारून शंकेचं निरसन करून घेतलं. एका दिवसात खूप काही समजले. आपण मुळात रामदासी आहोत व आपण काहीतरी केलं पाहिजे याची जाणीव झाली. मराठे सरांनी सांगितलेल्या गोष्टींप्रमाणे आमच्या रस्त्यातील दगड बाजूला झाला.

आम्हाला एका दिवसात एवढं काही मिळालं तर आमच्या शिबिरात आलेल्या मुलांना आठ दिवसात किती मिळालं असेल याची प्रचिती मला माझ्या मुलीच्या वागण्यातून समजली. तसेच ती व मी आम्ही दोघीही सतत गडावरच्या गप्पातच रमलेलो असतो. माझ्या मुलीलाही आता गडाची ओढ लागली आहे. व ही ओढ कायम ठेवण्यासाठी दरवर्षी वेगवेगळ्या शिबिरांचं आयोजन करावं ही विनंती.

बाळासाहेब स्वामी, भूषण स्वामी, मोहनबुवा रामदासी, प्रकाशबुवा रामदासी या मोठ्या व्यक्तींचा आशिर्वाद व समर्थांची कृपा सदैव आमच्यावर राहू देत.
माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी।
परी मी आहे। जगज्जीवनी निरंतर।।

गडावर याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. शिबिराच्या निमित्ताने गडावर राहण्याचा योग आला याचे श्रेय श्री रामदास स्वामी संस्थानला जाते. त्याबद्दल मी

श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगडाचे ऋणी राहीन.

**सौ.रोहिणी अजय म्हाळस,मो.-९९२२८७८७६२**

**नमस्कार,**

श्रीरामदास स्वामी सज्जनगड संस्थान येथे नुकतेच आयोजित झालेल्या **संस्कार वर्ग शिबिराला** जाण्याचा योग आला. हो योगच म्हणावा लागेल. कारण मी आधी फक्त २ दिवसांसाठी जाणार होते for a change साठी पण तिथे गेल्यावर विचार बदलला आणि संस्कार वर्गाचा फॉर्म भरला व शिबिरार्थी झाले. आम्हा सर्व शिबिरार्थींना संध्याकाळी एकत्र बोलविण्यात आले आणि आम्हाला एकएक धक्केच बसले हो..! त्यातला पहिला धक्का म्हणजे आमचे मोबाईल काढून घेतले आणि तुम्हाला तर माहितीच आहे मोबाईल ही गरज राहिली नसून आपला अवयव झाला आहे. या धक्क्यातून सावरत नाही तोच दुसरा ९ दिवस घरच्यांशी बोलायचं नाही. दुसऱ्यातून सावरत नाही तोच तिसरा धक्का. सकाळी आंघोळ करून ६.०० वाजता सूर्यनमस्कारासाठी येणे. आमची तर वाटच लागली हो.. लवकर उठायची सवय नाही ना.. तो दिवस गेला. रात्री खोलीत आल्यावर सगळ्यांच्या ओळखी झाल्या. नंतर उपाध्ये व कुलकर्णी काकुंना सकाळी लवकर उठवायला सांगितले व झोपी गेलो. शिबिराचा पहिला दिवस उजाडला. आम्ही उठून आवरून सकाळी सूर्यनमस्काराला खाली गेलो. त्यानंतर नाश्ता आणि ८.०० वाजता सत्रासाठी जमायचो. सत्र ८ ते १२.०० वाजेपर्यंत चालायचे. एकतर इतका वेळ बसायची सवय नव्हतीच. त्यामुळे पाठ आणि पायांची वाट लागली होती. नंतर १२.०० ते २.१५ पर्यंत जेवण, विश्रांती व परत २.३० ते ६.०० वाजेपर्यंत सत्र मालिका.. पहिले १-२ दिवस कंटाळा आला. कटकट वाटायची. त्यात आमचे मराठे सर वेळेच्या बाबतीत एकदम काटेकोर. आम्हाला राग यायचा त्यांचा खूप आम्ही म्हणायचो ''काय झालं १-२ मिनिट उशीर झाला तर.. कुठे आभाळ कोसळणारे !'' पण नंतर कळलं नाही ते सांगतात ते आपल्या भल्यासाठीच. त्यामुळे नंतर जरी ते आम्हाला ओरडले तरी आम्हाला त्यांचा राग येत नव्हता.शिबिरात ३-४ दिवसांनी असं लक्षात आलं की मोबाईलशिवायही आपण जगू शकतो, आपण सकाळी आपल्या मनाने अलार्म न लावता उठू शकतो. एका जागेवर बसायची सवय लागली. जेवताना वायफळ गप्पा न मारता श्लोक म्हणत जेवायचो. वाढायची सवय लागली. ताटात कुठे काय वाढायचं ते शिकलो. जेव्हा पालकांसाठी एक दिवसीय शिबिर होतं तेव्हा माझी आई मला वाढताना पाहून अवाक झाली होती. दुसऱ्या दिवशी मला काकड आरतीला पाहून अजून एक धक्का बसला. आमच्यातले बदल आम्हालाच जाणवत होते.

शिबिरात आम्हाला वेगवेगळ्या विषयांवर सत्र आयोजित केलेले असायचे. त्यात आम्हाला एक सत्र दासबोधावर असायचं. त्यात दासबोधाची वैशिष्ट्ये, दासबोधातील राजकारण, पढत मूर्ख लक्षणे, चातुर्य लक्षण, सद्‌गुरू स्तवन, महंत लक्षण, शिष्य लक्षण, लेखनक्रिया निरूपण या समासांविषयी अतिशय सुंदर शब्दांत व आम्हाला पटेल असं मार्गदर्शन केलं. दुसऱ्या सत्रात आम्हाला हिंदू शास्त्रातील १६ संस्कारातील काही संस्कार सांगितले त्यात 'संस्कार म्हणजे काय ? विवाह, संस्कार, उपनयन संस्कार, गर्भधारणा संस्कार, जातकरण, नामकरण अशा वेगवेगळ्या संस्कारांबद्दल माहिती दिली. तिसऱ्या सत्रात आम्हाला क्रांतिकारकांबद्दल योगेश साळेगावकर, मोहन शेटे सर, घनश्याम ठाणे यांनी मार्गदर्शन केले. चौथे सत्र आम्हा सर्वांचे लाडके होते ते म्हणजे संगीताचे. एक तर आम्ही बाथरूप सोडून गायलो नाही आणि त्यात ते शास्त्रीय संगीत.. पण नंतर आमचा त्यातला रस वाढत गेला. आम्हाला संगीत शिकवणारे गुरुजीही एकच नंबर संगीत शिकवायचे. ह्यानंतर आम्ही उपासनेला जायचो. उपासनेचा रंगच काही वेगळा असायचा. इतकं छान वाटायच ... असं शब्दात नाही सांगता येणार हो..! असा आमचा ९ दिवस दिनक्रम चालत असे. आम्ही सगळे इतके त्या वातावरणात रमून गेलो, एकरूप झालो की ९ दिवस कसे गेले ते कळलेच नाही. आमचा पाय निघत नव्हता. तिथून सगळे जण

इतके रडलो अहो मुली काय मुलंपण रडली आणि आता जर आमच्यावर एखादी जबाबदारी सोपवली तर ती आम्ही निश्चितपणे पूर्ण करू. हा आत्मविश्वास आला आहे.

**सदा सर्वदा योग तुझा घडावा।**
**तुझे कारणी देह माझा पडावा॥**
**उपेक्षू नको गुणवंता अनंता।**
**रघुनायका मागणे हेचि आता॥**

अशी प्रार्थना समर्थचरणी करते व सज्जनगड संस्थानाला विनंती करते की दरवर्षी अशाच वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करावे व आमच्यापर्यंत वेगवेगळे विषय पोहचवावेत जे आम्हाला माहीत नाहीत पण ज्याची देशाला गरज आहे.

**-मृण्मयी अजय म्हाळस**

❖❖❖

**सामर्थ्य आहे चळवळीचे।**
**जो जो करील तयांचे।**
**परंतु तेथे भगवंताचे**
**अधिष्ठान पाहिजे॥**

संत पुरूषांच्या ठायी ईश्वराचे अधिष्ठान जागृत असते. त्यामुळे कितीही नास्तिक मनुष्य असला तरी तो आस्तिक होतो आणि हे बदल त्या ईश्वरी सामर्थ्यामुळेच घडतात. सामर्थ्याची भावना त्यांच्यात कोठून येते, तर त्यांच्या अंगी असलेल्या ईश्वरी अस्तित्वामुळे. त्यामुळेच तर लोक त्याला 'अघटित घटना तव शरणम्' म्हणून शरण जातात. आताची जी पिढी आहे ती फक्त चळवळच करते. त्यामुळे त्यांना यश मिळत नाही पण आम्हाला शिबिरात भगवंताचे अधिष्ठान ठेवून सत्याच्या बाजूने चळवळ करायला आम्ही सर्व विद्यार्थी शिकलो. प्रत्येक शिबिरार्थीने मनोगत व्यक्त करताना सांगितले की मी दररोज 'दासबोध ग्रंथ' वाचणारच. असं प्रत्येकाने ठामपणे सांगितले.

**केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे॥**

असा समर्थांसारखा आत्मविश्वास देणारे आम्हाला वक्ते, सर, आईचं प्रेम देणाऱ्या दोन मावशी आणि अमृत दादासारखा मोठा भाऊ मिळाला. वेदांविषयी, भारतीय संस्कृतीची ओळख आम्हाला मराठे सरांनी करून दिली. बोधे सरांनी आमची छान देशभक्तीपर गीते बसविली. दासबोधावर मोठमोठ्या वक्त्यांचे मार्गदर्शन मिळाले. योगेश महाराजांनी रामभक्त शबरी हा विषय ठेवलेला तेव्हा सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या. क्रांतीकारकांविषयी तर खूपच छान मार्गदर्शन मिळालं. मनाचे श्लोक, आत्मषटकम् हे रोज मयुर गुरूजी घ्यायचे. खर्डेकर सरांनी आम्हाला सूर्यनमस्कार शिकवले. सूर्यनमस्कार म्हणजे मारूतीरायांचीच उपासना.

**जे जे आपणांसी ठावे। ते ते इतरांशी सिकवावे॥**

शहाजी महाराजांनी आम्हाला सर्व गड फिरून दाखवताना जी-जी त्यांना माहिती होती ती त्यांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना सांगितली. त्याहून त्यांनी आम्हाला धाब्याच्या मारूतीकडे पटांगणात खेळायला मोकळीत दिली. पुन्हा दररोजची उपासना म्हणजे समर्थांच्या मुखातून करूणरसाने युक्त असलेली करूणाष्टके, सवाया, रामनामावली इ. समावेश असायचा. दासबोध वाचन तर एवढं सुरेख असायचे की शहाजी महाराजांनी वाचन करावं आणि आम्ही विद्यार्थ्यांनी एकाग्र चित्तानं ऐकावं. आम्हा विद्यार्थ्यांना जेवणात दररोज वेगवेगळे पदार्थ असायचे. असं आम्हाला जाणवलंच नाही की आम्ही शिबिरात आहोत. त्यामुळे आम्ही सर्व शिबिरार्थी रामदास स्वामी संस्थानचे ऋणी आहोत. म्हणून मी संस्थानला एकच सांगू इच्छिते तुम्ही जो आम्हाला अमूल्य असा ठेवा दिला तो आम्ही आचरणात आणून जीवनाचं सार्थक करू.

**उत्कट भव्य तेचि घ्यावे।**
**मिळमिळित अवघेची टाकावे।**
**निःस्पृहपणे विख्यात व्हावे।**
**भूमंडळी ॥श्रीराम॥**

**-शितल शहाजी भोसले,**

❖❖❖

# विविध कार्यक्रम वृत्ते

## 'डॉ. र. रा.गोसावी- व्यक्ती आणि वाङ्मय' ग्रंथ प्रकाशन सोहळा

शिरवळ मठाचे मठपती, संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक, विचारवंत, संगीताचे समीक्षक, मार्गदर्शक कै. प्रा. डॉ. र. रा. गोसावी यांच्या उपलब्ध वाङ्मयाचा धांडोळा घेऊन त्यांचे विद्यार्थी डॉ. भालचंद्र कापरेकर यांनी 'डॉ. र. रा.गोसावी- व्यक्ती आणि वाङ्मय' हा ग्रंथ परिश्रमपूर्वक सिद्ध केला आहे. डॉ. गोसावी यांचे सन्मित्र डॉ. अशोक कामत यांनी 'गुरुकुल प्रतिष्ठान' तर्फे हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ स्वामीकृपा हॉल, पुणे येथे दि. १२/६/२०१३ रोजी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. पराग करंदीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी श्री. अभय टिळक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'गुरुकुल प्रतिष्ठान' चे समन्वयक श्री.रमेश होनवाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविकात डॉ.अशोक कामत यांनी 'गुरुकुल प्रतिष्ठान' च्या कार्याची व आगामी योजनांची माहिती दिली. प्रस्तुत ग्रंथातील संशोधनाच्या विषयावर अधिक संशोधन करून ग्रंथनिर्मिती अभ्यासक, संशोधक, सांप्रदायिक यांनी करून डॉ. गोसावी यांचा समृद्ध वारसा पुढे न्यावा हाच या ग्रंथनिर्मिती मागील उद्देश असल्याचे डॉ. कापरेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. श्री. पराग करंदीकर यांनी अध्यक्षीय भाषणात समर्थ रामदासांचे परखड विचार सद्यस्थितीत अनुसरावेत असे सांगितले. श्री. अभय टिळक यांनी आपल्या रामदासविषयक चिंतनात सद्यस्थितीला अनुकूल असा समर्थांच्या साहित्याचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे हे प्रभावीपणे मांडले.

याच कार्यक्रमात संत साहित्यातील योगदानाबद्दल देण्यात येणारा संत चोखामेळा पुरस्कार २०१३, संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. आशा राशिंगकर यांना श्री.पराग करंदीकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह व रोख रु. ५,०००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आपल्या मनोगतात डॉ. राशिंगकर यांनी कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या पुढील कार्यासाठी हा पुरस्कार प्रेरणादायी ठरेल असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी स. भ. मंदारबुवा रामदासी, स. भ. काळेकाका, स. भ. प्रभाकर आराध्ये, प्रा. वीणा गोसावी व त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, स्नेही आणि 'गुरुकुल प्रतिष्ठान' चे हितचिंतक उपस्थित होते.

या ग्रंथनिर्मितीच्या रूपाने डॉ. कामत यांनी 'मित्रकार्य' तर डॉ. कापरेकर यांनी 'गुरुकार्य' पार पाडले आहे अशीच भावना उपस्थितांच्या मनात होती.

सौ. मुग्धा गरसोळे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत कार्यक्रमाचे संचालन केले आणि हा हृद्य समारंभ पार पडला.

❖❖❖

**सुजन वाक्य**

**न मुक्ता देवगन्धर्वाः पितरो यक्षकिन्नराः ।**
**ऋषयः सर्वसिद्धाश्च, गुरुसेवापराङ्मुखाः ।।**

(श्री गुरुगीता ८६)

▶ देव, गंधर्व, किन्नर, पितर, यक्ष, ऋषी व सिद्ध देखील जर गुरूसेवेकडे तोंड फिरवून असतील, गुरुसेवा त्यांच्या हातून होत नसेल तर कधीही मुक्त होऊ शकत नाहीत. मुक्तीसाठी गुरुसेवा हाच एकमेव उपाय आहे.

# भाग्यनगर (हैद्राबाद) श्रीसमर्थ पादूका दौरा

विजयनगरचे प.पू. श्री. साईसुंदरम् महाराज यांच्या इच्छेनुसार व त्यांचेच प्रयत्नाने भाग्यनगर हैद्राबाद येथील भाविकांना श्रीसमर्थांच्या पादुकांचे पूजन दर्शन व सेवेचा लाभ मिळाला. दि. ६ मे रोजी सकाळी ६.१५ च्या विमानाने मुंबईहून निघून हैद्राबाद येथे ७.३० वाजता श्री समर्थ पादूकांचे आगमन झाले.

विमानतळावर साईसुंदरम् महाराजांचे परमशिष्य श्री.श्रीनिवास यांनी समर्थ पादुकांना हार घालून पादुकांचे व मारूतीरायांचे स्वागत केले. योगिराज कल्याण स्वामींना ज्या प्रमाणे समर्थ भेटीची तळमळ लागायची त्याचप्रमाणे प.पू. साईसुंदरम् महाराजांनाही समर्थांच्या पादुका दर्शनाची ओढ लागलेली होती. सकाळी १० वाजता समर्थ पादुका महाराजांच्या शिष्यांच्या घरी पोहोचल्या. पू. साईसुंदरम् महाराज व त्यांच्या भक्त परिवाराने समर्थांचे सुंदर स्वागत केले व समर्थ पादुकांना महाअभिषेक केला. श्रीसमर्थ पादुका पूजन सोहळ्याचे प.पू. महाराजांनी अतिशय सुंदर नियोजन केलेले होते. दुपारनंतर समर्थ पादुका पूजनाला प्रारंभ झाला. तेलंगणातील पद्धतीप्रमाणे भजन व नाम स्मरणांच्या गजरात व वंदे संतं हनुमंतम् या गोड मधुर भजनाबरोबरच समर्थांची करूणाष्टके अत्यंत श्रध्देने म्हणून समर्थ पादुका व मारुतीरायाच्या मूर्तीचे श्रद्धायुक्त अंतःकरणाने पूजन केले जात असे.

**धरा सद्गुरूचरण। जेणे चुकती जन्म मरण॥**
**सद्गुरू कृपेविण काही। भवतरणोपाव तो नाही।**
**याकारणे लवलाही। सद्गुरूपाय सेवावे॥**

या समर्थ वचनाची प्रचिती पू.साईसुंदरम् महाराजांचे शिष्य व भक्त आपल्या गुरूंच्या सान्निध्यात घेत होती.परम सद्गुरू समर्थाची पाऊले आपल्या गुरूमाऊलींनी आपल्या डोक्यावर ठेवून समर्थ कृपेचा वरदहस्त ठेवावा याचा प.पू. साईसुंदरम् महाराजांच्या शिष्यांच्या आनंद रोमारोमातून जाणवत होता. अंतःकरणातील भावधारा अश्रूंच्या रूपाने डोळ्यातून वाहत होती. प. पू. साईसुंदरम् महाराजांची समर्थांचेवर असलेली अपार निष्ठा पाहून आमचीही अंतःकरणे भरून येत होती. कठोर साधना करून साधनेची एक उच्चतम अवस्था प्राप्त झालेला साधक स्वतःच्या हातात पादुका घेऊन घरोघरी जाऊन समर्थांची स्तवनांजली व अष्टोत्तरशत नामावली म्हणून पूजनाचा आनंद भक्तांना देत होता.

हैद्राबाद शहरात प्रथमच समर्थ पादुकांचे घरोघरी पूजन होत होते. श्रवण कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनम् अशा चौथ्या भक्तीपर्यंत म्हणजे फक्त चार दिवसांच्या कालावधीत पू.साईसुंदरम् महाराजांनी १,६५,०००/- (एक लक्ष पासष्ट हजार) रुपयांची भिक्षा समर्थांचे चरणावर अर्पण करून खऱ्या अर्थाने तन,मन,धनपूर्वक सेवा अर्पण केली. पू. साईसुंदरम् महाराजांचे कल्याण आणि उद्धव म्हणजे श्रीनिवास आणि श्री.गोपी तसेच विजयनगर व हैद्राबाद येथील सेवक व भक्तांचे पूर्ण सहकार्य मिळाले.
काष्ठाच्या पादुका स्वामींच्या पायात। स्मरणी हातात तुळशीची।
**कृष्णातटाकासी जाहले दर्शन। वंदिले चरण तुका म्हणे॥**

अशा समर्थ पादुकांचा पाच दिवसांचा हैद्राबाद येथील दर्शन सोहळा अतिशय आनंदात व उत्साहात पूर्ण झाला.

❖❖❖

## सुजन वाक्य

**कर्तव्यमाचरन् कामं अकर्तव्यमनाचरन्।**
**तिष्ठति प्रकृताचारे स तु आर्य इति स्मृतः॥**

(योगवासिष्ठ)

▶ जो कर्तव्यकर्म निष्ठेने आणि विपुल प्रमाणात करतो, तसेच अकर्तव्य, निषिद्ध-वाईट कर्मे कटाक्षाने टाळतो, योग्य जातिवंत अशा वर्तनाने राहतो, त्याला 'आर्य' असे म्हणतात.

# यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम पोड व पारधी बेड्यांवर ११ हनुमान मूर्तींची स्थापना

हनुमान जयंती निमित्त नुकतीच यवतमाळ जिल्ह्यातील ६ कोलाम पोड व ३ पारधी बेड्यांवर हनुमान मूर्तींची स्थापना करण्यात आली. या सर्व हनुमान मूर्ती रामदास स्वामी सज्जनगड तर्फे वितरीत करण्यात आल्या होत्या. या निमित्ताने या सर्व ठिकाणी हनुमान मंदिराची निर्मिती झाली व शक्तीची उपासना करणारी केंद्रे या गावामध्ये उभी झाली आहेत.

झरी व घाटजी तालुक्यातील कोलाम पोडावर धर्मांतर व कुमारी मातांचा प्रश्नही खूप मोठा आहे. तसेच या भीषण प्रश्नांवर अजूनही कुणाचे फारसे लक्ष वेधले गेले नाही. हा सर्व भाग गोमास भक्षक म्हणूनही प्रसिद्ध आहे. परंतु तरीही धर्मजागरण कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमधून या ठिकाणी मोठे श्रद्धा जागरण होऊन हनुमानाची मंदिरे स्थापन होऊन आता धर्म जागृतीला प्रारंभ झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**हनुमान मंदिराची स्थापना झालेले पारधी बेडे**

नेर तालुक्यातील राळेगाव तालुक्यातील व यवतमाळ तालुक्यातील वाघाडी या पारधी बेड्यांवरसुद्धा हनुमान मंदिराची स्थापना करण्यात आली. या सर्वच ठिकाणी कार्यक्रमांचे वैशिष्ट्य म्हणजे गावकऱ्यांनी कार्यक्रमामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. धान्य व पैसे या स्वरूपान वर्गणी गोळा करून ठिकठिकाणी महाप्रसाद-पताका, मिरवणूक, भजन, पूजन, होम हवन यांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक ठिकाणचे आगळे वेगळे वैशिष्ट्य देखील आहे.

**हनुमान मूर्ती स्थापनकार्याची वैशिष्ट्ये**

वरपोड या गावी जाण्याकरिता रस्ता नाही, वीज नाही, पाणी नाही. २ कि.मी. अंतरावरून महिलांना पाणी आणावे लागते. गाव घनदाट जंगलात पहाडावर वसले आहे. अशा गावात गावकऱ्यांनी उत्साहाने हनुमान मूर्ती डोक्यावर वाहून नेऊन मिरवणूक काढली व विधीवत् स्थापना केली. पांढरवाणी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर धर्मांतर आहे. त्याठिकाणी हनुमानमूर्तीची स्थापनेच्या दिवशी ख्रिश्चनांना जाणीवपूर्वक तणाव निर्माण केला. परंतु परिसरातील हिंदुबांधव व गावकऱ्यांनी त्याचा विरोध हाणून पाडला व हनुमान मूर्तीची स्थापना केली. महिलांनी पुढाकार घेऊन पोलिसांच्या दडपशाहीला विरोध केला. शिवपोड हे गावसुद्धा जंगलामध्ये वसलेले आहे. परंतु या ठिकाणीसुद्धा गावकरी हिरीरीने सहभागी झाले. ख्रिश्चनांच्या संस्थेत काम करणारा कार्यकर्ताच या ठिकाणी मुख्य यजमान होता. वनमजुरीवरच या गावातील गावकऱ्याची गुजराण होते.

शिवणी पांड येथे गावकऱ्यांनी धान्य गोळा करून संपूर्ण गावाला महाप्रसाद दिला. भव्य मिरवणूक काढली. त्यांची भविष्यात मंदिरे विकासाची मोठी योजना आहे.

सर्वच ठिकाणी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली होती. मूर्तीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली होती. सर्वत्र प्रचंड उत्साहात प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. एकूण ११ कार्यक्रमामध्ये महाप्रसादाच्या जवळ जवळ ५००० भाविकांनी लाभ घेतला.

येसापूर या कोलामपोडावर रामनवमीच्या दिवशी मूर्ती पोहोचली त्या दिवसापासून प्रतिष्ठापना होईपर्यंत गावकऱ्यांनी मांसाहार वर्ज्य केला होता. सर्व ठिकाणी मद्यपान व मांसाहाराचे प्रमाण कमी झाले. मंदिरामध्ये दिवाबत्तीची व्यवस्थाही सर्वच ठिकाणी करण्यात आली आहे. पांढरकवडा शहरातून प्राणप्रतिष्ठेच्या पूजेचे साहित्य, ब्राह्मण आदींची व्यवस्था धर्मजागरण कार्यकर्त्यांनी केली. ही मंदिरे आता शक्तींची उपासना केंद्रे झाली असून भविष्यात तरूणांकरिता उर्जानिर्मितीची केंद्रे होतील यात शंका नाही. समर्थ रामदासांचे कार्य असेच समोरही चालू राहिल यात शंका नाही. या सर्व कार्यक्रमांचे नियोजनाकरिता दीनदयाळ संस्था यवतमाळचे कार्यकर्ते श्री. पुनजित कुळमेथे यांनी विशेष परिश्रम घेतले.

❖❖❖

# ग्रंथमात्र धांडोळावा...



## प्रश्नमंजुषा

आपल्या ‘रघुवीर समर्थ’ मासिकाच्या प्रत्येक अंकात त्या अंकातील लेखांवर आधारित ‘प्रश्नमंजुषा’ देत आहोत. साधारण प्रत्येक लेखातून एक प्रश्न काढला आहे.आपला अभ्यास वाढावा व वाचक समर्थ भक्तांशी संवाद घडावा, हा मुख्य हेतू आहे. सर्वाधिक योग्य व अचुक उत्तरे लिहून पाठविणाऱ्या निवडक वाचकांची नावे मासिकातून प्रसिध्द केली जातील. या प्रश्नांची उत्तरे खालील पत्त्यावर लिहून किंवा ईमेल द्वारा पाठवावित. जून २०१३ च्या अंकातील प्रश्नांची योग्य उत्तरे देणाऱ्या वाचकांची यादी ऑगस्ट २०१३ च्या अंकात प्रसिध्द केली जाईल.

**१) श्री कल्याण स्वामींची पुण्यतिथी कोणती ? श्री कल्याणस्वामींचे समाधीस्थान कोठे आहे ?**

**२) ‘अभंग योगवासिष्ठ’ लेखाच्या आधारे नियती म्हणजे काय ? स्पष्ट करा.**

**३) महर्षी वेदव्यासांनी रचिलेल्या अठरा पुराणांची नावे सांगा. तसेच वेदांचे कोणते चार विभाग करून ते कोणत्या चार शिष्यांना दिले त्यांची नावे सांगा.**

**४) ..........। ऐसे प्रत्ययास येते।**
**कोण काये घेऊन जाते। सांगाना का ।।**
**वरील ओवीचे चरण लिहून ओवी पूर्ण करा.**

**५) वेदांमधील चार महावाक्ये कोणती ?**

**६) श्रीसमर्थांनी मनाच्या श्लोकांत कल्पनेचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत ?**

**७) देहबुद्धी कमी होण्यासाठी श्रीसमर्थांनी ‘जुना दासबोध’ विविध शिकवण समासात कोणता उपाय सांगितला आहे ?**

**मे २०१३ अंकातील प्रश्नमंजुषेची योग्य उत्तरे देणाऱ्या वाचकांची नावे खालीलप्रमाणे**

**१) श्रीमती शकुंतला आगाशे,पुणे**

**२) श्री. विश्वनाथ प्रभुणे,ठाणे**

**३) सौ. ललिता गणेशराव टाकळकर, औरंगाबाद**

**प्रश्नमंजुषेचे उत्तर पाठविण्याचा पत्ता :**
**श्री. अमृतबुवा रामदासी (‘रघुवीर समर्थ’ मासिक ‘प्रश्नमंजुषे’ करिता)**
**श्री रामदास स्वामी संस्थान, श्री रामदास स्वामींचा मठ,**
**मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा. पिन ४१५०१३**
**मो. ९४०४५९०७७३,** raghuvirsmasik@gmail.com

# युवा संस्कार वर्ग शिबिर, सज्जनगड
## दि.१ जुन ते ९ जुन २०१३



संस्कार वर्ग शिबिरात विद्यार्थीना मार्गदर्शन करताना
राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.श्री.वासुदेवबुवा बुरसे



श्रीसमर्थ मठासमोर सुर्यनमस्कार घालताना संस्कार वर्गातील विद्यार्थी



संस्कार वर्गात सहभागी झालेले युवक आणि युवती व्याख्यान ऐकताना...



संस्कार वर्ग शिबिरात विद्यार्थीना मार्गदर्शन करताना
राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.श्री.चारुदत्त आफळे



वेदमूर्ती श्री.विवेकशास्त्री गोडबोले यांनी
संस्कार वर्गातील शिबिरार्थींना मार्गदर्शन केले,
त्यांना श्रीसमर्थ प्रसाद देताना श्री.मामा कुलकर्णी



संस्कार वर्ग शिबिरार्थीसमवेत श्री.अमृतबुवा रामदासी,सज्जनगड



समारोप प्रसंगी श्री.नंदकुमार मराठे,संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी,
विश्वस्त श्री.बाळासाहेब स्वामी,तिसगाव मठपती श्री.प्रकाशबुवा रामदासी,श्री.मोहनबुवा रामदासी,




शिबिरार्थींना प्रमाणपत्र देताना
संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी

RNI - MHMAR/2007/19142 Regd. No. SATARA/036/2013-2015




डॉ.र.रा.गोसावी 'व्यक्ति आणि वाङ्मय' या ग्रंथाचे प्रकाशन झाले, याप्रसंगी डॉ.भालचंद्र कापरेकर, डॉ.अशोक मोडक, दै.महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री.पराग करंदीकर, संत साहित्याचे अभ्यासक व अर्थतज्ञ श्री.दीपक टिळक



भाग्यनगर (हैद्राबाद) येथे श्रीसमर्थ पादुकांचा दौरा आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प.पू.साई सुन्दरम् महाराज श्रीसमर्थ पादुकांसमवेत

# मासिक ॥ रघुवीर समर्थ ॥

## समर्थ विचार प्रसार मोहीम/सभासद संख्या वृध्दी संकल्प

एक आवाहन :- युवक मित्रांना.., रघुवीर समर्थ मासिक सभासदांना, वाचकांना, सर्व समर्थ भक्तांना...

एक उद्दिष्ट (प्रत्येकाचे) :- प्रत्येक समर्थ भक्ताने कमीत कमी ५ किंवा त्यापेक्षा अधिक नवीन सभासद करुन घेणे...

एक वृत्ती (आपल्या सभोवती) :- आपल्या सभोवताली आपले आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच आपल्या विभागातील सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालय, विद्यालय, महाविद्यालय यांना रघुवीर समर्थ मासिकाचे सभासद करून घेणे...

एक संकल्प सर्वांचा (आगळी वेगळी गुरुदक्षिणा) :- २०१३ या वर्षांत रघुवीर समर्थ मासिकाचे नवीन १३ हजार सभासद करूया... त्यांच्या जीवनात समर्थ विचार पोहोचवून समर्थ चरणी अर्पण करूया एक आगळी वेगळी गुरुदक्षिणा...

**एक सेवक प्रतिनिधी/समिती (जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय) :-**
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात व प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सेवाभावी (मिशनरी) वृत्तीने काम करण्याची इच्छा असणाऱ्या भक्तांची सेवक प्रतिनिधी किंवा समिती स्थापन करणे आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :मंदारबुवा रामदासी - ९७६३२७१४०७, संपादक, रघुवीर समर्थ.

प्रेषक :
।। रघुवीर समर्थ ।।
श्री रामदास स्वामी संस्थान, श्री रामदास स्वामींचा मठ,
सज्जनगड, जि. सातारा, पि.४१५ ०१३. फोन : (०२१६२) २७८२२१

प्रति,